# १

# वर्णनात्मक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे, सोस्यूर, ब्लूमफील्ड व चॉम्स्की यांचे भाषास्वरुपविषयक सिद्धांत

**घटक रचना**


१.१ उद्देश

१.२ प्रस्तावना

१.३ सोस्यूरचा भाषाविचार

१.४ ब्लूमफील्डचा भाषाविचार

१.५ चॉम्स्कीचा भाषाविचार

१.६ वर्णनात्मक भाषाविज्ञान

१.७ भाषाविज्ञानातील 'विज्ञाना' चे स्वरूप

१.८ वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती

१.९ सारांश

१.१० संदर्भग्रंथसूची

१.११ नमुना प्रश्न


munotes.in

## १.१ उद्देश

वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती ही विसाव्या शतकात विकसित झाली. सोस्यूर, ब्लूमफील्ड चॉम्स्की या भाषाभ्यासकांनी या पद्धतीचे विश्लेषण करणारे सिद्धांत मांडले. संबंधित घटकामध्ये पुढील उद्देश साध्य होणार आहेत.

- वर्णनात्मक भाषाविज्ञान म्हणजे काय आणि त्याची मूलतत्त्वे काय आहेत हे समजेल.
- वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे महत्त्वाचे अभ्यासकांचे सिद्धांत व भाषाविचार आपल्याला समजून घेता येतील. त्यामध्ये सोस्यूर, ब्लूमफील्ड व चॉम्स्की यांचे भाषाविचार अभ्यासता येतील.
- वर्णनात्मक भाषाविज्ञानातील वर्णनात्मक 'विज्ञाना'चे स्वरूप समजेल.
- तसेच वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती कोणत्या पद्धतीने भाषेचा विचार व विश्लेषण करते हे समजून घेता येईल.

## १.२ प्रस्तावना

मानवनिर्मित भाषा ही समाजव्यवहाराचा पायाभूत घटक आहे. ध्वनी, शब्द, लांब-आखूड वाक्यसंच हे भाषेचे अंगभूत घटक असतात. वाक्यसंच म्हणजेच बोलणे हे भाषकाच्या मनातील अव्यक्त असे 'भाषिक ज्ञान'असते. या ज्ञानामध्ये संवाद साधण्याच्या क्षमता असतात. प्रस्तुत भाषिक ज्ञान किंवा क्षमता भाषकाच्या वक्तव्य, आकलन, लेखन आणि वाचन यामधून आविष्कृत होत असतात. आपण बोलतो म्हणजे मनातील सुप्त ज्ञानाला परंपरेने चालत आलेले संकेत देत असतो. संकेत किंवा यादृच्छिक प्रतीके आपणास सहज साध्य असणाऱ्या आवाजाने व सवयीने आपण निर्माण करीत असतो. आवाजाच्या (बोलणे) स्तरावर प्रत्यक्ष एखाद्या भाषेचे पृष्ठस्तरीय नियम कार्यरत झालेले असतात. म्हणजेच वाक्यरचनेच्या अनुषंगाने मनातील आशयाची अभिव्यक्ती होऊ लागलेली असते. यावेळी मनातील अमर्याद वाक्यसंच प्रत्यक्ष भाषा वापराच्या स्तरावर अतिशय मर्यादित स्वनिमांनी आणि वाक्यांनी बद्ध झालेले असतात. अशा या भाषिक व्यवहाराच्या अभ्यासाला खूप मोठी परंपरा आहे. ही परंपरा सतत बदलत आलेली आहे. त्या बदलाच्या पार्श्वभूमीवर भाषाविज्ञानाचा म्हणजे वर्णनात्मक भाषाविज्ञानाचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

वर्णनात्मक भाषावैज्ञानिक दृष्टीने झालेल्या भाषेच्या अभ्यासाची वाटचाल पाहण्यापूर्वी प्रारंभी आपण पारंपरिक भाषाभ्यासाचे (philology) स्वरूप समजून घेऊ. भाषाभ्यास म्हणजे पारंपरिक भाषाभ्यास अथवा ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती (philology) होय. ऐतिहासिक भाषाभ्यास आणि भाषाविज्ञान (linguistics) यातील फरक लक्षात घेतल्याशिवाय आधुनिक भाषाविज्ञानाचे म्हणजेच वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप आणि महत्त्व लक्षात येणार नाही. आधुनिक भाषाविज्ञान हेच वर्णनात्मक भाषाविज्ञान आहे. याला इंग्रजीत "Descriptive Linguistics" असे म्हटले जाते. याच अभ्यासपद्धतीला ''एककालिक अभ्यासपद्धती'' असेही म्हणतात.

विसाव्या शतकात नव्याने उदयास आलेल्या वर्णनात्मक अभ्यासामुळे ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीची पिछेहाट सुरू झाली. या अभ्यास पद्धतीवर सोस्यूरने सर्वप्रथम आक्षेप घेतला. 'एककालिक' आणि 'कालक्रमिक' या संज्ञा वापरून 'एककालिक' अभ्यासपद्धती कशी महत्त्वाची आहे हे त्याने स्पष्ट केले. 'एककालिक' ही संज्ञा 'वर्णनात्मक' आहे. त्याच्या मते, एखाद्या विशिष्ट काळाच्या भाषेचाच भाषिक अभ्यास करणे आवश्यक आहे. विशिष्ट काळाचा अभ्यास केल्यास भाषेच्या अभ्यासास वस्तुनिष्ठता आणि वर्णनात्मकता प्राप्त होते. तर ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करत असताना अभ्यासकाचे लक्ष फक्त भाषिक परिवर्तनावरच केंद्रित होते. यामुळे हा अभ्यास पृष्ठस्तरीय आणि अपुरा राहतो. त्याचबरोबर दोन वेगवेगळ्या कालखंडांतील भाषांचा 'एककालिक' पद्धतीने अभ्यास केल्यास या कालखंडांमधील भाषिक परिवर्तनाचे अंदाजही बांधता येतात. यामुळे आपोआपच दोन कालखंडांमधील भाषेचे बदललेले स्वरूप लक्षात येते; आणि या अभ्यासाला वस्तुनिष्ठताही प्राप्त होते. साहजिकच कालक्रमिक पद्धती अनावश्यक ठरते, हे सोस्यूरने दाखवून दिले. म्हणूनच अलीकडे ऐतिहासिक भाषाविज्ञानाकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे.

munotes.in

ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या भूमिका नाकारून भाषेचा वस्तुनिष्ठ आणि वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करण्याच्या भूमिकेतून आधुनिक भाषाविज्ञान जन्माला आले आहे.

ऐतिहासिक भाषाभ्यासकांनी भाषेचा अभ्यास तत्त्वज्ञानात्मक अंगानेच केला आहे. भाषा ही समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे 'साधन'आहे, हाच दृष्टिकोण या पद्धतीत प्रबळ दिसतो. भाषेचा भाषा म्हणून अभ्यास करण्याऐवजी तिच्याकडे साधनात्मक, आदेशात्मक आणि तत्त्वज्ञानात्मक दृष्टीने पाहिल्याने भाषेच्या अभ्यासाची 'स्वायत्तता' संपुष्टात आली होती. भाषा ही सामाजिक संस्था आहे; सामाजिक संस्था जशा स्वायत्त असतात तशा भाषाही त्या त्या काळात स्वायत्त असतात, हे लक्षात न घेता भाषेचा अभ्यास झाला. त्यामुळे वर्तमान भाषांचा अभ्यास करताना त्यांच्या जनक भाषांना अधिक महत्त्व दिले जात होते. जनक भाषेचेच नियम वर्तमान भाषेला लावले जात होते. तसेच हा अभ्यास केवळ लिखित भाषिक रूपांचा असल्याने पारंपरिक भाषाभ्यास भाषा म्हणून भाषेला स्वतंत्र दर्जा देत नव्हता. वस्तुतः कोणत्याही भाषेचा अभ्यास करीत असताना जनक भाषांचे प्रभुत्व मान्य करूनही भाषेचा स्वतंत्र अभ्यास आवश्यक असतो. पण असा दृष्टिकोन 'पारंपरिक भाषाभ्यासात' दिसत नाही.

## १.३ सोस्यूरचा भाषाविचार

स्विडीश भाषावैज्ञानिक फर्दिनांद द सोस्यूरने आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया घातला. तत्पूर्वी इसवीसन पूर्व पाचव्या सहाव्या शतकात भारतीय भाषाभ्यासक पाणिनीने आपल्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथात संस्कृत भाषेचा अभ्यास करताना वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला. वर्णनात्मक पद्धतीबरोबरच त्याने गणिती पद्धतीनेही भाषेचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास त्याने ''वृद्धि'' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून केला होता. या संकल्पनेचा अर्थ होतो वाढ. भाषा वाढत असते. ती बदलत असते. ती वाढणारी असते. अशा या वृद्धि होणाऱ्या संस्कृत व भाषेचा अभ्यास पाणिनीने केलेला आहे. तो केवळ संस्कृतचा आहे, असे म्हणता येत नाही. पण त्याने संस्कृत भाषेचेच व्याकरण रचले असे सांगितले जाते. तर वसाहतीच्या निमित्ताने जेव्हा ब्रिटिश लोक भारतात आले तेव्हा त्यांचा भारतीय परंपरांशी संबंध आला. त्यांना भारतीय भाषांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरले. या अभ्यासातूनच त्यांना पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथाचा परिचय झाला; जो अतिशय महत्त्वाचा ठरला. यामधून १८८६ मध्ये कार्ल ब्रूगमन आणि बर्टोल्ड डेलब्रुक यांनी 'Outline of the Comparative Grammar of the Indo-European Languages' यावरचे संशोधन प्रकाशित केले. प्रस्तुत संशोधन फार महत्त्वपूर्ण ठरले. या अभ्यासानंतर युरोपमध्ये भाषावैज्ञानिक अभ्यासाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. पण या शाखांत सुरुवातीला जो अभ्यास झाला तो ऐतिहासिक पद्धतीनेच. सर विल्यम जोन्स, एडवर्ड सपीर यांनी या दृष्टीने अभ्यास केला आहे.

सोस्यूरने सर्वप्रथम ऐतिहासिक / कालक्रमिक (diachronic) आणि वर्णनात्मक / एककालिक (sychronic) अभ्यासपद्धतींमधील फरक स्पष्ट करून सांगितला. ग्रीमने जो ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास केला, त्यावर सोस्यूरने आक्षेप घेऊन, एककालिक अभ्यासाला महत्त्व दिले. एककालिक अभ्यासपद्धती भाषेच्या विकासाचे निश्चित नियम (steps) ठरवू शकते, असे सोस्यूरने सप्रमाण सिद्ध केले. दोन कालखंडांतील भाषेचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास केल्यास भाषिक परिवर्तनाचे, पर्यायाने विकासाचे नियम निश्चित करता येतात, हे त्याने आपल्या

'Course in general Linguistics' (१९१५) या ग्रंथात सप्रमाण सिद्ध केले आहे. हा ग्रंथ आधुनिक भाषाविज्ञानातील मूलभूत ग्रंथ मानला जातो. सोस्यूरनंतर अनेक भाषावैज्ञानिकांनी भाषेचा वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास केला आहे.

भाषाव्यवस्था आणि भाषाव्यवहार यातील फरक समजून देताना सोस्यूरने भाषेच्या संदर्भात मांडलेला विचार ध्यानात घ्यावा लागतो. सोस्यूरने भाषेचे दोन स्तर कल्पिले आहेत. १. ल लांग (la langue) २.ल परोल (la Parole). यालाच अनुक्रमे 'भाषा' आणि 'भाषण' असे म्हणतात. भाषेप्रमाणे 'लांग' ही अमूर्त स्वरूपाची भाषिक व्यवस्था आहे. कारण 'लांग'ला कोणत्याही प्रकारचे शारीर अस्तित्व नाही. अमूर्त अशा स्वरूपाची व्यवस्था म्हणून ओळखली जाणारी 'लांग' भाषिक समाजातील प्रत्यक्ष भाषिक व्यवहारावर उभी आहे. म्हणजेच भाषिक समाजातील सर्व सामाजिक, सांस्कृतिक, व्यक्तिगत बोली या गोष्टी वगळल्यानंतर जी अमूर्त व्यवस्था उरते ती 'लांग' होय. यालाच विल्हेम हंबोल्ट 'भाषेची अंतर्गत संरचना' (inner form oflanguage) असे म्हणतो. ही सामाजिक अस्मितेमध्ये अस्तित्वात असते. याउलट 'परोल' म्हणजे भाषण होय. यालाच प्रत्यक्ष बोलणे असेही म्हणतात. ही व्यक्तिगत स्तरावर वापरली जाणारी म्हणजेच बोलली जाणारी भाषा असते. 'परोल' मध्ये व्यक्तिगत कौशल्ये आणि व्यक्तिगत आवाज (sound) यांचा सहभाग असतो. म्हणजेच 'परोल'ही व्यक्तिगत बोली असते. 'परोल' मधील व्यक्तिगतता 'लांग' मध्ये नसते. 'लांग' ही अव्यक्त अशा स्वरूपाची भाषिक व्यवस्था असते तर 'परोल' ही प्रत्यक्ष व्यक्त स्वरूपातील व्यक्तिगत अशी बोली असते. यामुळे लांगला 'भाषा किंवा भाषा व्यवस्था' असे म्हणतात; तर परोलला 'भाषण','भाषिक वर्तन' किंवा 'भाषिक व्यवहार' असे म्हणतात.

भाषा ही एक 'चिन्ह' (sign) व्यवस्था आहे; असे सांगून, सोस्यूरने'चिन्ह'व्यवस्थेच्या अनुषंगाने भाषेचे विश्लेषण केले आहे. त्याच्या मते, प्रत्यक्ष ध्वनी (ध्वनिरूप चिन्हक signifier) आणि त्यांना प्राप्त होणारा अर्थ (अर्थरूप चिन्हित - signified) यांची सांगड घालणारी 'चिन्ह' (sign) व्यवस्था म्हणजे भाषा होय. भाषा ही यांत्रिक स्वरूपाची नसून ती अतिशय गुंतागुंतीची आणि व्यामिश्र आहे. कोणत्याही भाषेमध्ये मर्यादित स्वनिमांचा (ध्वनी) वापर करून असंख्य अर्थपूर्ण आणि संदेशवाहक रूपे तयार केली जातात. भाषिक रूपांमधूनच (linguistic forms) व्यामिश्र वाक्यरचना तयार केल्या जातात. अशा वाक्यामध्ये कर्ता, कर्म, क्रियापद असे अनेक भाषिक घटक कार्य करीत असतात. या घटकांचे अनेकविध गट भाषेत असतात. यापैकीच विशिष्ट रूपे निवडून भाषक आपला भाषिक व्यवहार (अन्वय) साध्य करीत असतो. अशा या भाषिक घटकांचे सोस्यूरने दोन गटांत वर्गीकरण केले आहे.

१. अन्वयनिष्ठ घटक (syntagmatic)

२. गणनिष्ठ घटक (paradigmatic)

उदाहरणार्थ, १.शाम पत्र लिहितो. २. राम आंबा खातो. ३. सीता गाय बांधते. या तिन्ही वाक्यात कर्ता, कर्म आणि क्रियापद आहेत. म्हणजेच आपण कर्त्यांचा एक गट (राम, सीता, शाम इ.), कर्माचा एक गट (पत्र, आंबा, गाय इ.) आणि क्रियापदांचा एक गट (लिहितो, खातो, बांधते इ.) असे वर्गीकरण करू शकतो. या वर्गीकरणासच सोस्यूर 'गणनिष्ठ घटक' म्हणतो. असे असंख्य गणनिष्ठ घटक भाषेमध्ये असतात. गणनिष्ठ घटकांचा अन्वर्थक वापर करून भाषक आपला व्यवहार करीत असतो. म्हणजेच गणनिष्ठ घटकांचा संरचनात्मक अन्वय

लावून वाक्यरचना तयार करीत असतो. उदा. १.राम→आंबा→ खातो. २. शाम→ पत्र→ लिहितो.

या उदाहरणांमध्ये राम चा आंब्याशी आणि आंब्याचा खाण्याशी म्हणजे रामचा अन्वय खाण्याशी किंवा उलट्या पद्धतीने खाण्याचा अन्वय रामशी साधून अर्थव्यापार होत असतो. हा अन्वय त्या त्या भाषेनुसार बदलत असतो. म्हणजेच पृष्ठस्तरीय रचनेमध्ये बदल होत जातो. उदाहरणार्थ, 'Ram eats a mango.' येथे कर्त्याला लागून क्रियापद येते व नंतर कर्म येते. अशा पद्धतीने बदल होत असतो. पण अन्वय साधूनच अर्थव्यापार होत असतो. यालाच सोस्यूर 'अन्वयनिष्ठ घटक' असे म्हणतो.

याबरोबरच सोस्यूरने भाषेच्या संदर्भात आणखी काही महत्त्वपूर्ण अशी संशोधनात्मक विधाने केली आहेत.

१. भाषेचे ध्वनिरूप (चिन्हक) आणि तिथे अर्थरूप (चिन्हित) यांच्यातील संबंध यादृच्छिक असतात. ते सामाजिक परंपरेत योगायोगाने प्राप्त झालेले असतात. अशा ध्वनी आणि अर्थ यांच्यात संबंध प्रस्थापित करणाऱ्या 'चिन्ह' व्यवस्थेस भाषा असे म्हणतात. हे संबंध सामाजिक संकेतांनी साधलेले असतात. संकेत हे नेहमीच यादृच्छिक असल्याने, संकेतांचा म्हणजेच अर्थाचा विचार करणे अशक्य आहे. कारण ध्वनी आणि अर्थ यांच्यात जे संबंध असतात त्यांचे कोणत्याही अर्थाने स्पष्टीकरण करता येत नाही. याच भूमिकेतून त्यांनी अर्थ विचाराकडे दुर्लक्ष केले आहे.

२. भाषा समकालीन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ती ऐतिहासिक किंवा कालक्रमिक विकासाची प्रक्रिया नाही. यातूनच त्याने एककालिक भाषाभ्यास पद्धती विकसित केली.

३. भाषेचा अभ्यास म्हणजे प्रत्यक्ष बोलण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे; लिखित साधनांचा नव्हे.

४. भाषा (लांग) आणि भाषण (परोल) यांच्यातील भेद सांगून भाषाभ्यास म्हणजे भाषणाचा (परोल) अभ्यास नव्हे, तर तो भाषेचा (लांग) अभ्यास असतो हे स्पष्ट केले.

५. भाषेचा अभ्यास म्हणजे केवळ तिच्या व्याकरणाचा किंवा सुट्या स्वनिमिक गुणधर्मांचा अभ्यास नसून तो अंतर्गत संरचनेचा अभ्यास असला पाहिजे.

सोस्यूरची ही विधाने भाषेकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोणाला मूलभूत विरोध दर्शविणारी आणि भाषेविषयी वेगळी मांडणी करणारी आहेत. यामधूनच भाषाविज्ञानाच्या अभ्यासाच्या अनेक शाखा उदयास आल्या आहेत. सोस्यूरचे व्याख्यानाच्या रूपाने उपलब्ध असलेले हे संशोधन अधिक मूलगामी असल्याने तोच आधुनिक भाषाविज्ञानाचा उद्गाता ठरतो. सोस्यूरचा 'कोर्स इन जनरल लिंग्विस्टिक्स' हा ग्रंथ त्याच्या मरणोत्तर त्याच्या शिष्यांनी प्रसिद्ध केला आहे. सोस्यूरच्या या प्रमेयालाच प्रमाण मानून वर्तनवाद्यांनी भाषाविज्ञानाची मांडणी केली आहे. 'वर्तनवादा' चा पाया घालणारा वॅटसन म्हणतो की, भाषा संपादन करीत असताना भाषक सर्वप्रथम शब्द आत्मसात करीत असतो किंवा शिकत असतो. भाषक जे शब्द आत्मसात करीत असतो त्या शब्दांचा संबंध पर्यावरणातील प्रत्यक्ष वस्तूशी (object) असतो. म्हणजे ध्वनी आणि

munotes.in

अर्थ यांच्यातील यादृच्छिक संबंध वॅटसनने नाकारला आहे. त्याच्या मते भाषा ही 'जैविक क्रिया' नाही. 'सफरचंद' हा शब्द पर्यावरणातील वस्तू 'सफरचंद' शी संबंधित असतो. शब्द आत्मसात केल्यानंतर भाषक वाक्य शिकत असतो. तेव्हा शब्दांमधील अंतर्गत संबंध (वाक्याच्या पातळीवरचे) आत्मसात करीत असतो. हे अंतर्गत संबंध कर्ता, कर्म, क्रियापदादी घटकांशी संबंधित असतात. वॅटसनचा हा सिद्धांत मूलरचित वाक्यांना लागू होणारा आहे. त्याचा हा सिद्धांत शैलीगत अर्थाच्या स्तरावरील शब्दांना (वाक्प्रचार, म्हणी इ.) किंवा वाक्यांना (व्यंजनात्मक अर्थाची वाक्ये, अनेकार्थी वाक्ये) जोडणे अशक्य आहे.

## १.४ ब्लूमफील्डचा भाषाविचार

ब्लूमफील्डचा 'भाषा' (Language 1933) हा ग्रंथ या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या मते, मूल जन्मतः भाषा घेऊन येत नाही. त्यामुळे भाषा ही जैविक क्रिया नसून ती आत्मसात करावी लागणारी क्रिया आहे. ब्लूमफील्ड पुढे म्हणतो, मानवी मन हे कोरी पाटी असते. मानवी मूल जन्मल्यानंतर हळूहळू सामाजिक आणि सांस्कृतिक आचरणांना 'चेतक प्रतिसाद' (stimuli response) देऊ लागते. यातूनच ते हळूहळू भाषा शिकू लागते. त्याने 'वाचिक वर्तन' ही संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. भाषेच्या माध्यमातून एकाने सांगितलेली गोष्ट किंवा केलेले कथन दुसरा माणूस तीच गोष्ट क्रियेच्या रूपाने करू शकतो. समजा 'शाम' नावाच्या एखाद्या व्यक्तीला शेतात चरत असलेली रिकामी गाय दिसली तर गायीने पिकाचे नुकसान करू नये म्हणून त्याने रामला 'राम गाय बांध' असे सांगितले असता; शामने केलेले कथन समजून घेऊन राम गाय बांधण्याची प्रत्यक्ष क्रिया करतो. येथे मुद्दा उपस्थित होतो तो हा की, भाषाच नसती तर शाम गाय बांधण्यास रामला सांगू शकला नसता. ती क्रिया स्वतः शामला करावी लागली असती. म्हणजेच ब्लूमफील्डच्या मते, मूक प्राण्याच्या क्रियात्मक वर्तनापेक्षा मानव भाषेच्या द्वारे 'वाचिक वर्तन' करू शकतो. ही वर्तनाची प्रक्रिया भाषेची प्रभावी उपयोगिता आहे. शामने उच्चारलेले ध्वनी राम तेव्हाच आत्मसात करू शकतो की, जेव्हा त्या वाक्यामागील राम आणि शामचे सामाजिक संकेत एकच असतात. हे संकेत म्हणजे रामने उच्चारलेल्या ध्वनींचा अर्थ होय. या अर्थाद्वारे शामने सांगितलेली क्रिया राम आपल्या वर्तनातून नियंत्रित करू शकतो. अशा तऱ्हेने भाषेचा द्विस्तरीय (ध्वनी, अर्थ) पातळीवर वापर होत असतो.

संप्रेषण हाच कोणत्याही भाषेचा प्रधान हेतू असतो. संप्रेषणाच्या पातळीवर सर्व भाषांचे कार्य एकच असल्याने कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना भाषेच्या 'शुद्धाशुद्ध'ते विषयीच्या पारंपरिक कल्पना नाकाराव्या लागतात. संरचनात्मक पद्धतीने भाषेच्या अभ्यासात व्यवहारभाषेचा विचार गृहीत धरलेला असतो; अर्थात लेखनासाठी वापरली जाणारी प्रमाणभाषा वर्ज्य असतेच असे नाही. वॅटसन, सोस्यूर, ब्लूमफील्ड, स्टॅटस् यांनी भाषेचा जो विचार केला त्याला वर्तनवादी अभ्यासपद्धती असे म्हटले जाते. वर्तनवाद्यांनाच 'अमेरिकन संरचनावादी' असे म्हणतात. वर्तनवाद्यांनी सोस्यूरच्याच भूमिकेचा विस्तार केल्यामुळे त्यांनी जरी भाषेच्या अर्थविचाराला प्राधान्य दिलेले नसले तरी; त्यांनी मांडलेला भाषाविषयक सिद्धांत आधुनिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासाला वेगळी दिशा देणारा आहे. भाषेचे 'मूलभूत नियम' शोधून त्यांची वैज्ञानिक दृष्टीने केलेली मांडणी उल्लेखनीय आहे.

भाषा ही जैविक नसून यांत्रिक क्रिया आहे या भूमिकेतून ब्लूमफील्ड मनोविज्ञानाला विरोध करतो. तो भौतिकवाद/यांत्रिकवाद (meterialistic/ machanistic) ग्राह्य मानून भाषेचे विश्लेषण करतो. त्याच्या मते बोलणे हे पर्यावरणातील समोरच्या घटनेवर अवलंबून असते. आपण पर्यावरणातील गोष्टी लक्षात ठेवून त्यानुसार वृत्ती बनवतो व भाषा आत्मसात करीत असतो. यानुसारच भाषेचा वापरही करीत असतो. म्हणून तो भाषिक संरचनेला आणि तिच्या कार्यप्रणालीला 'ट्रिगर मशीन' असे संबोधतो. भाषा ही मज्जातंतूव्यवस्थेद्वारे (nervous system) चालणारी व्यवस्था असून ती बटन दाबताच चालू होणाऱ्या ट्रिगरमशीनसारखी असते. म्हणूनच तो भाषेच्या अभ्यासात सर्वप्रथम स्थान ध्वनिविचारास अथवा 'स्वनिमविचारा' स स्थान देतो. स्वनिमविचार/स्वनिमविन्यास म्हणजे भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींच्या उच्चारण केंद्रांचे (वागिंद्रियांच्या आधारे) निरीक्षण करून स्वनांची स्थाने निश्चित केली जातात. तसेच एखाद्या भाषेत कोणकोणते स्वनिम वापरले जातात ते अभ्यासून त्यांचे वर्गीकरण केले जाते. हा अभ्यास पूर्णतः शरीरशास्त्राच्या आधारे केला जातो. मानव केवळ ध्वनींचा म्हणजेच स्वनिमांचा वापर करीत नसतो तर मर्यादित स्वनांच्या आधारे असंख्य अर्थपूर्ण संरचना तो तयार करून भाषिकसंप्रेषण करत असतो. अशा या अर्थपूर्ण संरचनेतील अर्थदृष्ट्या लघुतम घटक म्हणजे 'रूपिम' होय. रूपिमांच्या अभ्यासास रूपिमविचार /रूपिमविन्यास असे म्हणतात. ही भाषेच्या अभ्यासाची दुसरी पायरी आहे. 'शाळा, शाळेत, शाळेतील, शाळेमधल्या' हे सगळे रूढ अर्थाने आपण शब्दच मानतो. परंतु हे सर्व शब्द नसून त्यात काही रूपिम आहेत. शाळा हा मुक्त रूपिम आहे. 'शाळेत' या पदात 'शाळा+ए+त', 'शाळेतील' या पदात शाळा   ए+त+ईल ही रूपिमे मिळतात. 'शाळा+ए (सामान्यरूपाचा प्रत्यय) + (स्थळवाचक प्रत्यय) ईल (उत्तर प्रत्यय/ कार्यसूचकप्रत्यय)' असे वेगवेगळे अर्थपूर्ण घटक म्हणजे रूपिमे मिळतात. म्हणून 'शब्द' या संज्ञेतील संदिग्धता टाळण्यासाठी भाषेतील लघुतम सार्थ रूपांना रूपिम ही संज्ञा वापरून भाषेचा अभ्यास केला जातो. वेगवेगळ्या रूपिमांच्या, शब्दांच्या, भाषिक पदांच्या आणि वाक्यांच्या साहाय्याने मानव आपला भाषा व्यवहार करीत असतो. या रूपांच्या अर्थपूर्ण संरचनेला किंवा साखळीच्या संबंधास 'वाक्य' असे म्हणतात. वाक्यांचे वर्णनात्मक पद्धतीने विचार करण्याच्या पद्धतीस 'वाक्यविचार/वाक्यविन्यास' असे म्हणतात. वाक्यांचे प्रथमोपस्थित संघटक, नामपदबंध क्रियापदबंध आदी घटकांच्या अंगाने विश्लेषण केले जाते. या तीन स्तरांवर कोणत्याही भाषेचे विश्लेषण शक्य आहे, अशी संरचनावाद्यांची धारणा आहे. भाषेच्या अर्थाच्या बाबतीत अनेक मतभेद असल्याने अर्थविचाराकडे दुर्लक्ष करून, अर्थाला अभिव्यक्त करणाऱ्या ध्वनींना प्रमाण मानून, संरचनावाद्यांनी भाषेचा अभ्यास केला आहे. भाषिक संकेतांचे विश्लेषण करता येते; परंतु सांकेतिक वस्तूंचे विश्लेषण करता येत नाही. म्हणजेच ध्वनीमधून अभिव्यक्त होणारी अर्थरूपी वस्तू, तिचे विश्लेषण करणे अशक्य आहे; अशी त्यांची धारणा असल्याने भाषेच्या अभ्यासाची सुरुवात ध्वन्यात्म अर्थापासून होण्याऐवजी ध्वनीपासून व्हायला हवी असा त्यांचा आग्रह आहे.

## १.५ चॉम्स्कीचा भाषाविचार

चॉम्स्की लांग ऐवजी 'क्षमता' (competance) आणि परोल ऐवजी 'प्रयोग' (performance) या संज्ञा वापरतो. अर्थात सोस्यूरच्या आणि चॉम्स्कीच्या संकल्पनेत फरक आहे. लांग ही संज्ञा चॉम्स्कीने सोस्यूरपेक्षा वेगळ्या अर्थाने उपयोजिली आहे. तो लांग मधील अमूर्त भाषिक व्यवस्था नाकारून 'व्यक्तिगत क्षमते' वर (competance) भर देतो. त्याच्या मते क्षमता ह्या मनाच्या अंतर्गत स्तरांवर असून त्यांना शारीर अस्तित्व नसते. ह्या क्षमता मानवाला



munotes.in

जन्मतः प्राप्त झालेल्या असतात. भाषा शिकण्याची जी जैविक स्वरूपाच्या क्षमतेची यंत्रणा मानवी मनात असते त्यास चॉम्स्की 'भाषार्जनाची यंत्रणा' (Language Acquisition Device/ LAD) असे मानतो. भाषिक क्षमता या उत्पादनक्षम असल्याने भाषा शिकण्यासाठी, आकलनासाठी आणि भाषिक संरचना समजण्यासाठी उपयोगी ठरतात. भाषा शिकणे किंवा संपादन करणे म्हणजे संपूर्णतः नवी भाषा संपादन करणे नसते, तर जन्मतः प्राप्त असलेल्या भाषिक क्षमतांच्या आधारे भाषेचे नियम आत्मसात करणे असते. लहान मूल सर्वच भाषिक रचना ज्ञात नसूनही असंख्य शब्दांची आणि वाक्यांची निर्मिती करू शकते. याचे कारण त्याला जन्मतः प्राप्त होणाऱ्या भाषिक क्षमता हेच आहे. या क्षमता दुहेरी स्वरूपाच्या असतात. असंख्य शब्द, वाक्ये निर्माण करण्याच्या 'उत्पादनक्षमता' आणि संरचना समजून घेण्याच्या 'आकलनक्षमता'. अशा स्वरूपाचे दुहेरी कार्य या क्षमता करीत असतात. यालाच 'भाषा व्यवस्था' असे म्हणतात.

भाषिक क्षमतांच्या आधारे जेव्हा प्रत्यक्ष उच्चारण केले जाते तेव्हा त्यास 'प्रयोग' असे म्हणतात. हे प्रयोग चॉम्स्कीच्या मते त्या त्या व्यक्तीच्या क्षमतेशी संबंधित असतात. प्रयोग म्हणजे भाषकाचे प्रत्यक्ष 'भाषिक वर्तन' (linguistic behaviour) होय. प्रयोगामध्ये अर्थाचे वेगवेगळे घटक कार्यरत असतात. अर्थाचे घटक आणि अखंडता या आधारे भाषक प्रत्यक्ष प्रयोगाच्या म्हणजेच भाषिक वर्तनाच्या वेळी असंख्य वाक्यसंचांची निर्मिती करू शकतो. वाक्यसंचामध्ये त्या त्या भाषेचे व्याकरण कार्यरत असते. भाषक प्रत्यक्ष बोलू लागतो तेव्हा भाषा व्यवस्थेतील निर्मितीचे आणि आकलनाचे नियम कार्यरत होत असतात. हे जसे बोलणाऱ्याच्या बाबतीत घडते, तसेच ते ऐकणाऱ्याच्याही बाबतीत घडत असते. म्हणजेच भाषिक क्षमतेच्या आधारे भाषिक प्रयोग सुरू झालेले असतात. हे प्रयोग व्यक्तिगत असतात. भाषण ही क्रिया क्षणिक आणि दैनंदिन भाषिक संप्रेषणासाठी आवश्यक असणारी व्यवस्था असल्याने भाषणालाच 'भाषा व्यवहार' असे म्हणता येते.

परोल किंवा प्रयोग या संज्ञांचे 'भाषा व्यवहार' असे एकच पारिभाषिक रूप स्वीकारण्याचे कारण म्हणजे परोल ही संज्ञा केवळ व्यक्तिगत भाषण या अर्थाने वापरली जाते. तर प्रयोग ही संज्ञा भाषकाच्या केवळ व्यक्तिगत क्षमतेशी संबंधित आहे. परंतु 'भाषा-व्यवहार' हा केवळ व्यक्तिगत भाषणाचा किंवा ज्ञानाचा घटक नसतो. त्यात अनेक अ-भाषिक घटनाही असतात. यामध्ये सामाजिक समजुती, रूढी, परंपरा, भाषकाच्या भावना आणि त्याविषयीचा त्याचा दृष्टिकोण, संभाषणाविषयी भाषकाची भूमिका याबरोबरच त्याचा 'आवाज' असे अनेक घटक असतात. त्याचबरोबर 'कोठे, कसे बोलाव' याविषयीची जाणही त्यामध्ये गृहीत असते. या सर्वांनी मिळून भाषा व्यवहार होत असतो. म्हणून भाषा व्यवहार ही संज्ञा उपयोजिली आहे.

यावरून भाषा आणि भाषण म्हणजेच भाषा-व्यवस्था आणि भाषा व्यवहार यांमध्ये फरक आहे हे लक्षात येते. भाषा-व्यवस्था ही अमूर्त स्वरूपात असते. उलट भाषा-व्यवहार हे भाषा-व्यवस्थेचे प्रत्यक्षीकरण असते. आपण बोलू लागलो की, अमूर्त भाषा व्यवस्थेचे भाषा-व्यवहारात रूपांतर होते. वक्ता आणि श्रोता याशिवाय भाषाव्यवहार शक्य नसतो. येथे आणखी एक मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे. लेखन (writing level) हे सुद्धा भाषणच असते. लेखन हे भाषा-व्यवस्थेच्या आधारेच होत असते. लेखनातूनही भाषा व्यवहार साधला जातो. तो दैनंदिन भाषाव्यवहारापेक्षा थोडासा भिन्न असला तरी भाषा व्यवहारच असतो हे नाकारता येणार नाही. लेखनाच्या वेळी व्यक्तिगत 'शैली' चे गुणधर्म कार्यरत असतात. शैलीच्या सर्व घटकांचा विचारसुद्धा भाषा व्यवहारातच करावा लागतो.

भाषा व्यवस्था ही समाजमनाच्या स्मरणपुटीतील अव्यक्त अशी व्यवस्था असते. भाषा व्यवहार हा या अव्यक्त आणि अमूर्त अशा व्यवस्थेचा प्रत्यक्ष उद्गार असतो. भाषा व्यवहार करीत असताना प्रत्येकजण वेगळ्या पद्धतीने बोलत असला तरी, त्याचे सगळे भाषिक व्यवहाराचे संदर्भ भाषा-व्यवस्थेने सीमित झालेले असतात. भाषिक व्यवहार हा व्यक्तिगत आवाज, प्रादेशिक संदर्भ आदी घटकांशीही संबंधित असतो. त्याचबरोबर स्थल, काल, परिस्थिती यांचेही संदर्भ भाषा व्यवहारात असतात. या सर्व संदर्भामुळे भाषेच्या व्यवहाराला व्यक्तिविशिष्टतेचा संदर्भ प्राप्त झालेला असतो. भाषेच्या व्यवहाराशी संबंधित असणारे उपरोक्त सर्व घटक वगळून जी शिल्लक राहते ती भाषा-व्यवस्था असते. मराठी भाषा असे म्हटल्यानंतर एखाद्या विशिष्ट व्यक्तीची भाषा असे आपण गृहीत धरत नाही. एका समाजाची ती भाषा असते. सामाजिक एकता असूनही प्रत्येकजण वेगळ्याच तऱ्हेने भाषा व्यवहार करीत असतो. म्हणजे हा व्यवहार व्यक्तिगत असतो आणि या सर्वांना सामावून घेणारी व्यवस्था म्हणजे मराठी भाषा असते. भाषा-व्यवस्था चिरकाल टिकणारी व्यवस्था असते. भाषा व्यवस्थेची जी वैशिष्ट्ये असतात ती 'सार्वत्रिक' (universal) स्वरूपाची असतात. म्हणजेच ही वैशिष्ट्ये जवळपास सर्व भाषांत कमी अधिक प्रमाणात आढळतात. यामधून 'सामान्य व्याकरण' (universal grammar) उदयास आले. याउलट भाषिक व्यवहार हा क्षणिक स्वरूपाचा आणि वेगवेगळ्या म्हणजे भिन्न वैशिष्ट्यांनी युक्त असतो. पामरसारखे काही भाषावैज्ञानिक भाषा व्यवस्था आणि भाषा व्यवहार यातील भेद अमान्य करतात. त्यांच्या मते भाषा व्यवहार हे भाषा-व्यवस्थेचेच प्रतिक्रिया रूप असते. हे विधान वरवर पटणारे असले तरी ते तितकेसे खरे नाही. भाषा व्यवहार हा वेगवेगळ्या स्वरूपाचा असतो. घरी येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करणे ही एकच घटना ग्रामीण आणि शहरी भागात भिन्न पद्धतीने अभिव्यक्त होईल. म्हणजे घटना एकच असून भाषिक अभिव्यक्तीच्या पातळीवर ती बदलणारी असते. यामुळे भाषेमध्ये हे भेद मान्यच करावे लागतात. भाषेच्या अभ्यासासाठी आणि त्या अभ्यासास सार्वत्रिक स्वरूप प्राप्त होण्यासाठीही या दोन घटकांचा फार फायदा होतो. भाषाव्यवस्था आणि भाषाव्यवहार यामधील भेद अमान्य केला की, कोणत्याही अर्थाने भाषेच्या अभ्यासाला पूर्णत्व येणार नाही. कारण व्यक्तीची भाषा, समाजाची (विशिष्ट जातीच्या) भाषा, प्रादेशिक भाषा असे अनेक प्रकार गृहीत धरूनही भाषेच्या अभ्यासाचे सार्वत्रिक निकष शोधण्यासाठी भाषा व्यवहारापेक्षा भाषा-व्यवस्थाच महत्त्वाची ठरते. तरीही भाषा व्यवस्था आणि भाषा व्यवहार यात फरक आहे हे मान्यच करावे लागते.

भाषा म्हणजे लेखन नसून ती बोलली जाणारी व्यवस्था आहे. यावर अलीकडे भर दिला जाऊ लागला आहे. याचे कारण भाषेचे उच्चाररूप हे अतिशय विश्वसनीय आहे. त्यामानाने तिचे लेखन ही बाब दुय्यम ठरते. साहजिकच कोणतीही भाषा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ ठरत नाही. प्रत्येक व्यक्तीच्या विशिष्टतेचा भाषेच्या व्यवहारावर परिणाम होत असल्याने भाषेचे स्वरूप भिन्न असलेले आढळते. पण ते श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असत नाही. म्हणूनच आजच्या साहित्यात परंपरेने दुय्यम समजल्या गेलेल्या व्यवहारभाषेचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. भाषेकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात अशा स्वरूपाचे मूलभूत बदल होऊ लागले आहेत. भाषेच्या अभ्यासाला अधिकाधिक सार्वत्रिकता प्राप्त होत आहे. भाषा व्यवस्था आणि भाषा व्यवहार यात केला जाणारा भेद हे याचेच उदाहरण आहे. थोडक्यात, भाषा व्यवहाराच्या स्वरूपाचा अनेकविध पातळ्यांवर विचार होऊ लागला आहे. अभ्यासाला अधिकाधिक सार्वत्रिकता प्राप्त होत आहे.

चॉम्स्कीने आपल्या भाषाविचारात अर्थविचार महत्त्वाचा मानला आहे. अर्थविचाराला प्रधान मानून भाषा ही 'मनोविज्ञाना' ची एक शाखा आहे, असे सांगून मनोवैज्ञानिक पद्धतीने

भाषेचा अभ्यास चॉम्स्कीसह अनेक मनोविज्ञानवाद्यांनी केला आहे. नोम चॉम्स्की हा या परंपरेतील महत्त्वाचा भाषावैज्ञानिक आहे. चॉम्स्कीच्या परंपरेत हॅले, पिगेट, फोदोर, स्टीनबर्ग असे अनेक अभ्यासक आहेत. मनोविज्ञानवाद्यांनी संरचनावाद्यांच्या काही गोष्टींवर आक्षेप घेतले आहेत. संरचनावाद्यांच्या मते भाषा आत्मसात करावी लागणारी क्रिया आहे. ती आनुवंशिक नाही. यावर चॉम्स्कीने आक्षेप घेतला आहे. त्याच्या मते भाषा ही जैविक क्रिया आहे. आनुवंशिकतेने जन्मतः माणसाच्या स्मरणपुटीत भाषिक क्षमता असतात. मूल भाषा शिकते म्हणजे भाषेचे नियम आत्मसात करीत असते. भाषा आत्मसात करण्याच्या 'क्षमता' त्याला जन्मतः प्राप्त झालेल्या असतात. यामुळे भाषा ही बहुतांशी जैविक क्रिया आहे. प्रत्येक भाषेची संरचना 'अनन्यसाधारण' असते या संरचनावाद्यांच्या विधानावरही चॉम्स्कीने हल्ला केला आहे. त्याच्या मते, भाषांमध्ये भेदांपेक्षा साम्ये अधिक असतात. भाषाभाषांमधील भेदसुद्धा काही मूलभूत तत्त्वांनी सीमित झालेले असतात, असे त्याचे म्हणणे आहे. भाषाभाषांमधील साम्यांना त्याने 'भाषिक सार्वत्रिकता' असे संबोधून ' सार्वत्रिक व्याकरणा' ची मांडणी केली आहे. कोणत्याही भाषेत उद्गारवाचक प्रश्नार्थक, विधानार्थी वाक्ये एका समान तत्त्वांनीच निर्माण होत असतात. त्यामुळे भाषेतील 'अनन्यसाधारणता' गैरलागू ठरते. त्याचबरोबर संरचनावाद्यांनी जी पद्धती विकसित केली आहे, ती अतिशय काटेकोर असल्याचे त्याने लक्षात आणून दिले. या पद्धतीनुसार फक्त आकलनसुलभ, निरीक्षणसुलभ (अर्थदृष्टीचा) वाक्यांचेच विश्लेषण करता येते. संदिग्ध अर्थ असलेल्या वाक्यांचे विश्लेषण या पद्धतीने करता येत नाही हे दाखवून त्यासाठी 'रचनांतरण' पद्धती कशी महत्त्वाची आहे, हे चॉम्स्कीने स्पष्ट केले.

उदा.राम आला तसा निघून गेला. या विधानात 'निघून गेला' या दुसऱ्या पदबंधात कोणताही कर्ता नाही. आपणांस मराठी अवगत नसेल तर राम आला; परंतु 'कोण ( ?) निघून गेला' हे कळणार नाही. हे वाक्य समजून घेण्यासाठी वाक्यातील अर्थाची संरचना लक्षात घ्यावी लागते. 'तसा' या पदाने दुसऱ्या पदबंधातील राम अद्याहृत ठेवला आहे. ही संदिग्धता रचनांतरणाच्या आधारेच समजून घ्यावी लागते. चॉम्स्कीच्या मते स्वनिम-रूपिम-वाक्य या पद्धतीने भाषेचा समग्र अभ्यास करता येत नाही. तसेच भाषा भिन्न असल्या तरी त्यांचा अभ्यास संरचनावाद्यांच्या मताप्रमाणे एकाच पद्धतीने करता येऊ शकतो, अशी पद्धत अद्याप सापडलेली नाही. त्याच्या मते भाषाभ्यासकांनी 'भाषिक क्षमता' चा शोध घेतला पाहिजे. या क्षमतांमध्ये सर्व व्याकरणिक व्यवस्था जन्मतः अस्तित्वात असतात. त्या व्यवस्थांचा अभ्यास करणे हे भाषाभ्यासकाचे कार्य आहे, अशी त्याची भूमिका आहे. भाषेचा व्याकरणिक अभ्यास करणे म्हणजेच भाषेतील मूलभूत नियमांचा शोध घेणे असते. भाषेचे हे अंगभूत नियम वाक्यांच्या अनुषंगाने व्यक्त होत असल्याने 'वाक्यविन्यास' केंद्रिभूत वाक्यांचा अर्थाच्या अंगाने शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

चॉम्स्कीच्या सिद्धांतास 'Standard Theory Grammer' या नावाने ओळखले जाते. हा सिद्धांत रचनांतरणावर आधारित आहे. भाषेचे 'अंगभूत नियम' किंवा वाक्यांच्या आणि एकूणच भाषेच्या विकासाची सूत्रे अंतःस्तरीय रचनेमध्ये असतात. रचनांतरणाच्या नियमांमधून अंतःस्तरीय रचनेचे (अर्थाची रचना) पृष्ठस्तरीय रचनेच्या (ध्वनींची रचना) स्तरावर परिवर्तन होत असते. म्हणजेच व्यक्त करावयाचा मनातील आशय जेव्हा ध्वनीच्या उच्चारांमधून अभिव्यक्त होतो तेव्हा भाषेचा अंतःस्तर स्वनांच्या रूपाने पृष्ठस्तरीय पातळीवर 'वाक्यांच्या रूपाने अधोरेखित होत असतो. यामुळेच चॉम्स्कीने वाक्यविचारास प्राधान्य दिले आहे. राम 'आला आणि निघून गेला' अशी दोन वाक्ये 'तसा' या उभयान्वयीने जोडली आहेत. परंतु दुसऱ्या

वाक्यातील कर्ता अद्याहृत आहे. ती संदिग्धता अंतःस्तरावर होणाऱ्या रचनांतरणाच्या नियमांच्या आधारे सिद्ध करता येते. या रचनांतरणाच्या पद्धतीने अनेकार्थता, लोप, समानार्थता याचबरोबर अन्वयार्थ, अर्थभेद, विरुद्धार्थता, सार्थता, अर्थहीनता, अर्थपुनरुक्ती आदींचाही विचार करता येतो.

अर्थविन्यास (Semantics) हा चॉम्स्कीच्या सिद्धांताचा पायाभूत घटक आहे. त्याने अर्थाच्या अनुषंगाने वाक्यविचार केलेला आहे. पृष्ठस्तरीय वाक्ये ही अंतःस्तरावर तयार होणाऱ्या आशयाची प्रतीकात्मक रूपे असतात असे सिद्ध करून 'रचनांतरणाच्या' (tranformantion) आधारे वाक्यांचे विश्लेषण करता येते, असे त्याने म्हटले आहे. सर्व भाषिक अर्थ किंवा अर्थविषयक ज्ञान काहीशा प्रतीकात्मक चिन्हव्यवस्थेने म्हणजेच पृष्ठस्तरीय संरचनेनेच संपन्न होत असते. आपण प्रत्यक्ष जे बोलत असतो म्हणजेच 'भाषिक प्रयोग करीत असतो, ते मनातील 'भाषिक क्षमते' ने नियंत्रित झालेले असतात. भाषिक क्षमतेमध्ये तिचे स्वतःचे असे काही अंगभूत नियम दडलेले असतात. या नियमांनीच पृष्ठस्तरावर भाषा अभिव्यक्त होत असते. म्हणजे भाषेसाठी आवश्यक असणारे घटक 'शब्दनिधी' आणि शब्दनिधींच्या माध्यमातून विकसित होणाऱ्या वाक्यांचे अंगभूत असे 'विस्तारांचे नियम' असे दुहेरी घटक क्षमतेमध्ये असतात. शब्दांनी वाक्य बनते. म्हणून शब्द हे भाषेचे प्रधान घटक (स्वनिम गृहीत धरून) मानावे लागतात. पण केवळ शब्द म्हणजे भाषा नसते. वाक्यांच्या स्तरावर विशिष्ट अशी संरचना तयार होत असते. या संरचनेचे नियमही भाषिक क्षमतेमध्ये दडलेले असतात. म्हणूनच चॉम्स्कीच्या मते भाषा ही जैविक क्रिया आहे.

भाषेच्या पायाभूत नियमांमध्ये आणि शब्दनिधीमध्ये अनेक असंस्कारित घटक असतात; तसेच भाषिक रचनेची पायाभूत कौशल्येही असतात. भाषकाच्या काही व्यक्तिगत कल्पनाही असतात. या घटकांच्या आधारे मानव भाषिक संप्रेषण करीत असतो. 'काय सांगायचे' हा संदेशित आशय बोलणाऱ्याच्या मनात तयार होतो. यावेळी असंख्य रचना त्याच्या मनात तयार झालेल्या असतात. ही प्रक्रिया अंतः स्तरावर होत असते. बोलणारा जेव्हा प्रत्यक्ष आशय स्पष्ट करू पाहतो, तेव्हा सर्वप्रथम अर्थविन्यासाचे नियम कार्यरत झालेले असतात. यामध्ये रूपिमे, भाषिक रूपे, वाक्ये, माहिती, ज्ञान आदींचा समावेश असतो. बोलणारा प्रत्यक्ष आवाजाची निर्मिती करतो म्हणजेच रचनांतरणाच्या नियमांच्या आधारे अर्थाला अथवा आशयाला तो भाषिक प्रतीकात्मकतेने प्रकट करतो. यावेळी पृष्ठस्तरीय रचना तयार झालेली असते. प्रतीकात्मकता म्हणजे आशयाला किंवा वस्तू तसेच ध्वनीला दिलेले भाषिक संकेत / खुणा / चिन्ह होय. या भाषिक प्रतीकांचा आधार घेऊन बोलणारा गर्भित अर्थाचे प्रकटीकरण करीत असतो, तेव्हा त्याच्या मनातील काही हेतूही त्यामध्ये दडलेले असतात.

थोडक्यात, भाषेच्या अंतःस्तरावर कार्यरत असणारे घटक रचनांतरणाच्या नियमाने पृष्ठस्तरीय पातळीवर प्रकट होत असतात. ध्वनींचे प्रतिमांकन म्हणजे प्रत्यक्ष ध्वनींना (sound) दिलेले उच्चाररूप (phone) असते. म्हणून चॉम्स्की म्हणतो की, भाषेचे व्याकरण हे ध्वनी आणि अर्थ यांच्यातील संबंध प्रस्थापित करणारे शास्त्र आहे. (स्टेनबर्ग, पृ. ४०)अशा व्याकरणाचा शास्त्रीय पद्धतीने शोध घेणे हे भाषाविज्ञानाचे प्रथम आणि प्रधान कार्य आहे, असे चॉम्स्कीला वाटते. चॉम्स्कीच्या सिद्धांतास प्रमाण मानून भाषिक प्रयोग, व्याकरण आणि मानसशास्त्रीय वस्तुस्थिती यांच्यातील संबंध स्टेनबर्गने अतिशय सूक्ष्मपणे अभ्यासले आहेत. तसेच त्याने मन, भाषा आणि विचार यांच्यातील संबंधांबरोबरच मूल भाषा कसे शिकते याविषयी मूलभूत विवेचन

केले आहे. स्टेनबर्गच्या मते, आपल्या मनात जो आशय निर्माण होतो तो अनेक गोष्टींनी बद्ध झालेला असतो. सर्वप्रथम मनात ज्या घडामोडी होतात त्या भावनिक आणि वैचारिक असतात. या घडामोडींमध्ये परंपरेने आणि आनुवंशिकतेने चालत आलेले ज्ञान (knowledge) असते. तसेच या वैचारिक चलनवलनामध्ये ज्ञानाबरोबरच विचार निर्मितीच्या संकल्पनांचा साठा असतो. अशा घडामोडींना शारीरिक आणि मानसिक प्रक्रियेतून उत्तेजन दिले जाते. ज्ञानामध्ये केवळ पारंपरिकता आणि आनुवंशिकता नसते, तर भाषेशिवाय कार्यरत असणारी सार्वत्रिकता म्हणजेच भाषेशी संबंधित संकल्पनात्मक घटक असतात. हे संकल्पनात्मक घटक म्हणजेच वाक्यनिर्मितीचे सर्वसामान्य नियम म्हणजेच मनात चालू असणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया ह्या ज्ञान, संकल्पनात्मक मूलतत्त्वे आणि घडामोडींनी(वैचारिक, भावनिक) बद्ध झालेल्या असतात. उपरोक्त पद्धतीने घडणाऱ्या मानसिक प्रक्रियेमध्ये मानवी हेतू (purpose) आणि विधाने (proposition) दडलेली असतात. हेतूमध्ये कोणाशी तरी संवाद साधण्याची इच्छा असते. हेतुप्रेरित संवादामधून आविष्कृत होणाऱ्या (प्रकटणाऱ्या) विधानांमध्ये भाषकाचे म्हणजेच बोलणाऱ्याच्या मनातील उद्गार, आज्ञा, प्रश्न, संकेत इत्यादी घटकांचा समावेश असतो. संप्रेषण केवळ एवढयाच हेतूने होत नसते. त्यामध्ये मानवाला व्यक्तिगत स्तरावर प्राप्त झालेल्या भाषिक ज्ञानाचाही समावेश असतो. हे भाषिक ज्ञान विशिष्ट भाषेशी संबंधित असते. यामधून त्याची वाक्यनिर्मितीची प्रक्रिया सुरू होते. मराठी भाषक 'कर्ता + कर्म + क्रियापद' यापद्धतीने वाक्याचा विचार करेल, तर इंग्रजी भाषक 'कर्ता + क्रियापद + कर्म' या पद्धतीने विचार करेल.

उपरोक्त घटकांच्या आणि घटितांच्या आधारे नियंत्रित झालेला मन:पटलावरील विचार संप्रेषणाच्या दृष्टीने पूर्ण झालेला असतो. यालाच अर्थविचाराची किंवा 'अर्थाची प्रतीकात्मकता' (Semantic Representation) म्हणतात. या अर्थाच्या प्रतीकांमध्ये किंवा संकेतांमध्ये भाषकाचा संदेश असतो. या संदेशात वैश्विक, भाषिक आणि काही पारंपरिक मूळ (असंस्कारित) घटक असतात. या संदेशाचा उच्चार करण्यापूर्वी भाषकाला आत्मसात असलेल्या भाषेच्या रचना कौशल्याचा (basic strategies) वापर करावा लागतो. ही कौशल्ये भाषेची अंगभूत कौशल्ये असतात. म्हणूनच अशिक्षित माणूसही या कौशल्यांचा अतिशय कलात्मकतेने वापर करू शकतो. म्हणी, उखाणे, कोडी, लोकगीते, लोककथा आदी लोकवाङ्मयातील 'लोक' कौशल्ये अभ्यसनीय आहेत. मनामध्ये अनेक भाषिक आणि सार्वत्रिक आदिबंध जन्मतः असतात. सर्वप्रथम ते निराकार असतात. व्यक्ती ज्या भाषिक समाजामध्ये जन्माला येते, त्या भाषिक वैशिष्ट्यांनी हे निराकार आदिबंध आकार घेऊ लागतात. यालाच मूळ असंस्कारित घटक असे म्हटले आहे. भाषेच्या आदिबंधात्मक कौशल्याच्या आधारे भाषक आशयाचे प्रत्यक्ष उच्चारण करतो तेव्हा रचनांतरणाचे नियम कार्यरत होतात. रचनांतरणाच्या वेळी भाषक आपल्या संग्रही असलेल्या भाषेतील विविध रूपांचा वापर करीत असतो. या संग्रहित रूपांमध्ये (stored items) स्वनिम, रूपिम, भाषिक पदे, पदबंध, वाक्ये यांचा समावेश असतो. याचबरोबर अर्थ, माहिती याही गोष्टी यामध्ये येतात. या संग्रहित (भाषिक) रूपांच्या आधारे भाषक पृष्ठस्तरीय रचना करत असतो. यावेळी स्वनिमविन्यासाचे नियम कार्यप्रवण होतात. अशा रीतीने मनातील आशय ध्वनींच्या रूपाने अभिव्यक्त होतो, त्यास 'ध्वन्यात्म प्रतीकात्मकता (PhoneticRepresentation) असे म्हणतात. ध्वन्यात्म प्रतीकांचा वापर करणे म्हणजेच प्रत्यक्ष उच्चारण करणे, उद्गार काढणे प्रत्यक्ष 'उच्चारणाच्या कृती' (articulatory operations) आपण मेंदू, जीभ, तालु, दात, ओठ इत्यादी शरीरावयवांच्या हालचालींना ताब्यात ठेवून करत असतो. उच्चारणाच्या कृती स्वनात्म संकेतांनी / खुणांनी म्हणजेच स्वनिमांनी बद्ध होतात.

## १.६ वर्णनात्मक भाषाविज्ञान

भाषाविज्ञान ही संज्ञा 'वर्णनात्मक' (descriptive) आहे. एखादा भाषिक समाज प्रत्यक्ष व्यवहारामध्ये जी भाषा वापरतो तीच भाषा भाषाविज्ञानाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची मानली जाते. व्यवहारभाषेचा अभ्यास करून भाषेचे 'सार्वत्रिक' नियम शोधण्याचा प्रयत्न हे भाषाविज्ञान करत आहे. यामुळे भाषेच्या पारंपरिक आदेशात्मक नियमांना आपोआपच काटशह मिळाला. भाषेचा अभ्यास करताना भाषावैज्ञानिक भाषेकडे 'साधन' म्हणून न पाहता 'माध्यम' म्हणून पाहतात. यामुळे भाषेचे स्वतंत्र अस्तित्व आणि महत्त्व अधोरेखित होते. भाषेला जीवनाचे साधन न मानता ती जीवनाचा अविभाज्य घटक आहे असे हे अभ्यासक मानतात. शिल्पकाराचे साधन छिन्नी आणि हातोडा हे आहे, तर दगड हे माध्यम आहे. ब्रश, कॅनव्हास हे चित्रकारांचे 'साधन' मानता येईल तर रंग हे त्यांचे 'माध्यम' मानावे लागेल. दगडाशिवाय शिल्प आणि रंगाशिवाय चित्र शक्य नसते म्हणून त्यांना माध्यम म्हणतात. त्याच पद्धतीने भाषेशिवाय जीवन शक्य नाही; ही दृष्टी विकसित झाल्याने भाषेला 'साध्य' मानण्याची वृत्ती भाषाविज्ञानात प्रमुख मानली जाते. साहजिकच भाषेचा अभ्यास करताना किंवा तिचे नियम शोधताना भाषावैज्ञानिक वस्तुनिष्ठ आणि साध्यात्मक दृष्टीने भाषेकडे पाहतात. परंतु प्रस्तुत नियम हे भाषेचे 'नमुने' नसतात. भाषेचे नमुने तयार करणे ही गोष्ट भाषाविज्ञान कटाक्षाने टाळते. म्हणूनच भाषाविज्ञानाला 'न-नमुनात्मक' (non-normative) विज्ञान असेही म्हणतात, भाषेचे वर्णनात्मक नियम शोधताना तिचे स्वाभाविक/नैसर्गिक स्वरूप लक्षात घेतले जाते. स्वाभाविकतेमध्ये भाषेच्या वापराची 'सहजप्रेरणा' (Instinct) आणि सामाजिकता गृहीत असते. भाषेचे सामाजिक वर्तन येथे प्रमाण मानले जाते. यामुळे 'नाही मी येणार','मला नको पाहिजे' अशी वाक्ये पारंपरिक व्याकरणकर्ते तर्काच्या कसोटीवर चुकीची ठरवतात. पण भाषावैज्ञानिक या रूपांनाच महत्त्व देतात. अशी वाक्ये रचनांतरणाचे नियम लावून सिद्ध केली जातात.

भाषेची स्वायत्तता हा विषय काही अंशी वादग्रस्त असला तरी तिचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करून अभ्यास होऊ लागला आहे. भाषावैज्ञानिक भाषेचा अभ्यास करताना 'प्राकृतिक भाषे' चे (natural language) अस्तित्व गृहीत धरतात. यालाच व्यापक अर्थाने 'भाषा' असे म्हणता येईल. यामुळे भाषेचा अभ्यास करताना भाषेतील सार्वत्रिक नियम शोधण्याचा प्रयत्न केला जातो. साहजिकच भाषाविज्ञानाचा संबंध एखाद्या विशिष्ट भाषेशी येत नसून 'भाषाव्यवस्थे' शी (language system) येतो. यामधूनच 'सामान्यभाषाविज्ञान' (General linguistics) आणि 'वर्णनात्मक भाषाविज्ञान' (Descriptive linguistics) उदयास आले आहे. सामान्य भाषाविज्ञान भाषेच्या सार्वत्रिकतेचे नियम शोधत असल्याने भाषिक संकल्पना, भाषिक नियम आदी संकल्पनात्मक गोष्टी, एखाद्या विशिष्ट भाषेचा (Perticular language) अभ्यास करण्यासाठी म्हणजेच भाषेचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करण्यासाठी पुरविते. तर वर्णनात्मक भाषाविज्ञान एखाद्या विशिष्ट भाषेचा अभ्यास करीत असल्याने भाषिक सामुग्री (data) सामान्य भाषाविज्ञानाला पुरविते. वर्णनात्मक पद्धतीने पुरविलेल्या सामुग्रीच्या आधारे सामान्य भाषाविज्ञान 'भाषिक सामान्यां' चा शोध घेत असते. अर्थातच, दोन्ही अभ्यास पद्धती एकमेकींशी संबंधित आहेत.

थोडक्यात, भाषेची संकल्पनात्मक मांडणी म्हणजे सामान्य भाषाविज्ञान आणि एखाद्या विशिष्ट भाषेचा वस्तुनिष्ठ अभ्यास म्हणजे वर्णनात्मक भाषाविज्ञान होय. 'प्राकृतिक/नैसर्गिक

munotes.in

भाषा' असे म्हणत असताना, यामध्ये 'भाषा म्हणजे कार्य' हा प्रश्न दडलेला आहे. 'भाषा म्हणजे काय ?' याचे जे उत्तर दिले जाते ते प्राकृतिक भाषेशी संबंधित असते. भाषा ही मर्यादित ध्वनींची आणि असंख्य वाक्यांची बनलेली असते (चॉम्स्की). प्रस्तुत असंख्य वाक्ये मर्यादित ध्वनींनी अभिव्यक्त होत असतात. तसेच भाषेची द्विस्तरीय संरचना, उत्पादनक्षमता, नवनिर्मिती, अदलाबदल, संस्कृतिसंक्रमण आदी जी वैशिष्ट्ये हॉकेटने सांगितली आहेत; ती वैशिष्ट्ये प्राकृतिक भाषेचीच आहेत. मानवी आणि मानवेतर प्राण्यांचे जे संप्रेषण होते, त्या संप्रेषणाचा विचारही प्राकृतिक भाषाभ्यासाशीच संबंधित आहे. ही जी भाषेची संकल्पनात्मक वैशिष्ट्ये सांगितली जातात ती 'सामान्य भाषाविज्ञाना' चा भाग असतात. पण भाषेबद्दल किंवा भाषेच्या वैशिष्ट्यांबद्दल जी विधाने केली जातात ती भाषिक सामुग्रीच्या आधारेच. आणि ही भाषिक सामुग्री (कच्चामाल) पुरविण्याचे कार्य 'वर्णनात्मक भाषाविज्ञान' करत असते. हे भाषाविज्ञान एखाद्या भाषेशी संबंधित असते. उदाहरणार्थ, भाषेत नामे आणि क्रियापदे असतात हा अभ्युपगम सामान्य भाषाविज्ञानाने सिद्ध केलेला असतो. हे अभ्युपगम एखाद्या भाषेला लावून त्याचा प्रत्यक्ष प्रायोगिक पुरावा तपासण्याचे कार्य वर्णनात्मक भाषाविज्ञान करते. सामान्य भाषाविज्ञानाच्या 'नाम' आणि 'क्रियापद' या संकल्पनात्मक संज्ञा लक्षात घेतल्याशिवाय एखाद्या भाषेतील नामे आणि क्रियापदे यांच्यातील फरक अधोरेखित करणे अशक्य होते.

प्रत्यक्ष व्यवहारात भाषा कशी वापरली जाते याचा अभ्यास वर्णनात्मक भाषाविज्ञान करते. भाषेच्या अभ्यासासाठी जे नमुने घेतले जातात ते प्राधान्याने व्यवहार भाषेतील असतात. भाषाविज्ञानात भाषेचे वस्तुनिष्ठ 'वर्णन' केलेले असते, मूल्यमापन नव्हे. यामुळे इतर भाषांचे व्याकरणिक आदेश भाषाविज्ञान नाकारते, वैज्ञानिक दृष्टीने भाषेचा अभ्यास करणे म्हणजे भाषेतील गृहीत प्रमेयांचा/अभ्युपगमांचा (hyphothesis) शोध घेणे. हा शोध भाषेचा असतो; कोणत्याही विशिष्ट भाषेचा नसतो. भाषेतील स्वनिम, रूपिम, शब्द, भाषिक रूपे, वाक्यांश, वाक्य, अर्थ आदी घटकांचा अभ्यास भाषाविज्ञानात केला जातो. भाषाही सामाजिक संस्था असल्याने तिच्यातील स्वाभाविकता आणि लवचिकता गृहीत धरलेली असते. साहजिकच भाषेतील शुद्धाशुद्ध विवेक, भाषेचे नमुने तयार करणे या गोष्टी येथे नाकारल्या जातात. उच्चारित रूपांना म्हणजे व्यवहारभाषेच्या वापरास प्राधान्य दिल्याने भाषा आणि साहित्याची भाषा या गोष्टी भिन्न आहेत हे सिद्ध झाले. प्रथम भाषा असते. या भाषेचा माध्यम म्हणून साहित्यात वापर होत असतो. साहित्य ही भाषेच्या माध्यमातून अस्तित्वात येणारी गोष्ट असल्याने भाषेच्या तुलनेत साहित्य परोपजीवी ठरते. याच भूमिकेतून लिखित भाषेचे प्रमाणरूप भाषावैज्ञानिक नाकारताना दिसतात.

भाषेचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास सर्वप्रथम सोस्यूरने आणि नंतर ब्लूमफील्ड आदी अमेरिकन संरचनावाद्यांनी केला. त्यांनी भाषेची 'अनन्यसाधारणता' गृहीत धरली होती. संरचनावाद्यांच्या काही भूमिकांवर मूलभूत आक्षेप घेऊन चॉम्स्कीने रचनांतरणवादी व्याकरणाची निर्मिती करून भाषेच्या अभ्यासाला आत्यंतिक महत्त्वाची अशी सैद्धांतिक बैठक प्राप्त करून दिली. पारंपरिक भाषाभ्यास हा ऐतिहासिक पद्धतीने झाला आहे. 'भाषेकडे साधन' म्हणून पाहिल्याने श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या भूमिकेतून भाषेचे मूल्यमापन झालेले दिसते. मूल्यमापनासाठी वापरली जाणारी भाषा ही अभिजनांची प्रमाणभाषाच होती. प्रमाणभाषेचेच कृत्रिम नमुने घेतल्याने जे व्याकरण तयार झाले ते परिपूर्ण होते असे म्हणता येत नाही. तरी याच व्याकरणाचे नियम महत्त्वाचे मानले जातात. या व्याकरणाला 'आदेशात्मक व्याकरण' असे म्हणतात. उदाहरणार्थ संस्कृत भाषेचे नियम आजही मराठी भाषेला लावले जातात. लॅटिनचे नियम इंग्रजीला आजही

लावले जातात. याचा अर्थ आजच्या मराठी, इंग्रजी भाषा प्रचंड प्रमाणात बदललेल्या असूनही त्यांचा अभ्यास या आदेशात्मक व्याकरणाच्या अंगानेच केला जातो. असा अभ्यास चुकीचा आहे, हे वर्णनात्मक भाषाविज्ञानाने नाकारले आहे. पारंपरिक भाषाभ्यासाच्या या परंपरा नाकारून आधुनिक भाषाविज्ञानाने प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहारात जी भाषा बोलली जाते, त्या व्यवहारभाषेचाच अभ्यास केला आहे. हा अभ्यास वर्णनात्मक, वस्तुनिष्ठ, आणि साध्यात्मक दृष्टीने करण्यावर भर देण्यात येऊ लागला आहे.

## १.७ भाषाविज्ञानातील 'विज्ञाना' चे स्वरूप

भाषाविज्ञानातील 'विज्ञान' ही संकल्पना 'सामाजिक विज्ञाना' मधील विज्ञानांशी जवळ जाणारी आहे. विज्ञान (science) ज्या पद्धतीने तर्कसंगतीला, वस्तुनिष्ठतेला महत्त्व देते, त्याच पद्धतीने भाषाविज्ञानही तर्कसंगत आणि तर्कनिष्ठ पद्धतीने भाषेचा अभ्यास करते. पण भाषाविज्ञानाच्या अभ्यासपद्धती या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आदी शास्त्रांमधील 'जडते'शी (pure) आणि 'प्राचीनत्वा'शी (primitive) संबंधित नसतात. प्रयोगाधारे सिद्ध झालेले शास्त्रीय सिद्धांत आदिमतेशी संबंधित असून कालांतरानेही स्वीकारले गेल्याने त्यांना प्राचीनत्व येते. तसे भाषेतील सिद्धांत शास्त्रीय सिद्धांतांसारखे चिरंतन नसतात, म्हणजेच ते बदलणारे असल्यामुळे ते 'प्राचीनत्वा'शी आणि 'जडते'शी संबंधित नसतात. तर त्या पद्धती मानसशास्त्र, समाजशास्त्र आदी मानव्यविज्ञानांमधील (human sciences) वैज्ञानिक पद्धतीशी जवळ जाणाऱ्या असतात.

लिंग्विस्टिक्स ही मूळ लॅटिन संज्ञा आहे. 'Lingua'(जीभ) या शब्दावरून 'Linguistics' ही संज्ञा रूढ झाली आहे. तर फ्रान्समध्ये आजही 'Linguitique' ही संज्ञा रूढ आहे. 'Linguistics' या संज्ञेतच 'philology' या भाषाभ्यासातील 'logy' हा शब्द नाकारला आहे. 'logy' तील तर्क, अनुमान, तत्त्वज्ञान या गोष्टींचा भाषाविज्ञानात अंतर्भाव होत नाही. त्याचबरोबर या संज्ञेत 'science' ही संज्ञाही जाणीवपूर्वक नाकारल्याचे दिसते. याचे कारण 'science' मधील आत्यंतिक तर्कनिष्ठता, प्रत्यक्ष प्रयोग, अनुमानावर आणि निरीक्षणावर भिस्त तसेच त्यामधील जडता आणि प्राचीनत्व या गोष्टींना भाषाविज्ञानात महत्त्व नसल्याने 'science' ही संज्ञा स्वीकारली नाही. तर भाषाविज्ञानात 'science' नसून 'scientific methods' (वैज्ञानिक पद्धती) अंतर्भूत आहेत. म्हणून डेव्हिड फ्रायस्टल म्हणतो की, 'भाषाविज्ञान म्हणजे भाषेचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणे होय.'

भाषेचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करताना भाषेचे 'कार्य' कसे चालते याचा शोध या पद्धतीत घेतला जातो. भाषेचे कार्य अभ्यासताना समाजाच्या (community) बोलण्याच्या सवयींना/लकबींना (speech habits) प्रमाण मानले जाते. या लकबी/सवयी शरीरशास्त्रीय पद्धतीने ध्वनींचे/आवाजाचे निरीक्षण करून अभ्यासता येतात. भाषाविज्ञानात भाषेच्या स्वतःच्या तिच्या अशा संज्ञा (terms), शैली किंवा भाषेच्या वापराचे विविध स्तर यांचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास होतो. हा अभ्यास स्वनिमविन्यास, रूपिमविन्यास, वाक्यविन्यास आणि अर्थविन्यास या अंगांनी होतो. भाषा ही बदलणारी व्यवस्था असल्याने भाषेचा अभ्यास करणारे विज्ञानही 'जड' नसून 'चल' विज्ञान आहे. म्हणजेच 'विज्ञान' ही संकल्पना भाषाविज्ञानात सामाजिक विज्ञान, मानव्यविज्ञान, वर्तनवादी विज्ञान यांमधील 'विज्ञाना'शी समांतर आहे. सामाजिक विज्ञानांमधील मूलभूत संकल्पना ह्या प्रत्यक्ष निरीक्षणाशी, अनुभव आणि प्रयोगांशी संबंधित असतात.

त्यापद्धतीने भाषाविज्ञानातील संकल्पनासुद्धा निरीक्षण, अनुभव, तर्कशुद्धता आणि प्रयोग यांतून सिद्ध होणाऱ्या असतात. म्हणूनच भाषाविज्ञानाचा संबंध प्रत्यक्षार्थवाद (positivism) आणि प्रयोगवाद / अनुभववाद (empiricism) यांच्याशी आहे.

भाषाविज्ञान हे सहजज्ञान आणि तर्कज्ञान यापेक्षा वेगळे आहे. ते ऐंद्रिय आहे. म्हणजेच अनुभवावर आधारित आहे. कारण भाषेचा अनुभव घेता येतो आणि तिचे वापरानुसार वस्तुनिष्ठ पद्धतीने वर्गीकरणही करता येते. भाषेमध्ये अनेकविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक, जातीय, व्यक्तिगत आदी अनेक घटकांचा समावेश झालेला असतो. म्हणूनच भाषेला 'सामाजिक संस्था' असे म्हणतात. साहजिकच भाषेचा अभ्यास करताना समाजाची मानसिकता, सांस्कृतिक स्तरभेद, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सामाजिक मानसिकता, भाषकाची मानसिकता, आनुवंशिकता आदी अनेक घटक विचारात घ्यावे लागतात. यातूनच भाषाविज्ञानाचा समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, भूगोल इत्यादी शास्त्रांशी संबंध प्रस्थापित झालेला आहे. यामुळे भाषाविज्ञान ही संज्ञा एकवचनी नसून अनेकवचनी (linguistics) आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

## १.८ वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती

या पद्धतीला एककालिक अभ्यासपद्धती असे म्हणतात. सोस्यूरने सर्वप्रथम एककालिक आणि कालक्रमिक असा भेद सांगून आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया घातला. आधुनिक भाषाविज्ञानाची ही पायाभूत अभ्यासपद्धती आहे. कोणत्याही एखाद्या विशिष्ट कालखंडातील भाषेचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करणे म्हणजे वर्णनात्मक भाषाभ्यास होय. जो कालखंड-वर्तमानकालीन/भूतकालीन अभ्यासासाठी गृहीत धरलेला असतो त्या कालखंडाची पूर्वावस्था किंवा उत्तरावस्था ध्यानात घेतली जात नाही. विशिष्ट कालखंडातील भाषेचे रूप स्थिर आहे असे मानावे लागते. भाषा ही परिवर्तनशील असली तरी विशिष्ट कालखंडात ती स्थिरच आहे, असे गृहीत धरल्याशिवाय या पद्धतीने भाषेचा अभ्यास शक्य होत नाही. दोन विशिष्ट कालखंडांचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास केला असता भाषेच्या स्थित्यंतरांचा मागोवाही घेता येतो. समजा यादवकालीन मराठी भाषा आणि शिवकालीन मराठी भाषा या दोन कालखंडांचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास केल्यास दोन कालखंडांमध्ये भाषेच्या संदर्भात कोणकोणती स्थित्यंतरे झाली हे तपासता येते. याच अर्थाने सोस्यूरने ऐतिहासिक पद्धतीचे महत्त्व नाकारले आहे. या पद्धतीत भाषेचा अभ्यास करताना भाषेच्या विश्लेषणाला महत्त्व दिले जाते. मूल्यमापन केले जात नाही. वर्णनात्मक पद्धतीत एकाच भाषेचा अभ्यास केला जातो. तिचे दुसऱ्या भाषेशी कितीही साम्य असले तरी त्या दुसऱ्या भाषेचा विचार केला जात नाही. या पद्धतीत भाषेचा अभ्यास करताना प्रमाण किंवा लिखितभाषा प्रमाण मानली जात नाही, व्यवहारात बोलल्या जाणाऱ्या भाषेलाच प्राधान्य दिले जाते. अशा व्यवहारभाषांचा अभ्यास करताना या अभ्यासाशी ज्या ज्या शाखांचा (मानसशास्त्र, शरीरशाख) संबंध येतो त्यांचाही विचार येथे केला जातो.

वर्णनात्मक पद्धतीने भाषेचा अभ्यास करताना स्वनिम, रूपिम आणि वाक्यविन्यास या घटकांचा अभ्यास केला जातो. स्वनिम हा भाषेचा मूलभूत घटक असल्याने, भाषेचे (व्यावहारिक) नमुने एकत्र करून कोणती स्वनिमे भाषेत वापरली जातात हे पाहिले जाते. प्रत्यक्ष निरीक्षणाला आणि व्यावहारिक रूपांना प्राधान्य दिले जात असल्याने, परंपरेने चालत आलेले

काही स्वनिम जर वापरात नसतील तर त्यांचा विचार केला जात नाही. उदा.मराठीतील दीर्घ लृ, ॠ हे स्वनिम नाहीसे झाल्याने त्यांचा विचार वर्णनात्मक अभ्यास पद्धतीत केला जात नाही. स्वनिम निश्चित करून उच्चारण केंद्रानुसार त्यांचे वर्गीकरण केले जाते. यानंतर रूपिमांचा विचार होतो. भाषेत सार्थ घटक म्हणजे रूपिम होय. ही रूपिमे बद्ध आणि मुक्त अशा दोन्ही प्रकारची असतात. रूपिमांमधून शब्द आणि शब्दांमधून वाक्य बनते. याचा विचार या पद्धतीत केला जातो. हा विचार सुरुवातीला संरचनावाद्यांनी केला संरचनावाद्यांचा वाक्यविचार पृष्ठस्तरीय होता. नंतर अर्थ विचारास प्राधान्य आल्याने रचनांतरणाच्या आधारे वाक्यविचार होऊ लागला. यानंतर भाषेचा 'अर्थ' हा घटक येतो. 'अर्थ' हा सामाजिक संदर्भाने सीमित होतो. त्याचबरोबर तो मानसिकही असतो. यामुळे अर्थाचा विचार १) अंतःस्तरीय पातळीवरून (मानसशास्त्र) आणि २) सामाजिक संदर्भाच्या पातळीवरून (समाजशास्त्र) होऊ लागला आहे.

वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती हीच सर्व भाषाभ्यास पद्धतीच्या केंद्रस्थानी आहे. ऐतिहासिक, तौलनिक या दोन अभ्यासपद्धती परस्परपूरक आहेत. ऐतिहासिक पद्धतीतूनच तौलनिक भाषाभ्यास उदयास आले आहे. पण या दोन्हीही पद्धतींनी भाषेचा अभ्यास करावयाचा झाल्यास वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती डावलून चालत नाही. वर्णनात्मक पद्धतीचा पाया पक्का असल्याशिवाय या पद्धतींचा अभ्यास शक्य नाही. पूर्वी तो होत असे; पण तो केवळ भाषिक परिवर्तनाच्या अंगानेच. तेथेही स्वनिम विचाराला प्राधान्य होतेच, पण आज आधुनिक पद्धतीने ऐतिहासिक आणि तुलनात्मक अभ्यास करावयाचा झाल्यास वर्णनात्मक पद्धती लक्षात घ्यावीच लागते. यामुळे या तिन्हीही अभ्यासपद्धती परस्परपूरक बनू लागल्या आहेत.

### आपली प्रगती तपासा

**प्रश्न** चॉम्स्की व ब्लूमफील्ड यांच्या भाषाभ्यासाच्या विचारातील भेद स्पष्ट करा.

## १.९ सारांश

प्रस्तुत घटकामध्ये आपण मानवनिर्मित भाषा, शब्द अर्थातील सहसंबंध व सर्वांचा अभ्यास करणाऱ्या वर्णनात्मक भाषाविज्ञान पद्धतीचा विचार केला. हा विचार करत असताना या अभ्यासपद्धतीचे सिद्धांत मांडणाऱ्या सोस्यूर, ब्लूमफील्ड व चॉम्स्की यांच्या विचारांचाही आढावा घेतला. आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया सोस्यूर यांनी घातला. त्यांनी ऐतिहासिक व वर्णनात्मक या दोन भाषाभ्यास पद्धतीतील फरक स्पष्ट केला. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीने भाषेच्या परिवर्तनाचे, विकासाचे नियम निश्चित करता येतात हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. त्यांनी भाषेचे 'लांग' व 'परोल' असे भाषेचे दोन स्तर मांडले. भाषेकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनाला त्यांनी बदलले. तर ब्लूमफील्ड या अभ्यासकाने भाषेच्या संरचनात्मक पद्धतीची मांडणी केली. तिलाच 'अमेरिकन संरचनावाद' असे म्हणतात. भाषा ही जैविक क्रिया नसून ती आत्मसात करावी लागणारी क्रिया आहे या विचाराचा पुरस्कार केला. तर चॉम्स्की या अभ्यासकाने 'रचनांतरण' ही पद्धती कशी महत्त्वाची आहे हे पटवून दिले. भाषेच्या विकासाची

सूत्रे अंतःस्तरीय रचनेमध्ये असतात हा विचार मांडून 'भाषा ही जैविक क्रिया' असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. 'अर्थविन्यास' हा त्यांच्या सिद्धांताचा पायाभूत घटक होता. अशी अनेक मते व त्यांचे विश्लेषण आपण या घटकाच्या अनुषंगाने केले आहे.

## १.१० संदर्भसूची


१. डॉ. काळे, कल्याण व सोमण अंजली (संपा): 'आधुनिक भाषाविज्ञान' (संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक), प्रतिमा प्रकाशन, पुणे. २००३ (दु. आ.).

२. डॉ. मालशे, मिलींद : 'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन' लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००९.

३. कानडे, मु. श्री. (संपा.) : 'मराठीचा भाषिक अभ्यास' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९४.

४. डॉ. कदम महेंद्र : 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

५. गोविलकर, लिला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान' आरती प्रकाशन, डोंबिवली, १९९२.


## १.११ नमुना प्रश्न

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. सोस्यूरचा भाषाविषयक विचार स्पष्ट करा.

२. वर्णनात्मक भाषाविज्ञान ही संकल्पना विस्ताराने सांगा.

**ब. लघुत्तरी प्रश्न**

१. चॉम्स्की भाषाविचार

२. भाषाविज्ञानातील विज्ञानाचे स्वरूप.

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ब्लूमफील्ड यांच्या ग्रंथाचे नाव सांगा.

२. चॉम्स्की या भाषावैज्ञानिकाने 'लांग' या संकल्पनेविषयी कोणती संकल्पना वापरली ?

*****

munotes.in

# २

# ध्वनिविचार: स्थान व प्रयत्नावर आधारित स्वनांचे वर्गीकरण, मानस्वर, उच्चार व लेखन यातील अंतर, स्वनिक प्रतिलेखन

**घटक रचना**

२.१ उद्देश

२.२ प्रस्तावना

२.३ स्थान व प्रयत्नावर आधारित स्वनांचे वर्गीकरण

२.३.१ वागयंत्रणा

२.३.२ ध्वनीनिर्मिती

२.३.३ उच्चारण स्थानावर आधारलेले स्वनवर्ग

२.३.४ प्रयत्नांवर आधारलेले स्वनवर्ग

२.४ मानस्वर

२.५ 'उच्चार व लेखन यातील अंतर'

२.६ स्वनिक प्रतिलेखन

२.७ सारांश

२.८ संदर्भग्रंथसूची

२.९ नमुना प्रश्न

## २.१ उद्देश

मानवी मुखावाटे निर्माण झालेल्या व भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींनाच स्वन असे म्हणतात. तर या ध्वनींचा किंवा स्वनांचा विचार आपण या घटकामध्ये करणार आहोत. या घटकाच्या आधारे आपल्याला पुढील गोष्टी समजतील.

१. मानवी मुखावाटे ध्वनींची निर्मिती कशा पद्धतीने होते व ती यंत्रणा कशा पद्धतीने कार्य करते ती यंत्रणा समजेल.

२. या निर्माण होणाऱ्या ध्वनींचे स्थान व प्रयत्नांच्या अनुषंगाने कसे वर्गीकरण होते हे ध्यानात येईल.

३. मानस्वर ही संकल्पना काय आहे हे समजेल.

४. मानवी मुखावाटे निघणाऱ्या ध्वनींचा उच्चार व लेखन यांच्यातील अंतर ध्यानात येईल.

५. तसेच प्रतिलेखन ही प्रक्रिया समजेल.



munotes.in

## २.१ प्रस्तावना

भाषा ही ध्वनिरूप असल्यामुळे भाषाशास्त्रातील पहिले पाऊल म्हणजे ध्वनींचा विचार. ध्वनिविचार ही भाषाशास्त्राची महत्त्वाची शाखा आहे. किंबहुना भाषाशास्त्राचा हा पाया आहे. ध्वनींच्या निरनिराळ्या गुणधर्मांची, लक्षणांची नीट ओळख झाल्याशिवाय स्वनिम विचार करताच येणार नाही. ध्वनिविचारामध्ये ध्वनींचा विचार प्रामुख्याने कर्तव्य आहे. ध्वनींचे उच्चारण अभ्यासले जाते. उच्चारित ध्वनीचा अभ्यास केला जातो. ध्वनीचे पृथक्करण, वर्गीकरण होते. म्हणजेच शिकलेले ध्वनी उच्चारता आले पाहिजे. शिवाय ज्या ध्वनियंत्रणेचा उपयोग करून मनुष्य ध्वनी निर्माण करतो त्या यंत्रणेचा अभ्यास करणे देखील अगत्याचे आहे. या यंत्रणेची घडण, हालचाल, यातील महत्त्वाचे भाग, त्यांपैकी प्रत्येकाचे उच्चारणातील कार्य, या सर्वांचा विचार देखील ध्वनीचे मूलभूत स्वरूप समजून घेण्यासाठी केला पाहिजे.

## २.३ स्थान व प्रयत्नावर आधारित स्वनांचे वर्गीकरण

स्वनांचे वर्गीकरण पाहण्यापूर्वी मानवी मुखावाटे स्वनांची निर्मिती कशी होते याचे विश्लेषण आपण प्रथम पाहू. यामध्ये वागयंत्रणा किंवा वागिंद्रिय अत्यंत महत्त्वाचे ठरतात.


### २.३.१ वागयंत्रणाः

वागयंत्रणा ही फ्ल्यूट किंवा बाजाची पेटी अशा संगीत वाद्यासारखी आहे. ज्याप्रमाणे निरनिराळ्या भोकांवर किंवा पट्टीवर बोटे ठेवून आपण आतील हवेशी खेळतो व त्यानुसार निरनिराळे स्वर काढतो. त्याचप्रमाणे ध्वनियंत्रणेमधून निघणारे विविध ध्वनी ज्या प्रमाणात व पद्धतीने आपण हवेचे नियंत्रण करू त्यावर अवलंबून असतात. हवेच्या नियंत्रणावरच ध्वनीचे स्वरूप अवलंबून असते. फुप्फुसांत साठविली गेलेली हवा तोंडावाटे बाहेर जाताना किंवा बाहेरची हवा तोंडातून आत येतात व ध्वनिनिर्मिती होते. श्वासोछ्वासाच्या नैसर्गिक क्रियेचा उपयोग करून प्रतिक्षणी फुप्फुसातून हवा बाहेर जात असते किंवा बाहेरून येत असते तेव्हा त्या हवेचा वागयंत्रणेतील निरनिराळ्या अवयवांशी निकटचा संबंध येतो. हे अवयव एक तर त्या हवेवर काहीही नियंत्रण न घालता तिला स्वैरपणे बाहेर जाऊ देतात किंवा वाटेत अडथळा उत्पन्न करून हवेची अडवणूक करतात. कोणत्या प्रकारची ध्वनी उत्पन्न होतील हे अडथळ्याच्या प्रकारावर व स्वरूपावर अवलंबून असते म्हणून या यंत्रणेतील निरनिराळ्या अवयवांचा विचार करणे आवश्यक आहे. हे अवयव ध्वनिनिर्मितीची साधने आहेत.

फुप्फुसे, श्वासनलिका, कंठ, घसा, तालुपट, तोंड व नाक हे वागयंत्रणेमधील मुख्य अवयव आहेत. या सर्वांना आपण ध्वनिनिर्मितीची साधने मानतो. तरी सुद्धा हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की या सर्व अवयवांचे ध्वनी निर्माण करणे हे मुख्य काम नाही. ध्वनिनिर्मिती हे त्यांचे दुय्यम किंवा प्रासंगिक कार्य आहे. निव्वळ ध्वनि-उच्चारणासाठी स्वतंत्र असे हे अवयव नाहीत. खाणे व श्वसन यासाठी जी यंत्रणा शरीरात आहे, त्यामधूनच ध्वनी निर्माण होतात. ओठ, दात, जीभ यांचा मुख्य उपयोग दुसराच आहे तो म्हणजे खाण्याच्या क्रियेत तुकडे करणे, चर्वण करणे वगैरे. तरी सुद्धा उच्चारणामध्ये यांचा उपयोग आहे.

munotes.in

ध्वनियंत्रणेतील सर्व अवयव मिळून जरी कार्य करीत असले तरी काही भाषा त्यातील एखाद्या अवयवाचा जास्ती उपयोग करताना आढळतात. स्फोटक (घर्षक) ध्वनीसाठी अरेबिक भाषा अलिजिव्हेचा (Uvula) जास्त अवलंब करते. फ्रेंच भाषेत स्वर व व्यंजने या दोन्हींसाठी नासिकामार्गाचा जास्त उपयोग आढळतो. रशियन भाषेत काही विशिष्ट तालव्यरंजित (Palatalized) ध्वनीसाठी जिभेचे पाते जास्ती वर केले जाते.




**वागिंद्रिय:**

१. वरचे दात, २. वरचे ओठ, ३. दन्तमुळ ४. अग्र टाळू ५. कठीण टाळू (मूर्धा), ६.मृदूतालू (तालुपट), ७. अलिजिव्हा (पडजीभ), ८. गलभित्तिका, ९. खालचा ओठ, १०. खालचे दात, ११. जिव्हाग्र १२. जिव्हाफलक १३. अग्रजिव्हापृष्ठ, १४. केंद्रजिव्हापृष्ठ, १५. पश्चजिव्हापृष्ठ, १६. जिव्हामूल १७. उपजिव्हा, १८. आभासी स्वरतंत्री, १९. कंठद्वार, २०. स्वरतंत्री, २१. अन्नमार्ग, २२. श्वासमार्ग, २३. मुखविवर, २४. नासिकविवर

**वागिंद्रियाची रचना व कार्य:**

माणूस तोंडाने बोलतो किंवा मुखावाटे स्वन निर्माण केले जातात. स्वननिर्मितीमध्ये तोंडाव्यतिरिक्त अन्य अवयवही सहभागी होत असतात. फुफ्फुसे, श्वासनलिका, स्वरयंत्र, पडजीभ, तोंडाची पोकळी, टाळू, दात, जीभ आणि ओठ या इंद्रियांच्या मदतीने स्वनांची निर्मिती होते. स्वननिर्मिती करणाऱ्या या इंद्रियांना 'वागिंद्रिय' म्हटले जाते.

(ना. गो. कालेलकर, १९९०)

munotes.in

तालू, जिव्हा, दात व ओठ - ध्वनिविचारामध्ये या अवयवाचे फार महत्त्व असून बहुतांशी ध्वनी तेथेच निर्माण होतात. म्हणून बारकाईने यांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. हे सर्व भाग तोंडामधील आहेत. तोंडामधील अर्धचंद्राकृती आकाराचा जो वरचा भाग असतो तो 'तालू' म्हणून ओळखला जातो. त्याचे चार भाग मानले गेले आहेत अ) मृदु ताल् (कोमल ताल्) ब) मुर्धा क) पूर्व किंवा कोठोर ताल् ड) दन्तमूल त्याचप्रमाणे जिभेचे तालूच्या बरोबर खालचे त्याचप्रमाणे चार भाग मानले गेले आहेत. यांचा एकमेकांशी संबंध आला म्हणजे निरनिराळ्या प्रकारचे ध्वनी उच्चारले जातात. जिभेच्या वेगवेगळ्या भागांचा स्पर्श तालुच्या निरनिराळ्या भागांना होऊ शकतो व त्यामुळे ध्वनीचे अनेक सूक्ष्म भेद निर्माण होतात. मागचा, मधला, पुढचा व टोक असे जिभेचे मुख्यतः चार भाग मानले आहेत. दात व ओठ हे सुद्धा निव्वळ भोजनक्रियेसाठी आपल्या उपयोगी पडत नाहीत, तर ध्वनि-उच्चारणामध्ये देखील त्यांचे आपल्याला साहाय्य होते.

ध्वनींच्या अभ्यासासाठी जरूरी असलेल्या शरीरातील महत्त्वाच्या अवयवांची थोडक्यात माहिती करून घेतल्यावर आता ध्वनी कसे, कोठे निर्माण होतात, त्यांचे प्रकार कोणते व वर्गीकरण कोणत्या तत्त्वावर करता येईल याचा विचार करू.

## २.३.२ ध्वनीनिर्मिती:

बोलण्यासाठी जेव्हा आपण तोंड उघडलेले नसते तेव्हा फक्त श्वासोछ्वास चालू असतो. तालुपट खाली लोंबत असल्यामुळे नाकाची पोकळी उघडी असते व त्यामुळे हवा नाकावाटे बाहेर जाते. स्वरतंत्री स्तब्ध असतात. त्याच्या उलट आपण काही तरी बोलू लागतो तेव्हा साहजिकच तोंड उघडले जाते. हवा तोंडावाटे बाहेर जाते. तालुपट मात्र खालीच लोंबत राहतो किंवा तो वर जातो हे कोणत्या प्रकारचा ध्वनी उच्चारावयाचा असेल त्यावर अवलंबून राहील. मौखिक ध्वनीसाठी तालुपट वर जाऊन नाकाची पोकळी बंद राहील. अनुनासिकासाठी नेमकी याच्या उलट क्रिया घडेल. तीच गोष्ट स्वर तंत्रीबाबत. स्वरतंत्रीमध्ये कंप उत्पन्न झाला म्हणजे सघोष ध्वनी मिळतो, याच्या उलट स्वरतंत्री निष्कंप असल्यास अघोष ध्वनी उच्चारला जातो. परंतु एवढी माहिती मिळवून आपला कार्यभाग साधणार नाही. यांच्या इतकेच किंबहुना यांच्यापेक्षा जास्ती महत्त्वाचे तत्त्व म्हणजे ध्वनियंत्रणेमधील वेगवेगळ्या अवयवांच्या हालचाली. खालचा ओठ, जिव्हा, स्वरयंत्र यांच्यामधील हालचाली विविध पण अनिश्चित आहेत. त्यांच्या हालचालीनुसार वेगवेगळे ध्वनी निर्माण होतात. समजा, जिभेने किंवा खालच्या ओठाने हवा जर बिलकूल पूर्णपणे अडविली तर एक प्रकारचा ध्वनी मिळतो, हवा अडविली जात असताना जर एक बारीकशी फट राहिली तर उच्चारला जाणारा ध्वनी निराळ्या प्रकारचा होईल. त्याचप्रमाणे हे अवयव कोणत्या उच्चारणस्थानाप्रत हालचाली करतात यावर देखील ध्वनीचे स्वरूप अवलंबून आहे. याचाच अर्थ ध्वनीचे स्वरूप हे उच्चारणस्थान, उच्चारणअवयव आणि प्रयत्न या तत्त्वावर आधारलेले आहे.

## २.३.३ उच्चारण स्थानावर आधारलेले स्वनवर्ग :

स्वनांच्या उच्चारणात उच्चारण स्थानाला म्हणजेच हवा मुखविवरात तेथे अडवली जाते त्या स्थानाला महत्त्व आहे. कंठ, मृदू, टाळू, मुर्धा-मागची कठीण टाळू, दंतमूळ, दात, ओठ ही उच्चारण स्थाने आहेत. या स्थानांवरून स्वनांचे वेगवेगळे वर्ग मांडले जातात. त्यांचा क्रमाने परिचय करून घेऊ.

**१) कंठद्वारीय स्तरः**

स्वरतंत्रातील कंठद्वारातून ज्या स्वनांचे उच्चारण होते ते कंठद्वारीय स्वन होय.
उदाहरणार्थ : 'ह' हा कंठ द्वारीय स्वन आहे.

**२) मृदूतालव्य स्वन :**

जिभेच्या मागचा भाग उचलून मृदू टाळूच्या जवळ नेला जातो. अशा स्थितीत निर्माण होणाऱ्या स्वनांना मृदूतालव्य स्वन म्हटले जाते.

उदाहरणार्थ :क्, ख्, ग्, घ्, हे स्वन अशा पद्धतीने उच्चारले जातात.

**३) मूर्धन्य स्वन :**

या स्वनांची निर्मिती होताना जिव्हा प्रतिवेष्टीत केली जाते आणि त्याने टाळूच्या मुर्धा म्हणजेच मागच्या कठीण टाळूस स्पर्श केला जातो. ज्यातून ट् ठ् ड् ढ् ण् हे स्वन निर्माण होतात. त्यांना मूर्धन्य स्वन असे म्हणतात. त्याचबरोबर ह्यांना प्रतिवेष्टीत स्वन असे म्हणतात.

**४) तालस्वन :**

जिभेचा पुढचा भाग म्हणजे अग्रजिव्हा पुढच्या कठीण टाळूला स्पर्श करते. अशा वेळी निर्माण झालेल्या स्वनाना तालव्य स्वन म्हणतात.

त् क्ष् य् च् ज् छ्

**५) दंतमूलिय स्वनः**

दंतमूळ हे उच्चारणस्थान आणि जिव्हाग्र, दंतमुळांना स्पर्श करून हवा अडकली जाते. त्यावेळी जे स्वन निर्माण होतात त्यांना दंतमूलीय स्वन म्हणतात.

त् थ् द् ध् न्

**६) दंन्त्य स्वनः**

या स्वनांच्या निर्मितीच्या वेळी दंतमुलाऐवजी वरचे दात हे उच्चारण स्थानात असते आणि जिव्हाग्र हा उच्चारण अवयव असतो. चवदार, चटई या शब्दातील 'च' तसेच स हे स्वन दन्त्य होय.

**७) ओष्ठ्य स्वनः**

ज्या स्वनांचे उच्चारण करताना दोन्ही ओठांचे साहाय्य होते ते ओष्ठ्य स्वन होय. यामध्ये दोन्ही ओठ गोलाकार होतात.

प् फ् ब् भ् म

### ८) दंन्त्योष्ठ स्वन :

फ चे उच्चारण नेहमीच औष्ठ्य  होते असे नाही. इंग्रजीतील far, coffee या शब्दातील 'फ' चा उच्चार औष्ठ नाही. मराठीतील 'साफ' हा दंन्त्योष्ठ स्वन होय.

### २.३.४ प्रयत्नांवर आधारलेले स्वनवर्ग :

उच्चारण स्थानाजवळ स्वनांचे उच्चारण करताना जो प्रयत्न करावा लागतो म्हणजेच हवेची अडवणूक करावी लागते आणि त्या आधारे स्वननिर्माण करावे लागतात. हे स्वनवर्ग म्हणजे प्रयत्नांवर आधारलेले स्वन वर्ग होय. स्वरयंत्रणामुळे सघोष किंवा अघोष स्वरूपात बाहेर पडलेली हवा मुखविवरात कोठेही पूर्णपणे अडवली गेली की त्या प्रयत्नाला अवरोध म्हणतात. अर्थात प्रयत्नांवर आधारलेले स्वनवर्ग आपल्याला पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

### १) स्पर्शस्वनः

मुखविवरात ज्या स्वनाच्या निर्मितीत प्रथम अवरोध होतो, मग त्यांचा स्फोट होतो अशा स्वनांना स्पर्शस्वन म्हणतात. स्पर्शरचनांच्या निर्मितीत हवा मुखविवरात कोठेतरी पूर्णपणे अडवली जाते. म्हणजेच अवरोध स्थिती होते. या स्वनांच्या निर्मितीमध्ये स्फोटाला महत्त्व असते. त्यामुळे काही भाषावैज्ञानिक त्यांना स्पोटके किंवा स्पोटस्वन असेही म्हणतात. उदाहरणार्थ ग्  ट्  ड्  प्  ब्  ही स्पर्शस्वन आहेत. स्पर्शस्वनांचे उच्चारण स्थानानुसार

| | | |
|---|---|---|
| ओष्ठस्पर्शस्वन | - | प |
| दंत्यस्पर्शस्वन | - | (त्) अंत |
| दंतमूलीयस्पर्शस्वन त् | - | तलवार, तराजू |
| मूर्धन्य / प्रतीवेष्टीत स्पर्शस्वन ट | - | टरबूज, टांगा |
| मृदूतालव्य स्पर्शस्वन | - | क् - कबंध |

असे वर्ग पडतात.

### २) घर्षकस्वनः

मुखविवरात आलेली हवा जर पूर्णपणे अडवली नाही उलट मुखविवरात जी थोडीशी फट राहील तिच्यातून ती बाहेर सारली गेली तर घर्षकस्वन निर्माण होतात. या स्वनाना घर्षकस्वन म्हणण्याचे कारण हवेचा प्रवाह अडविला न जाता तो मुखविवरातील अवयवांशी घर्षण करीत बाहेर जातो. श, स, हे स्वन घर्षक स्वन आहेत. इंग्रजी भाषेतील far मधील फ् आणि thanks मधील थ याची उदाहरणे आहेत.

### ३) पश्चिक किंवा पार्श्विक स्वन :

बाहेर पडणाऱ्या हवेला मुखविवरात मधोमध अडथळा निर्माण केला तर ती जिभेच्या दोन्ही कडानी बाहेर पडते. अशावेळी निर्माण होणाऱ्या स्वनांना पार्श्विक स्वन म्हणतात. ल ,

ळ्  हे पार्श्विक स्वन आहेत. ळ् च्या उच्चारणाच्या वेळी जिभेचे टोक वळवून मागे न्यावे लागते. कारण ळ् चे उच्चारणस्थान मुर्धा आहे त्यामुळे त्याला मुर्धन्य पार्श्विक स्वन किंवा प्रतिवेष्टित पार्श्विकस्वन म्हणता येईल. याउलट ल्, च  उच्चारणस्थान दंतमूल असल्याने तो दंतमूल्यपार्श्विक स्वन ठरतो.

### ४) कंपित स्वन किंवा स्पंदित स्वन  :

जिभेचे तोंड टाळूच्या अगदी जवळ नेले आणि तेथे ते कंपन पावले आहे. अशा स्थितीत निर्माण होणाऱ्या स्वनास  कंपीत स्वन किंवा कंपनयुक्तस्वन म्हणतात.

उदाहरणार्थ र आणि ऱ्ह हा कंपित स्वन आहे. त्याचे उच्चारणस्थान दंतमूल असल्याने त्याला दंतमूल्यकंपितस्वन म्हणतात.

### ५) स्पर्शसंघर्षी स्वन :

काही स्वनांच्या उच्चारणाचा आरंभ स्पर्शस्वनाप्रमाणे म्हणजेच अवरोध होऊन होतो. अशावेळी अवरोध स्थितीच्या पाठोपाठ लगेचच स्फोट व्हावा लागतो. पण असा स्फोट चटकन न होता तो हळूहळू होत गेला असता जे स्वन निर्माण होतात त्यांना स्पर्शसंघर्षी स्वन म्हणतात. स्पर्शसंघर्षी स्वनांची  निर्मिती आरंभी  स्पर्शस्वनाप्रमाणे व नंतर घर्षकस्वनाप्रमाणे असते, च्, घ् , ज्, झ् हे स्पर्शसंघर्षीस्वन आहेत.

### ६) अनुनासिक स्वन :

अनुनासिक स्वनांची निर्मिती स्पर्श स्वनाप्रमाणेच होते. स्पर्शस्वनाच्या निर्मितीच्या वेळी नासिकविवर बंद असते. ते खुले ठेवले की अनुनासिकस्वन निर्माण होतो. मुखविवरात ज्या उच्चारणस्थानापाशी हवेला अडथळा होतो. त्या उच्चारणस्थानानुसार प्रत्येक अनुनासिकस्वन वेगळा बनतो. उच्चारणस्थान व त्यानुसार निर्माण होणारा अनुनासिक स्वन यांची माहिती पुढील प्रमाणे देता येईल.

| **उच्चारण स्थान** | **अनुनासिक स्वन** |
|---|---|
| मृदू ताळू | ङ् (वाङ्मय) |
| मागची कठीण टाळू (मुर्धा) | ण् |
| पुढची कठीण टाळू | अ |
| दस्तमूल/दंतमूल | न् |
| वरचे दात | (न) |
| ओठ | म् |

### ७)  ताडित स्वन:

जिभेचे तोंड टाळूच्या अगदी जवळ नेले आणि तेथे कंपितस्वननिर्मितीच्या वेळी करतो तसे अनेक आघात न करता केवळ एकाच आघात केला जातो अशावेळी ताडीतस्वन निर्माण होतात.



munotes.in

उदाहरणार्थ : सडक आणि घोडा मधील 'ड्'.

**८) अल्पप्राण, महाप्राण स्वन :**

हवेचा लोट मुखविवरातून बाहेर पडून उत्पन्न झालेल्या स्वनाला 'प्राण' म्हणतात. ज्या व्यंजनस्वनांच्या उच्चारणाच्या वेळी हवा जोरात बाहेर लोटली जाते त्या व्यंजनस्वनाना महाप्राण व्यंजन स्वन म्हणतात. मराठीत ख , घ , छ्, ज्, ठ , ठ्, ढ , फ् हे स्वन महाप्राण स्वन आहेत.

ज्या व्यंजनस्वनांच्या उच्चारणात हवेचा बलवान लोट नसतो त्यांना अल्पप्राणव्यंजनस्वन म्हणतात

उदाहरणार्थ क्, ग्, ट इत्यादी

हे प्रयत्नांवर आधारलेले स्वनमार्ग आहेत.

## २.४ मानस्वर

स्वर अनेक आहेत, त्याच्यामधील भेद सूक्ष्म आहेत. त्यामुळे स्वर ओळखताना गोंधळ होण्याचा संभव खात्रीने आहे. तेव्हा हे स्वर ओळखताना ज्यांच्या स्वरूपाबाबत निश्चितपणा आहे अशा स्वरांचा आधार घेतल्यास खात्रीने फायदा होईल. ज्यांची एकमेकांत गल्लत होण्याचा संभव नाही. ज्यांच्या स्वरूपाबाबत मतभेद असू शकणार नाहीत अशा निश्चित स्वरांनाच 'मानस्वर' म्हणतात. हेच स्वर मानदंड असून त्यांच्या आधारे बाकीच्या स्वरांचे मूल्यमापन केले जाते. इ, ए, ऍ, आ, उ, ओ, ऑ, आ हे ते आठ मानस्वर होत. यांनाच मानस्वर मानण्याचे कारण असे की यांच्या उच्चारणक्रिया व श्रावणिक गुणधर्म शंकातीत असल्यामुळे यांना मापनाचे प्रमाण मानून यांच्या आधारे इतर स्वर मापता येतात, त्यांचे वर्णन करता येते.

- **गौणमानस्वर:**

जीभेचे स्थान व उंची मानस्वराप्रमाणेच असताना ओठांची स्थिती नेमकी उलटी झाली म्हणजे निर्माण होणारा स्वर याला 'गौणमानस्वर' म्हणतात. उदाहरणार्थ, अग्र, उच्च, आवृत्ताकार इ. जेव्हा वृत्ताकार होतो म्हणजे या स्वराच्या उच्चारणात जेव्हा ओठाचा चंबू केला जातो तेव्हा उच्चारल्या गेलेल्या स्वराला 'गौणमानस्वर' म्हणतात. तेच इतर मानस्वरांबाबत. म्हणून जितके मानस्वर मानण्यास आले आहेत तितकेच म्हणजे आठ गौणमानस्वर देखील धरले पाहिजेत. परंतु याच्यापैकी अग्र, निम्न गास्मानस्वर (वृताकार आ) अजून तरी कोणत्याच भाषेत आढळत नसल्यामुळे आन्तरराष्ट्रीय ध्वनिलिपीमध्ये त्याला चिन्ह दिलेले नाही.

## २.५ 'उच्चार व लेखन यातील अंतर'

भाषेतील ध्वनींचा उच्चार आणि तिचे लेखन या दोन वेगवेगळ्या क्रिया आहेत. मुळात उच्चार ही मौखिक क्रिया असून लेखन ही लिपीतून व्यक्त होणारी दृश्य क्रिया आहे. म्हणजेच कोणत्याही भाषेतील शब्द, ध्वनी हे बोलू, ऐकू शकतो तर हे शब्द लिपीबद्ध

झाल्यानंतर आपण ते पाहू शकतो. म्हणजे या दोन्ही क्रिया जरी एकमेकांवर अवलंबून असल्या तरी कृतीच्या बाबतीत भिन्न आहेत. जगामध्ये अनेक भाषा बोलल्या जातात पण त्या सर्वच भाषा लिपिबद्ध आहेत असे नाही. भाषा ही प्रथम बोलण्याची क्रिया आहे आणि त्यानंतर ती लिपीबद्ध होत असते. त्यामुळे भाषेच्या बाबतीत बोलणे महत्त्वाचे. लेखन किंवा लिपीबद्ध होणे त्यामानाने गौण, दुय्यम मानले जाते. जगात ज्या भाषा बोलल्यानंतर लिपिबद्ध झाल्या त्यांना प्रमाणभाषेचा दर्जा दिला गेला. व ज्या भाषा लेखनव्यवस्थेच्या बाहेर राहिल्या त्यांना 'बोली' असे संबोधले गेले. या भाषांमध्ये लेखनव्यवहार होतोच असे नाही. पण दैनंदिन व्यवहारासाठी मात्र त्या कित्येक वर्षापासून वापरात आणल्या गेल्या. त्यामुळे केवळ लिहिली जाते तिलाच भाषा म्हटली जाते असे नाही. तर जी बोलली जाते तीही भाषाच असते.

भाषाअभ्यासकांनी 'शब्दांचे' उच्चारण हे भाषेचे स्वरूप व लेखन ही त्या उच्चाराला 'टिकवून धरणारी व्यवस्था' असे म्हटले आहे. एखादा शब्द किंवा ध्वनी बोलल्यानंतर किंवा उच्चारल्या नंतर तो हवेत लगेच विरून जातो. त्या उच्चाराचे अस्तित्व अल्पकाळाचे असते. पण हाच उच्चार जर लिपीबद्ध केला तर मात्र तो चिरकाल अस्तित्वात राहतो. त्यामुळेच लिखित रूपावर अधिक विश्वास ठेवला जातो. त्यामुळे दादा गोरे आपल्या ग्रंथात म्हणतात की, ''भाषेचे मूळ उद्‌देश संदेशन साधणे हा असला तरी लिपी चिन्हांचा उद्‌देश मात्र संदेशनाला स्थिर रूप आणून देणे हा आहे. एका व्यापक अर्थाने लिपीचिन्हे ही भाषा निर्मितीचा ऐतिहासिक पुरावा आहे.'' (दादा गोरे, पृ. २२) म्हणून भाषाविचारामध्ये बोलणे किंवा उच्चार महत्त्वाचे असले तर प्रत्यक्ष मानवी व्यवहारात लेखनाला अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे भाषेच्या उच्चार आणि लेखन यातील अंतराला ध्यानात घेणे महत्त्वाचे ठरते. यामध्ये हे अंतर आपण ध्वनी, शब्द व वाक्य या तीन पातळ्यांवर पाहू शकतो. त्यातील ध्वनी आणि वाक्य या सूक्ष्म आणि दीर्घ स्वरूपाच्या उच्चार व लेखनाचा विचार आपण इथे करू.

१) ध्वनी – भाषेतील किंवा मानवी मुखावाटे निघणाऱ्या सर्वच ध्वनींना लिपीमध्ये चिन्ह असत नाही. उदा. जिभ टाळूला चिकटवून निघणारा ध्वनी किंवा पूर्वी मराठीमध्ये इंग्रजीतील 'ॲ' 'ऑ' साठी स्वतंत्र ध्वनीचिन्हे नसल्यामुळे या ध्वनीतून निर्माण होणारे शब्द 'वॅट- ' व्याट', 'कॅरम'-'क्यारम' 'कँडी'-'क्यांडी' असे लिहिले जात होते.

२) वाक्य- प्रत्येक व्यक्तीनुसार बोलीभाषेतील शब्द वेगवेगळ्या पद्धतीने उच्चारले जातात. म्हणून प्रमाण भाषेतील वाक्यरचना ही लेखनसुलभ किंवा लिपिबद्ध होत असते. उदा.

| बोलीरूप | प्रमाणभाषेतील लेखन |
|---|---|
| 'कुठं पळतोयस ?' | 'कोठे पळतो आहेस ?' |
| 'काय करतोयस ?' | 'काय करतो आहेस ? ' |

तसेच भाषेतील शब्द, ध्वनी किंवा वाक्याचे उच्चार तंतोतंत लिपीमध्ये येतीलच असे नाही. उदा. 'कसे काय ?' हा शब्द रागाने, द्वेषाने की प्रेमाने विचारायला आहे हे लेखनातून उमटत नाही. अशी अनेक उदाहरणे आपल्याला उच्चार आणि लेखन यातील अंतर दर्शविणारी जाणवतील. यामध्ये ऱ्हस्व व दीर्घ यांचे व्यक्ती करत असलेले उच्चार व त्यांचे मूळ लेखन हीसुद्धा गोष्ट यामध्ये येते.

एकूणच लिपी हे भाषेचे साधन मानली जाते. ती दृष्टीगोचर स्वरूपाची असते. तर ध्वनी हे श्रवणगोचर असतात. त्यामुळे बोलण्यासाठी ध्वनी जितके महत्त्वाचे असतात तितकीच लेखन करण्यासाठी लिपी व त्यातील ध्वनीचिन्हे माहीत असावी लागतात.

munotes.in

## २.६ स्वनिक प्रतिलेखन

स्वनिक सामुग्री लिपीमध्ये सुसंगतपणे, असंदिग्धपणे मांडण्याच्या तंत्राला प्रतिलेखन असे नाव आहे. ध्वनी, येथे थोडक्यात स्पष्टपणे दाखवले जातात. यामुळे पाहिजे तेव्हा ध्वनी त्यांचे गुणधर्म यांची परीक्षा करणे सुगम होते. प्रतिलेखनानुसार अचूक उच्चारण करता येते. ज्या स्तरावरून भाषेचे विश्लेषण केले जाते त्यानुसार प्रतिलेखन भिन्न असते. प्रतिलेखन स्थूल किंवा सूक्ष्म असू शकेल. सूक्ष्म प्रतिलेखनामध्ये ध्वनीमधील सर्व फरक क्षुल्लक महत्त्वाचे, लहानमोठे, जसे ऐकू येतात तसेच नेमके दाखवले जातात. अशा प्रकारच्या प्रतिलेखनात बऱ्याच प्रमाणात विशेषक चिन्हे (diacritical marks) वापरावी लागतात व त्यामुळे ते काही प्रमाणात क्लिष्ट होण्याचा संभव असतो. बोलीचा अभ्यास करताना कोणते गुणधर्म त्या भाषेत कार्य करत आहेत हे आधी माहीत नसल्यामुळे ध्वनीचे हरएक गुणधर्म त्यातील सूक्ष्म भेद नोंदवणे फायद्याचे असते.

प्रतिलेखन खालील प्रकारचे असते.

स्वनिक - येथे उच्चारणानुसार प्रतिलेखन केले जाते.

स्वनिमिक - येथे प्रतिलेखलन फक्त स्वनिमांचेच होते.

पदस्वनिमिक - पदिमावस्थेत स्वनिमात घडून येणारे फरक येथे दाखवण्याची पद्धत आहे.

पदिमिक - येथे प्रतिलेखन होते पदिमाचे. यासंबंधात लिप्यंतरणाचा (transliteration) उल्लेख करणे योग्य होईल. एका लिपीत लिहिलेले वाक्य येथे दुसऱ्या लिपीत केले जाते. उदा. 'मी गावाला जातो' हे देवनागरीत लिहिलेले वाक्य Mi gawala jato" अशा तऱ्हेने करता येईल. याचे काही ठराविक नियम आहेत उदा. पारंपरिक पद्धतीत दीर्घ समजले जाणारे 'आ', 'ई' स्वर शब्दावर आडवी रेघ काढून दाखवले जातात.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न. उच्चार व लेखन यातील अंतर स्पष्ट करून तुमच्या परिचयातील उदाहरणे द्या.

## २.७ सारांश

एकूणच भाषाभ्यास करत असताना भाषेतील ध्वनीचा विचार हा अत्यंत महत्त्वाचा असतो. एखाद्या भाषेचे ज्ञान असणे म्हणजे त्या भाषेतील ध्वनींचे ज्ञान असणे असे सांगितले जाते. कारण भाषा ही ध्वनीरूप असते. या ध्वनींच्या संयोगातून शब्द व दीर्घ वाक्यांची रचना करणे शक्य होते. अशा या ध्वनींची संख्या मर्यादित किंवा मोजकी असली तरी त्याच्या आधाराने अनेक शब्दांची, वाक्यांची अमर्याद रचना करणे शक्य होते. अशा या ध्वनींची

निर्मिती कशा पद्धतीने होते, तिची रचना कशी कार्यरत असते, किंवा ध्वनींचे वर्गीकरण, ध्वनी व लेखन यातील अंतर अशा सर्वच घटकाचा विचार हा ध्वनिविचारात केला जातो. भाषेचा अभ्यास करताना हा ध्वनिविचार उपयुक्त ठरताना दिसतो.

## २.८ संदर्भग्रंथसूची


१. कालेलकर, ना. गो. : 'ध्वनिविचार', मौज प्रकाशन गृह, मुंबई, दु. आ., १९९०

२. कालेलकर, ना. गो. : 'भाषा आणि संस्कृती', मौज प्रकाशन गृह, मुंबई, ति. आ., १९९९.

३. गजेंद्रगडकर, श्री. ना. : 'भाषा आणि भाषाशास्त्र', व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७९ दु. आ.

४. गोविलकर, लिला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', आरती प्रकाशन, डोंबिवली १९९२.

५. डॉ. गोरे, दादा : 'आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.


## २.९ नमुना प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. मानवी वार्गिंद्रियाची संकल्पना व तिची रचना स्पष्ट करा.

२. प्रयत्नावर आधारलेले स्वनवर्गाचे विश्लेषण करा.

### ब) टीपा लिहा.

१. मानस्वर

२. स्वनिक प्रतिलेखन.

३. स्पर्शस्वन

### क) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. जिभेच्या पुढच्या भागाला काय म्हटले जाते ?

२. मृदुतालव्य स्वन कशाला म्हटले जाते. ?

३. घर्षक स्वन म्हणजे काय ?

*****

munotes.in

# ३

# स्वन-स्वनिम-स्वनांतर, खंडात्मक व खंडाधिष्ठित स्वनिम, मराठीचे स्वनिम

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ स्वन म्हणजे काय?

३.४ स्वनिम म्हणजे काय?

३.५ स्वनांतरे म्हणजे काय?

३.६ स्वनिमांचे प्रकार

३.७ स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे

३.८ मराठीची स्वनिमव्यवस्था

३.९ समारोप

३.१० संदर्भ ग्रंथ

३.११ पुरक वाचन

३.१२ सरावासाठी प्रश्न

## ३.१ उद्‌दिष्टे

१. आधुनिक भाषा विज्ञानातील स्वन-स्वनिम-स्वनांतर या संकल्पना समजून घेता येतील.

२. भाषेतील स्वनांचे महत्त्व, स्वनांतरचा वापर कसा होतो हे लक्षात घेता येईल.

३. स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे कोणती याचा विचार करता येईल.

४. मराठीतील स्वनिमव्यवस्था समजून घेता येईल.

५. स्वनिमांच्या 'खंडात्मक व खंडाधिष्ठित' स्वनिमांचे प्रकार समजून घेता येतील.

## ३.२ प्रस्तावना

मानव आपल्या वागेंद्रियांच्याद्वारे विविध ध्वनीची निर्मिती करू शकतो. अशा विविध ध्वनींच्याद्वारे असंख्य शब्दाची निर्मिती करण्याची क्षमता मानवी वागेंद्रियांमध्ये असते. या वागेंद्रियांच्याद्वारे जेवढे ध्वनी निर्माण करतो ते सर्वच ध्वनी भाषेमध्ये वापरले जात नाहीत. भाषा कोणतीही असो त्यामध्ये काही निवडक ध्वनींचा वापर केलेला दिसतो. प्रत्येक भाषेमध्ये वापरासाठी निवडलेले ध्वनी हे भिन्न असतात. अर्थात एका भाषेतील एक विशिष्ट ध्वनी दुसऱ्या भाषेमध्ये असेलच असे नाही. एखादा ध्वनी दुसऱ्या भाषेमध्ये पाहायला मिळू शकतो. म्हणजेच भाषेमध्ये वापरले जाणारे हे ध्वनी स्वतंत्र असतात. भाषिक व्यवहारांमध्ये

ज्या ध्वनींचा उपयोग केला जातो त्या ध्वनीची उच्चारस्थाने कोणती? त्यासाठी कोणत्या उच्चारण अवयवाचा आधार घेतला जातो, उच्चारण अवयवाकडून कोणत्या प्रकारचा प्रयत्न केला जातो हा सर्व विचार स्वन विज्ञानामध्ये येतो.

## ३.३ स्वन म्हणजे काय?

भाषेमध्ये ध्वनी काही कार्य करत असतात. त्यामुळे ''भाषेकरिता उपयुक्त असे कार्य करू शकणारा कोणताही ध्वनी म्हणजे स्वन'' अर्थात भाषेमध्ये उपयोजिल्या जाणाऱ्या ध्वनीला स्वन असे म्हणतात. उदाहरणार्थ ब्, क्, अ, स्, ट्... यामध्ये भाषाध्वनी होण्याची क्षमता नसलेल्या ध्वनीला स्वन म्हणता येत नाही. जांभईचा आवाज, हसण्याचा आवाज, तोंडाने केलेले निरर्थक आवाज या ध्वनींना भाषा ध्वनीमध्ये अपेक्षित असलेले कार्य करण्याची क्षमता नसते आणि म्हणून या ध्वनींच्या आधारे एकेरी विनिमय होत असतो. त्यामुळे यांना स्वन असे म्हणता येत नाही.

**स्वनांचे विशेष:**

स्वनांचे विशेष खालीलप्रमाणे सांगता येतात.

**१. व्यक्तीविशिष्टता:**

व्यक्ती तितक्या प्रकृती, प्रवृत्ती या उक्तीप्रमाणे प्रत्येक व्यक्तीची बोलण्याची लकब त्यांचे आवाज वेगवेगळे असतात. लहान मुले, वृद्ध स्त्रिया किंवा पुरूष यांचे आवाज ऐकून कोण बोलत असेल याचा अंदाज बांधता येतो. त्यांची भावस्थिती समजून घेता येऊ शकते. हीच स्वरांची व्यक्तीविशिष्टता होय.

**२. विभेदकता:**

याचा अर्थ एकाच स्वनाचे उच्चारण दुसऱ्या स्वनाच्या उच्चारणापेक्षा वेगळे असते. प्रत्येक स्वनाचा उच्चार वेगळा असतो.
उदाहरणार्थ-

धन = ध् + अ + न + अ

मन = म् + अ + न + अ
यामध्ये ध् आणि म् या स्वनांचे उच्चारण भिन्न आहे. म्हणून हे दोन शब्द उच्चारण दृष्टीने स्वतंत्र ठरतात. अशी आणखी उदाहरणे देता येतील.

**३. लवचिकता:**

'लवचिकता' हे स्वनांचे एक वैशिष्ट्य. स्वनांच्या मागे पुढे असणाऱ्या वर्णांचा परिणाम होऊन त्यांच्या उच्चारणामध्ये बदल होत असतो. उच्चारले जाणारे स्वन, प्रत्येक शब्दातील त्याचे स्थान, त्याचे स्वरूप, त्याचा परिसर इत्यादींचा परिणाम स्वनांच्या उच्चारणावर होत असतो.

## ३.४ स्वनिम म्हणजे काय?

एखादा स्वन जेंव्हा भाषेमध्ये उपयोजला जातो तेव्हा त्याला 'स्वनिम' असे म्हणतात. कारण भाषेमध्ये उपयोजला जात असताना स्वनाच्या उच्चारामध्ये बदल होत असतात. म्हणून ज्यावेळी एखादा स्वन भाषेमध्ये उपयोजला जातो त्या वेळेला तो स्वनिम बनतो ''विशिष्ट भाषेत वापरल्या जाणाऱ्या स्वनास स्वनिम म्हणतात.''(भाषाविज्ञान परिचय, पृष्ठ ४४) प्रत्यक्ष भाषेमध्ये स्वनिम न वापरता त्याची स्वनांतरे वापरली जातात. स्वनिम काल्पनिक असतो तर या कल्पनेची प्रात्यक्षिके स्वनांतरामध्ये असतात. भाषेमध्ये स्वनांतरे उपयोजली जातात. उच्चारणदृष्ट्या साधर्म्य असणाऱ्या स्वनांतरांचा गट म्हणजे स्वनिम. तो प्रतिनिधी असतो अर्थात स्वनांतरांचे प्रतिनिधित्व करतो.

**स्वनिमांचे विशेष:**

१. दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न ठरविण्याचे कार्य भाषेतील स्वनिम करत असते.

२. स्वनिमाच्या अंगी अर्थ निर्णयक्षमता असते.


३. एकाच स्वनिक परिसरात अर्थनिर्णायक स्वनिम येऊ शकतात.

४. कधीकधी उच्चार दृष्ट्या स्वनिम एकमेकांच्या अगदी जवळचे असतात. प्रत्यक्ष उच्चारणात स्वनिम नसून स्वतंत्र असतात. अर्थात ते शब्द निर्मितीचा घटक असतात.

## ३.५ स्वनांतरे म्हणजे काय?

एखादा स्वन जेव्हा भाषेमध्ये उपयोजला जातो तेव्हा तो स्वनिम बनत असतो. व्यक्तिपरत्वे, स्थलपरत्वे, कालपरत्वे त्यांच्या उच्चारामध्ये फरक पडत असतो. उदाहरणार्थ चार, चटणी, चाटण, चारा, चटई ही उच्चारणे वेगवेगळी असून भाषेमध्ये यांचा उपयोग होत असताना आजूबाजूंच्या ध्वनीमुळे त्यांच्या उच्चारात फरक होऊ शकतो. हा फरक त्या परिसरामध्ये येणाऱ्या ध्वनीवर अवलंबून असतो. येथे ध्वनीच्या उच्चारणामध्ये जरी फरक पडत असला तर त्यांच्यात उच्चारणदृष्ट्या काही साम्यही असते. असे साम्य असणारे ध्वनी आपण एकत्रितरित्या ओळखतो. वरील ध्वनी 'च' या एका ध्वनीचे सारे स्वन म्हणून आपण ओळखतो. एकाच स्वनाचे परिस्थितीनुसार होणारे हे वेगवेगळे उच्चार असतात. एखादा स्वन कोणत्या परिस्थितीत कसा आला असता त्याचा उच्चार कसा होईल हे आपण समजू शकतो. थोडक्यात, आजूबाजूंच्या ध्वनींमुळे, परिस्थितीमुळे उच्चारांमध्ये फरक होत असतो. जेव्हा उच्चारात फरक होतात. त्यात फरकाचा एक समूह असतो अशा ध्वनीच्या समूहास स्वनिम असे म्हटले जाते आणि या समूहात विशिष्ट असणाऱ्या ध्वनींना 'स्वनांतरे' असे म्हटले जाते. वर दिलेल्या उदाहरणांमध्ये 'च' व्यंजन स्वनिम आहे आणि च१, च२, च३, च४, च५ ही त्या स्वनिमांची स्वनांतरे आहेत. यावरून असे म्हणता येते की, स्वनिमाच्या एकाच गटात समाविष्ट होणाऱ्या वेगवेगळ्या स्वनिमांना स्वनांतरे म्हणतात. ज्या ध्वनीमुळे स्वनांतराचा एक गट निर्देशित होतो त्याला स्वनिम असे म्हटले जाते. स्वनिम व स्वनांतरे यांचा एकमेकांशी कुटुंब प्रमुख आणि त्याचा सदस्य यांच्यामध्ये असणाऱ्या नात्याप्रमाणे संबंध असतो. म्हणजे स्वनिम काल्पनिक, सबोध तर स्वनांतरे त्याची प्रात्यक्षिके असतात. स्वनिम काल्पनिक असल्यामुळे प्रत्यक्ष भाषेमध्ये वापरला जात नाही तर भाषेमध्ये वापर होतो स्वनांतराचा. भाषेमध्ये वापरल्या जाणाऱ्या आणि एकमेकांशी स्वनिकदृष्ट्या साधर्म्य असणाऱ्या स्वनांतराचा एक गट बनवला जातो. हा गट स्वनिम म्हणून ओळखला

जातो. एखादा स्वन दुसऱ्या कोणत्यातरी स्वनाच्या सानिध्यात येतो त्या सान्निध्यात येणाऱ्या स्वनावर त्याचे उच्चारण अवलंबून असते. एखादा स्वन आद्यस्थानी, मध्यस्थानी किंवा अंत्यस्थानी येतो त्यावर त्याचे उच्चारण अवलंबून असते. प्रत्येक वेळा स्वनाचे स्थान बदलले की त्याचा स्वनिक परिसर बदलतो. या स्वनिक परिसराच्या स्थित्यंतरामुळे स्वनांच्या उच्चारात बदल होत  जातात आणि पुढे त्याची स्वनांतरे निर्माण होतात. याबाबत परस्परपूरक विनियोग असलेल्या उच्चार साम्य असलेल्या व अर्थ दृष्ट्या एकच असणाऱ्या स्वनांच्या गटाला स्वनांतरे असे म्हणतात. स्वनिम तिरप्या रेषेत लिहिले जाते तर स्वनांतरे ही चौकटी कंसात लिहिली जातात.




## ३.६ स्वनिमांचे प्रकार

स्वनिमाचे वर्गीकरण दोन पद्धतीने केले जाते. त्यामुळे त्याचे दोन प्रकार पडतात.

१. खंडयुक्त /खंडात्मक स्वनिम

२. खंडाधिष्ठित स्वनिम

### १. खंडयुक्त / खंडात्मक स्वनिम  (Segmental phoneme):

ज्या स्वनिमांचा उच्चार स्वतंत्रपणे करता येतो अशा स्वनिमांना 'खंडयुक्त स्वनिम' म्हणतात. या स्वनिमांवर भाषेचा व्यवहार अवलंबून असतो. त्यामुळ खंड असे नाव त्यांना प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर उच्चारण अवयव, उच्चारण स्थान आणि प्रयत्न या दृष्टीने सुद्धा प्रत्येक स्वनिम वैशिष्ट्यपूर्ण असतो. भाषेचा पाया हे स्वनिमच असतात. स्वर, अर्धस्वर आणि व्यंजन यांनी मिळून होणाऱ्या स्वनिमांना 'खंडयुक्त स्वनिम' असे म्हणतात. भाषेमध्ये त्यांचे लेखन करण्याची पद्धत असते.

### २. खंडाधिष्टीत स्वनिम (Sypra Segmental phoneme):

स्वर, अर्धस्वर आणि व्यंजन यांच्याबरोबरच भाषेतील बलाघात, सुरांचे चढ-उतार, नासिक्यरंजन यांचे अस्तित्व महत्त्वाचे असते. मात्र प्रत्यक्ष लेखनात त्यांना स्थान दिलेले दिसत नाही. बलाघात, सुरांचे चढ-उतार, नासिक्यरंजन इत्यादीमुळे अर्थ भेदकता लक्षात येते. त्यामुळे बलाघात, सुरांची चढ उतार, नासिक्यरंजन इत्यादींनी व्यक्त होणारे जे स्वनिम असतात त्यांना 'खंडाधिष्टीत स्वनिम' असे म्हटले जाते. त्यांचे अस्तित्व खंडयुक्त स्वनिमांवर अवलंबून असते. त्यांच्याशिवाय भाषेमध्ये ही स्वनिम असतात त्यांना 'खंडाधिष्टीत स्वनिम' असे म्हटले जाते. त्यांच्याशिवाय भाषेमध्ये ही स्वनिम स्वतंत्रपणे येऊ शकत नाही. अर्थात ती खंडयुक्त स्वनिमांच्या आश्रयाने येतात.

बोलताना आपल्या मुखातून एकापाठोपाठ एक लांबलचक शब्दमालिका येत असते. त्यामध्ये येणाऱ्या विरामांनी वाक्याचे आकलन होते. शब्द, वाक्यांश यांचे आकलन होणे

munotes.in

इतपत ध्वनिप्रवाह योग्य ठिकाणी खंडित होतो. वाक्यातील विराम, खंड, बलाघात, सुरांचा चढ-उतार यामुळे संबंधित वाक्यावर, त्यातील शब्दांवर, पदिमांवर अर्थदृष्ट्या परिणाम होत असतो. हा परिणाम लक्षात घेण्यासाठी आपल्याला 'खंडाधिष्टीत स्वनिम' लक्षात घ्यावा लागतो. खंडाधिष्टीत स्वनिमांचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी बलाघात, सुरावली, सीमासंधी, नासिक्यरंजन यांची माहिती असायला हवी.

**१. बलाघातः**

भाषेमध्ये बलाघात दोन प्रकारे जाणवते.

१. शब्दातील अक्षरावरील बलाघात

२. वाक्यातील शब्दावरील बलाघात

**१. शब्दातील अक्षरावरील बलाघातः**

शब्द बनत असताना अनेक अक्षरांनी सार्थ अर्थाने बनत असतो. त्यातील कोणत्या तरी एका अक्षरावर बलाघात दिला जातो. त्या शब्दातील इतर म्हणींचा जोर कमी असतो. कोणत्या अक्षरावर बलाघात येणार हे भाषा बोलणाऱ्याला माहीत असते. अर्थात पूर्वज्ञानाशिवाय बलाघात युक्त शब्दांचे व्यवस्थितपणे उच्चारण करता येणार नाही. सामान्यतः शब्दात येणारे बलाघात या स्वरूपाचे असतात. हे परिवर्तन लक्ष असत नाहीत त्यामुळे अर्थदृष्ट्या फरक पडत नाही. अशा बलाघातांचा स्वनिम व्यवस्थेत विचार होणार नाही. पण जेव्हा एखाद्या शब्दातील एखाद्या अक्षरावरचा बलाघात बदलून दुसऱ्या अक्षरावर टाकला असता अर्थामध्ये बदल होतो तेव्हा त्याचा विचार करावा लागतो. इंग्रजी भाषा बलाघात युक्त भाषा आहे. तिच्यामधील काही शब्द हे एकाच वेळी नाम आणि क्रियापद म्हणून वावरत असतात. मात्र ते अक्षर नाम असताना पहिल्या अक्षरावर बलाघात असतो तर तो क्रियापद असताना त्यामध्ये बदल होतो. शब्दातील विशिष्ट ध्वनीवर बलाघात असतो त्यावेळी तो बलाघात देत असताना उच्चारण अवयव दृढ असतात. एखाद्याने काय ऐवजी खाऽऽय असा उच्चार केला असता किंवा मग ऐवजी मऽऽग असा उच्चार केला असता शब्दांमध्ये बदल होतो. मात्र तो अर्थ निर्णायक ठरत नाही. मराठी शब्दावरील आघात हे स्वनिमिक असलेले दिसत नाही. मात्र मूळ शब्द आणि आघाताने उच्चारला जाणारा शब्द त्यांच्यातील अर्थछटांमध्ये निश्चितच फरक असतो. काय या शब्दावरील आघातातून आपण आश्चर्य, उद्वेग, वैताग व्यक्त करत असतो तर 'मग' या शब्दांमधून फुशारकीचा भाव व्यक्त केला जातो.

**२. वाक्यातील शब्दातील बलाघातः**

सामान्य वाक्यामध्ये सर्वच शब्दावर सारखा बलाघात असतो. पण संभाषण करत असताना त्याच्या संभाषणात नेहमीच सामान्य विधाने असत नाहीत. आशयाचे वेगळेपण नजरेत आणण्यासाठी बोलताना वाक्यातील शब्दांवर कमी अधिक आघात दिले जातात. एखाद्या शब्दावर जोर देऊन आशयाचे विशिष्टत्व दाखवले जाते.

**उदाहरणार्थः**

१. **त्याने** गाडी चालवली.

२. त्याने **गाडी** चालवली.

३. त्याने गाडी **चालवली.**

इथे ठळक असलेल्या शब्दावर जोर दिल्यास आशयाचे विशिष्टत्व दृष्टीस पडते. पहिल्या वाक्यातून 'त्याने' वर जोर दिला आहे. दुसऱ्या वाक्यात 'गाडी' या शब्दावर भर दिला आहे. तिसरे वाक्य 'चालवली' या शब्दावर भर देते आहे. म्हणजेच यातील प्रत्येक शब्दावर दिल्या जाणाऱ्या बलाघातामुळे वाक्याच्या अर्थामध्ये बदल होतो. मराठीमध्ये आघाताची अशी खूप उदाहरणे सांगता येतात.

**२. सुरांचा चढ उतार (सुरावली):**

वाक्यातील सर्वच ध्वनीचे उच्चारण सारखे असत नाही. वाक्यातील वाक्याचा सूर चढता ठेवला आणि अगदी शेवटी सूर उंच नेला तर ते वाक्य प्रश्नार्थक बनते. विशेष सुरांमध्ये उच्चारण खाली खाली नेले तर ते वाक्य आश्चर्य सूचक होते. याचे कारण सुरांचा चढ-उतार. त्यामुळे वाक्याचा अर्थ बदलू शकतो. सूर हा स्वतंत्र कंपनामुळे निर्माण होणारा ध्वनी असतो. हाच सूर प्रत्येक घोष ध्वनीमध्ये असतो. सुरांच्या चढ-उताराला 'आरोह-अवरोह' किंवा 'अनुतान/सूरलहर' असे म्हटले जाते. सूरलहर वाक्यात शब्दांमध्ये प्रकट होत असते. शब्दातील सूर बदलला तर अर्थात बदल होतो. हे चिनी भाषेमध्ये आढळते. तिथे 'मा' शब्द विशिष्ट सुरात उच्चारला तर त्याचा अर्थ 'माता' आणखी दुसऱ्या विशिष्ट स्वरात उच्चारला की त्याचा अर्थ 'घोडा' असा होतो. मराठीमध्ये अशा स्वरूपाने दिसत नाही. मराठीत संबोधन वेगवेगळ्या सुरात उच्चारले जाऊ शकते मात्र त्याचा संबंध हा बोलणाऱ्याच्या मानसिकतेशी असतो. त्याने भिन्न अर्थ प्रकट केले जातात. मराठीमध्ये वाक्यातील अनुतान निश्चित दिसतो. जॉकी शब्दातील अनुतान स्वानिमिक असलेला पाहायला मिळत नाही. वरील वाक्यातील अनुतानाचा विचार केला असता, त्याने गाडी चालवली हे आपले विधान सामान्य विधान. हेच विधान वाक्य चढत्या स्वरात विचारले तर प्रश्नार्थक आणि खालच्या सुरात विचारले की आश्चर्य दर्शक असे होईल. अर्थात एकाच वाक्याचा सूर बदलला त्यामध्ये चढ-उतार आणला की तो स्वनिमिक ठरतो.

**३. सीमासंधी:**

वाक्यामध्ये किंवा शब्दांध्ये सुरुवात आणि शेवट या दृष्टीने जे उच्चारण एक स्वतंत्र खंड असते त्याला 'गुरुखंड' म्हणतात. या गुरूखंडाचे उच्चारण वेगळ्या रीतीने केले की अर्थामध्ये फरक पडतो. अर्थात गुरुखंडातील विरामाने दाखवल्या जाणाऱ्या स्वनिमास 'सीमासंधी' म्हणतात.

**उदाहरणार्थ:**

१. तो शेतकरी
तो शेत करी.
२. आंबा खाऊन ये.
आंबा खाऊ नये.

यामध्ये विरामाचे स्थान बदलले की अर्थामध्ये बदल होतो. सीमासंधी हा स्वनिम असल्यामुळे संख्येमध्ये काटकसर होते. 'खाऊ नये' यामधील उच्चारणापेक्षा 'खाऊन ये' याचे उच्चारण वेगळे आहे. त्यामुळे या ठिकाणी दोन स्वनिम मानावे लागतात. पण सीमासंधी हाच स्वनिम मानला की असे दोन स्वतंत्र स्वनिम मानण्याची गरज उरत नाही

munotes.in

**४. नासिक्यरंजन:**

तोंडातील हवा बाहेर पडताना तालूपट वर न जाता तो खाली लोंबत राहतो. त्यामुळे श्वासनलिकेतून तोंडाकडे जाणाऱ्या हवेला अडथळा निर्माण होऊन हवा तालुपटाच्या मागील बाजूने नाकाच्या पोकळीत शिरते आणि त्या ठिकाणी नाद उत्पन्न होतो. हा अडथळा सामान्यत: अपूर्ण असल्यामुळे हवा एकाच वेळी तोंडातून बाहेर पडते. मराठी भाषेमध्ये नासिक्यरंजन दर्शवणाऱ्या काही शब्दांच्या संदर्भात ते अर्थनिर्णायक ठरते. उदाहरणार्थ हंस-हौस, ऐशी-ऐंशी या शब्दांचे विघटन केले तर या ध्वनीचे नासिक्यरंजक झाल्यामुळे तेथे अर्थभिन्नता निर्माण झालेली पाहायला मिळते.

## ३.७ स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे

'स्वनिक' हा काल्पनिक असून त्याला कोणत्याही भाषेत स्वतंत्र अस्तित्व नसते. कोणत्याही भाषेतील स्वनिम निश्चित करण्यासाठी पुढील तत्त्वाचा उपयोग केला जातो.

१. व्यवच्छेदक किंवा वैधर्म्ययुक्त विनियोग

२. पूरक विनियोग

३. वैकल्पिक किंवा मुक्त विनियोग

४. काटकसरीचे तत्त्व

विनियोग याचा अर्थ असा की एखाद्या भाषेमध्ये त्या मध्ये येणाऱ्या स्वनाचे कसे, कशा प्रकारे, किती प्रकारे उपयोजन होते हे लक्षात घेणे युवकांच्या आधारे भाषेची व्यवस्था समजून घेता येते.

**१. व्यवच्छेदक विनियोग:**

भाषेतील स्वन अर्थनिर्णायक असेल तर तो स्वनिम आणि अर्थनिर्णायक नसेल तर तो स्वनाचा स्वनांतर ठरतो. म्हणजे त्या स्वनाजवळ अर्थ निर्णयक्षमता आहे किंवा नाही हे त्याचा विनियोग कसा होतो यावर अवलंबून असते. स्वनांचा उपयोग एकाच स्वनिम परिसरामध्ये होत असेल तर तो अर्थनिर्णायक ठरतो. उदाहरणार्थ 'मान' आणि 'कान'. या दोन एका शब्दातील आद्य 'म' हा स्वन आहे तर दुसऱ्या शब्दामध्ये आद्य 'क' स्वन आहे दोन्ही शब्दांमध्ये म आणि क शिवाय इतर ध्वनी सारखे आहेत. मात्र अर्थ भिन्न आहेत. या वाक्यामध्ये 'म' आणि 'क' हे ध्वनी एकाच स्वनिम परिसरामध्ये आहेत त्याला '**व्यवच्छेदक किंवा वैधर्म्ययुक्त विनियोग**' असे म्हणतात.

आणखी काही पार-फार, कॅट-बॅट, दात-सात, पान - मान अशी उदाहरणे देता येतील. जेव्हा दोन स्वर सारख्याच परिसरामध्ये येतात आणि त्यामुळे अर्थदृष्ट्या भिन्नभिन्न शब्द तयार होतात तेव्हा त्यांच्यात व्यवच्छेदक विनियोग असतो. अशा विनियोगामुळे स्वनिमांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य होते. जेव्हा दोन शब्दातील एक स्वन वगळून अन्य परिसर सारखाच असेल आणि भिन्न अर्थ दर्शक शब्द होत असेल तर अशा शब्द जोड्यांना '**अल्पतम ध्वनीयुग्मे**' असे म्हटले जाते. भाषेमध्ये स्वनिम निश्चितीसाठी ही अल्पतम ध्वनीयुग्मे महत्त्वाची ठरतात.

**२. पूरक विनियोगः**

स्वनांचा विनियोग एकाच स्वनिम परिसरामध्ये होत नसेल तर तो परस्परपूरक असण्याची शक्यता असते. जेव्हा स्वनिक साधर्म्य असलेले दोन स्वन एकमेकांच्या परिसरात येऊ शकत नाहीत तेव्हा त्या दोन स्वनात पूरक विनियोग असतो. यामुळे स्वनिमांची स्वनांतरे कळण्यास मदत होते. उदाहरणार्थ चार, चाक, चमचा, चहा, चरखा इत्यादी शब्दांमधील च१, च२,च३, च४, च५ हे एकमेकांच्या जागी येत नाही.

**३. वैकल्पिक विनियोग /मुक्त विनियोगः**

जेव्हा दोन स्वन एकाच परिसरात येतात पण त्यांच्या अर्थात भिन्नत्व नसते अशावेळी त्या स्वनांचा मुक्त विनियोग असतो. यामध्ये उच्चार भेद जाणवतो त्यामुळे अशा विनियोगाला '**वैकल्पिक उच्चारभेद**' असेही म्हटले जाते.

**४. काटकसरीचे तत्त्वः**

मानवी वागेंद्रियाजवळ असंख्य ध्वनी निर्माण करण्याची क्षमता असते. मात्र कोणत्याही भाषेत ३० किंवा ४० या पेक्षा अधिक स्वनिम आढळत नाहीत. कमीत कमी स्वनिमांच्या साहाय्याने भाषा भाषिक व्यवहार पार पाडत असते. याचे कारण भाषा प्रवृत्ती नेहमी व्यवहार सुलभतेकडे भर देते. मर्यादित स्वनिमांच्या आधारे त्यांची विविध प्रकारे जुळणी करून भाषा विविध शब्द तयार करते. मोजक्या स्वनिमांच्या आधारे अनेक शब्द तयार केले जातात. भाषेतील हे स्वनिम स्वर, अर्धस्वर आणि व्यंजन यामध्ये विभागले गेले आहेत. व्यंजनांच्या दृष्टीने सुलभता येण्यासाठी स्वरांची मदत घेतली जाते. कोणत्याही भाषेत स्वरांची संख्या मर्यादित तर व्यंजनांची संख्या अधिक असते.

## ३.८ मराठीची स्वनिमव्यवस्था

मराठीच्या स्वनिम व्यवस्थेचा विचार करताना मराठीचे औपचारिक रूप लक्षात घ्यावे लागते. भाषाविज्ञान भाषेच्या औपचारिक रूपाकडे विशेष लक्ष देत असल्यामुळे मराठी भाषेच्या बाराखडीमध्ये असलेले स्वन कोणते? बाराखडी मध्ये कोणते स्वन न दाखविता त्याचा उपयोग बोलताना भाषेमध्ये होत असतो. अशा दोन्ही प्रकारचा विचार करावा लागतो. त्याचबरोबर कोणते ध्वनी अर्थविभेदक आहेत त्यांचाही विचार होणे आवश्यक आहे.

मराठी भाषेमध्ये एकूण सोळा स्वर मानले जातात. अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः असे बाराखडीमध्ये असलेले स्वर आणि ऋ ॠ ऌ ॡ हे स्वर ज्यांना परंपरेनुसार मराठीत स्वर मानले जाते, मात्र परंपरेने चालत आलेले हे स्वर यांना स्वरस्वनिम म्हणून मान्यता मिळालेली नाही.

'ऋ' विषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. 'ऋ' चा 'रु' असाही लिहिला जातो. शिवाय मराठी भाषेमध्ये यापासून निर्माण होणारे शब्द हे अल्प आहेत. तसेच याचे आणखी विघटन होते. त्यामुळे याला स्वर स्वनिम मानले जात नाही.

मराठी मध्ये 'ई' आणि 'ऊ' हे अर्थ विभेदक नाहीत त्यामुळे या स्वरांना स्वरस्वनिम मानले जात नाही.

'ऐ' आणि 'औ' हे स्वर दोन स्वरांपासून बनलेले आहेत. स्वनिमाचा विचार करता, स्वनिमाचे आणखी विघटन करता येत नाही हे लक्षण आहे त्यामुळे हे दोन स्वन स्वनिम ठरत नाहीत.

काही शब्द इंग्रजीमधून मराठीमध्ये आलेले आहेत. ज्यामध्ये अॅ आणि ऑ यांचा अंतर्भाव होतो. या दोन्ही स्वरांचे शब्द मराठी भाषेमध्ये आहेत त्यामुळे या दोन स्वरांना स्वरस्वनिम म्हणून मान्यता दिली जाते.

त्यामुळे मराठीच्या स्वरस्वनिमांचा विचार करता, अ, आ, इ, उ, ए, ओ, अॅ, ऑ अशा आठ स्वरांचा अंतर्भाव करता येतो.

**मराठीतील व्यंजन-स्वनिम:**

मराठीमध्ये पारंपरिक व्याकरणातील काही अपवाद वगळता सर्व व्यंजने स्वनिमिक असलेली दिसतात.

'क्ष' आणि 'ज्ञ' यांचे आणखी विभाजन शक्य असल्यामुळे त्यांना स्वनिम मानले जात नाहीत.

'स', 'श' आणि 'ष' यामध्ये 'श' आणि 'ष' यांचा उच्चार एकच होत असल्याने तसेच 'ष' या ध्वनीमुळे अर्थ भिन्नत्व दर्शवणारे शब्द दिसत नाहीत. 'ष' हा स्वतंत्र स्वनिम मानला जाऊ नये असे मत व्यक्त केले जाते.

मराठीमध्ये 'न' या अनुनासिक उच्चारणाशी साधर्म्य साधणाऱ्या 'ञ' या पारंपरिक व्याकरणामध्ये स्थान असलेल्या व्यंजनाला स्वनिम म्हणून स्थान देता येत नाही. कारण तो या 'न' अनुनासिक स्वनिम गटातील स्वनांतर ठरतो. शिवाय मराठीमध्ये त्याची अल्पतम ध्वनीयुग्मे सापडत नाहीत. त्यामुळे मराठीमध्ये न, ण, म, ङ् ही अनुनासिक स्वनिमे म्हणून ओळखली जातात.

काही अभ्यासक न्ह, म्ह, व्ह,ळ्ह ऱ्ह या महाप्राण ध्वनींना स्वनिमे मानतात. मात्र मराठीमध्ये त्यांचे स्थान विवाद्य आहे.

दंतमूलीय स्पर्शसंघर्षी 'च' आणि तालव्य स्पर्शसंघर्षी 'चॅ' हे दोन्ही वर्ग मराठी मध्ये स्वनिमिक ठरतात.

मत्सर-मच्छर, चाट-चाँट, जँप–जप, माजा-माझा असे काही अपवाद वगळता वर्णमालेतील अन्य व्यंजने स्वनिम म्हणून स्वीकारता येतात.

थोडक्यात,

स्फोटक – क्, ख्, ग्, घ्, (मृदूतालव्य)

ट्, ठ्, ड्, ढ् (मूर्धन्य)

त्, थ्, द्, ध् (दन्त्य)

प्, फ्, ब्, भ् (औष्टय)

अर्धस्फोटके - च्, छ्, ज्, झ्

चॅ, जॅ, छँ, झँ

अर्धस्वर - य्, व्

अनुनासिके - न, ण, म, ङ्

घर्षक - स्, श्

महाप्राण - ह् (घोष)

ह् (अघोष)

स्पंदित - र्

पार्श्विक - ल्, ळ्

असे उपरोक्त ३७ आणि य् र् ल् व् न् ण् म् ळ यांची महाप्राणयुक्त य्ह, ऱ्ह, ल्ह, व्ह, न्ह, ण्ह, म्ह, ळ्ह अशी ०८ व्यंजने मिळून ४५ व्यंजने स्वनिम मानावेत.

अशा रीतीने मराठी मध्ये ०८ स्वर स्वनिमे आणि ४५ व्यंजन स्वनिमे मिळून एकूण ५३ खंडित स्वनिमे तयार होतात.

**आपली प्रगती तपासा**

**प्रश्न:** स्वनिमांचे प्रकार सांगून वाक्यामध्ये शब्दातील बलाघात स्पष्ट करणारी तुमच्या परिचयातील उदाहरणे नोंदवा.

## ३.९ समारोप

अशा रीतीने कोणत्याही भाषेमध्ये स्वन-स्वनिम-स्वनांतर यांचे कार्य चालत असते. त्यांच्याशिवाय भाषा अपुरी असते. भाषेचे विविध कंगोरे यातून दिसून येतात. अशा सूक्ष्म पातळीवर भाषेचे विवेचन केल्यास त्या भाषेतील विविधता लक्षात येते. त्यामुळे भाषेचे स्वन-स्वनिम-स्वनांतर या अनुषंगाने विवेचन करणे महत्त्वाचे ठरते. भाषेमध्ये कार्य करणारे ध्वनी हे किती महत्त्वाचे असतात हे यावरून लक्षात येते. ध्वनींची किंवा स्वनांची निश्चिती हे भाषेच्या जडणघडणीचे महत्त्वाचे व प्रथम कार्य असते. दुसऱ्या भाषेच्या संपर्कातून काही रचनांचा स्वीकार भाषा परिस्थिती नुसार करत असते. उदा. इंग्रजी भाषा संपर्कातून मराठीने 'ॲ' आणि 'ऑ' हे स्वन स्वीकारले. हा स्वीकार गरजेतून व परिस्थितीनुसार होत असतो. त्यामुळे स्वन-स्वनिम-स्वनांतर ही भाषेअंतर्गत घडणारी प्रक्रिया भाषाविज्ञानात महत्त्वाची ठरते. ज्याचा विचार आपण या घटकामध्ये केला आहे.

## ३.१० संदर्भ ग्रंथ

१. मालशे, स.ग. /पुंडे द दि./सोमण अंजली : 'भाषाविज्ञान परिचय' : पद्मगंधा प्रकाशन



munotes.in

२. कुलकर्णी, आरती : 'भाषाविज्ञान संकल्पना व स्वरूप'

३. काळे, कल्याण / सोमण, अंजली : 'आधुनिक भाषाविज्ञानः वर्णनात्मक भाषाविज्ञान स्वरूप आणि पद्धती'

४. गोविलकर, लीला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान'.

५. पुंडे, द दि. : 'सुलभ भाषाविज्ञान,' स्नेहवर्धन प्रकाशन.

## ३.११ पूरक वाचन

१. मालशे, स. ग. / सोमण अंजली / इनामदार हे वि. : 'भाषाविज्ञान : वर्णनात्मक भाषाविज्ञान स्वरूप आणि पद्धती' पद्मगंधा प्रकाशन

२. कदम, महेंद्र : 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान,' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

३. कुबेर, वसंत / कुलकर्णी सुलक्षणा : 'भाषाविज्ञान परिचय.'

४. गवळी, अनिल : 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा'

## ३.१२ सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोतरी प्रश्न

१. स्वन - स्वनिम - स्वनांतर म्हणजे काय ? सविस्तर चर्चा करा.

२. स्वन - स्वनिम - स्वनांतर या संकल्पना सांगून स्वनिमनिश्चितीची तत्त्वे लिहा.

३. स्वन-स्वनिम स्वनांतर या संकल्पना सांगून खंडधिष्ठित स्वनिमांची सविस्तर चर्चा करा.

### ब) लघुउत्तरी प्रश्न

१. स्वनिम व स्वनांतर यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

२. स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे सांगा.

३. स्वनिमांचे प्रकार सविस्तर सांगा

४. 'स्वनांतरे' या विषयी चर्चा करा.

### क) रिकाम्या जागा भरा.

१. वाक्यामध्ये किंवा शब्दांमध्ये सुरुवात आणि शेवट या दृष्टीने जे उच्चारण एक स्वतंत्र खंड असते त्याला......म्हणतात.

२. मराठीमध्ये............... स्वर स्वनिमे आहेत.

३. मराठीमध्ये.............. व्यंजन स्वनिमे आहेत.

४. दोन शब्द अर्थ दृष्ट्या भिन्न ठरविण्याचे कार्य भाषेतील...... करत असते

५. भाषेकरिता उपयुक्त असे कार्य करू शकणारा कोणताही ध्वनी म्हणजे............

*****



munotes.in

# ४

# पदविकार : रूपिका, रूपिम, रूपिकांतर, रूपस्वनिका या संकल्पनांचे प्रकारभेद, प्रक्रियांसह स्पष्टीकरण

**घटक रचना**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४ रूपिका आणि शब्द

४.५ पदविन्यासः व्याकरणाच्या कक्षेतील विषय

४.६ रूपिका-रूपिम-रूपिकांतर

४.६.१ रूपिकांतराचे प्रकार

४.६.२ रूपिमांचे प्रकार

४.७ शब्दार्थ व टीपा

४.८ आपली प्रगती तपासा

४.९ समारोप

४.१० संदर्भ ग्रंथ

४.११ अधिक वाचन

४.१२ नमुना प्रश्न


## ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, फेर्दिनां द सोस्यूर या स्वीस भाषाभ्यासकाच्या विचारातून आधुनिक भाषाविज्ञानाचा विकास झाला असे मानले जाते. त्यांनी रूप, व्यवस्था आणि संरचना या अमूर्त संकल्पनांना भाषाविचारात मध्यवर्ती स्थान दिले. भाषेची व्यवस्था आणि व्यवहार असा भाषेमध्ये त्यांनी केलेला भेद भाषाभ्यासाची दिशा बदलणारा ठरला. त्यांच्या विचारातून संरचनावादी किंवा वर्णनात्मक भाषाविज्ञाचा उदय झाला. पुढे या भाषाभ्यासात विविध संप्रदाय उदयाला आले. भाषाभ्यासातील संरचनावादी अभ्यासपद्धती पुढे बरीच लोकप्रिय झाली. या अभ्यासपद्धतीतील पदविचार समजून घेणे प्रस्तुत घटकाचे उद्दिष्ट आहे. हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला –

- भाषिक रूप आणि रूपिका म्हणजे काय समजेल.
- रूपिका आणि शब्द या मधील फरक समजून घेता येईल.
- रूपिका-रूपिम -रूपिकांतर ही संकल्पनात्रयी समजून घेता येईल.
- रूपिकांचे प्रकार आणि घटना समजून घेता येईल.
- रूपिकांतराचे प्रकार समजून घेता येतील.

## ४.२ प्रास्ताविक

सर विल्यम जोन्स यांनी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनामध्ये दिलेले व्याख्यान भाषाभ्यासाची नवी परंपरा निर्माण करणारे ठरले. जोन्स यांच्या विचारातून भाषांच्या ऐतिहासिक अभ्यासाला प्रारंभ झाला. या अभ्यासपद्धतीलाच पुढे तौलनिक भाषाभ्यासाची जोड देण्यात आली. १९ व्या शतकामध्ये या अभ्यासपद्धतीनांच भाषाभ्यासाच्या मूलभूत पद्धती मानल्या जात होत्या. फेर्दिनां द सोस्यूर हे या अभ्यासपद्धतीचे भाषाभ्यास करणारे अभ्यासक, शिक्षक होते. त्यांना या अभ्यासपद्धतींमधील मर्यादा जाणवायला लागल्या. त्यातून त्यांनी भाषाभ्यासासंदर्भात नवे विचार मांडायला सुरुवात केली. या प्रक्रियेतून त्यांनी मांडलेले नवे विचार आणि भाषांकडे पहाण्याची दिलेली नवी दृष्टी आधुनिक भाषाविज्ञानाच्या वाटचालीस कारणीभूत ठरली.

सोस्यूर यांनी आपल्या विचारांमध्ये 'रूप', 'व्यवस्था' आणि 'संरचना' या अमूर्त संकल्पनांना मध्यवर्ती स्थान दिले. भाषेकडे पाहण्याचा ऐतिहासिक दृष्टिकोन टाळून त्यांनी भाषेच्या एककालीन स्थितीवर आपले लक्ष केंद्रीत केले आणि या स्थितीत भाषेची संरचना कल्पून; या संरचनेचे विश्लेषण देण्यावर भर दिला. त्यांच्या या नव्या दृष्टीमुळे भाषाभ्यासाची दिशा बदलून गेली.

आधुनिक भाषाविज्ञानाचा विकास सोस्यूर यांनी घालून दिलेल्या पायावर झाला. त्यांनी भाषाभ्यासात केलेले भाषिक वर्तन (Parol) आणि भाषा व्यवस्था (Langue) किंवा भाषा (Language) आणि भाषण (speech) हे भेद आधुनिक भाषाविज्ञानामध्ये महत्त्वपूर्ण ठरले. इतर कोणत्याही शास्त्राच्या तुलनेत भाषाविज्ञानाने जी प्रगती साधली; त्याच्या मुळाशी सोस्यूर याच्या विचारांचे योगदान आहे. सोस्यूर आणि सोस्यूरच्या प्रभावाने विकसित झालेल्या युरोपियन आणि अमेरिकन संरचनावादी भाषाभ्यासकांच्या दृष्टिकोनातून भाषाभ्यासाच्या विविध शाखा विकसित झाल्या.

सोस्यूर यांनी 'भाषिक वर्तन' हा भेद कल्पिला असला तरी, त्यांनी केवळ 'भाषिक व्यवस्थेला'च आपला अभ्यासविषय केला. सोस्यूर आणि त्यानंतरच्या संरचनावादी भाषाभ्यासकांनीही ज्या भाषिक वर्तनामधून भाषेची व्यवस्था मिळते त्या व्यवस्थेवर आपले लक्ष केंद्रीत केले. कोणत्याही विशिष्ट कालखंडामध्ये भाषा स्थिर मानून तिचे वर्णन करता येते; हा विचार सोस्यूर यांनी रुजविला. पाणिनीने 'अष्टाध्यायी' या आपल्या ग्रंथामध्ये भाषाविश्लेषणासाठी वापरलेल्या पद्धतींचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव आधुनिक संरचनावादी भाषाभ्यासावर पडलेला आढळतो. म्हणूनच पाणिनीच्या भाषाविश्लेषणाशी आजचे संरचनावादी भाषाविज्ञान नाते सांगते. वर्तनवादी मनोविज्ञानाचा अभ्यासक असलेला अमेरिकन भाषावैज्ञानिक लेनर्ड ब्लूमफील्ड यांनी 'भाषा हे एक प्रकारचे वर्तन असून तिचा शास्त्रीय अभ्यास करता येतो असे' मत मांडले. आपल्या या मतानुसार नैसर्गिक शास्त्रांचा अभ्यास ज्या संरचनावादी पद्धतीने होतो; त्याच पद्धतीने भाषेचाही अभ्यास करता येतो हे त्याने दाखवून दिले.

साधारणतः १९३० ते १९५५ हा काळ 'संरचनावादी' भाषाभ्यासाचा काळ म्हणून ओळखला जातो. अमेरिकन भाषावैज्ञानिक ब्लूमफील्ड हाच या अभ्यासपद्धतीचा प्रणेता आहे. वर्ण्यविषयाचे विविध स्तर उलगडून दाखविणे, प्रत्येक स्तरावरील घटक स्पष्ट करणे,



munotes.in

त्या घटकांचे अंत:संबंध स्पष्ट करून; या संबंधावर आधारलेली व्यवस्था स्पष्ट करणे अशा प्रकारच्या अभ्यासाला 'संरचनात्मक अभ्यास' म्हणतात. भाषेच्या अभ्यासात ही पद्धती ब्लूमफील्ड आणि त्यानंतर बर्नाड ब्लॉक, जॉर्ज ट्रेगर, झीलिंग हेरिस, युजिन नायडा, मार्टिन जूस, सलॉन बेल्झ, चार्लझ हॉकेट या अभ्यासकांनी वापरली. अमेरिकेमध्ये विस्तार पावलेली ही भाषाभ्यासाची पद्धत असल्याने या अभ्यासाला संरचनावादी किंवा अमेरिकन संरचनावादी अभ्यासाची पद्धत म्हणून ओळखले जाते. स्वनविज्ञान, स्वनिमव्यस्था, रूपिमव्यवस्था, वाक्यव्यवस्था आणि अर्थविन्यास असे पाच स्तर कल्पून ब्लूमफील्डने भाषाभ्यास केला. तथापि अर्थाचे क्षेत्र व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे असल्याने या क्षेत्राचा शास्त्रीय अभ्यास अशक्य आहे हे लक्षात आल्यानंतर आपल्या भाषाविचारातून त्याचे 'अर्थ' स्तराला बाजूला ठेवले.

ब्लूमफील्डने आपल्या भाषाविचारात अर्थविचार बाजूला ठेवला. त्यामुळे त्याच्या प्रभावाखाली भाषाभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनीही या भाषिक पैलूची धास्ती घेतली होती. भाषेच्या इतर चार स्तरापेक्षा अर्थाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्यात काही अडचणी होत्या. कारण भाषेतील अर्थाविषयी काही सिद्धान्त इतक्या व्यापक स्वरूपात मांडले गेले होते की; या सिद्धान्तांची व्यवस्था भाषाविज्ञानाच्या संकल्पनात्मक चौकटीमध्ये लावणे गुंतागुंतीचे होते. अमेरिकन संरचनावादी अभ्यासामध्ये अर्थाचा विचार क्षीण असला तरी पुढे हा विचार विकसित झाल्याचे दिसते. त्यातूनच भाषेतील शब्दसंग्रहाच्या अर्थरचनेविषयी थोडीफार मर्मदृष्टी युरोपियन अभ्यासकांना प्राप्त झाली.

## ४.३ विषय विवेचन

स्वन-स्वनिम-स्वनांतर ही संकल्पना समजून घेताना आपण भाषिक ध्वनींचा विस्ताराने विचार केला. भाषा ही ध्वनींनी बनलेली असते. मानवी मुखावाटे असंख्य ध्वनींची निर्मिती करता येते. यापैकी काही निवडक ध्वनीच भाषेमध्ये वापरले जातात. जगभरातील भाषांचे निरीक्षण करता केवळ तीस ते सत्तर ध्वनीच भाषेत मूलध्वनी म्हणून कार्यरत असल्याचे दिसतात. भाषिक ध्वनीनाच 'स्वन' ही संज्ञा आहे. हे स्वन प्रत्यक्ष भाषेत येतात तेव्हा त्यांना स्वनिम म्हणून ओळखले जाते. स्वनिमांचा विचार भाषासापेक्ष होतो. परंतु, स्वनिमांना स्वत:चे अर्थ नसतात. स्वनिमांच्या अंगी दोन उच्चारणे अर्थाच्या दृष्टीने वेगळी ठेवण्याचे सामर्थ्य असते. या सामर्थ्यामुळे स्वनिमांच्या वेगवेगळ्या सानुक्रम रचना करून अनेक उच्चारणे तयार करता येतात. म्हणून मानवी भाषा हवे तेवढे अर्थ व्यक्त करू शकते. भाषेत निरनिराळे अर्थ निर्माण करण्याची पद्धत म्हणजे भाषेची 'दुहेरी संरचना' (Double Patterning) होय.

स्वनिमांच्या अंगी असलेली अर्थविभेदक शक्ती ही भाषेच्या दुहेरी संरचनेतील पहिल्या पातळीवरची रचना असते. स्वनिमांची अर्थविभेदक शक्ती लक्षात घेऊन स्वनिमांचे निरनिराळ्या प्रकारे संयोग करून त्याचे सार्थ गट बनविले जातात. स्वनिमांच्या गटांना दिलेला अर्थ ही दुसऱ्या पातळीवरची रचना होय.

उदाहरणार्थ, म्, क्, आ, अ या स्वनिमांच्या पुढील रचना पाहा.

१. म् + अ + क + आ = मका

२. क् + आ + म् + अ = काम

३. आ + क् + म् + अ = आक्म

४. आ + म् + क् + अ = आम्क

या उदाहरणातील ‘मका’ आणि ‘काम’ या दोन रचना मराठी भाषेतील सार्थ रचना आहेत. तर क्रमांक ३ व ४ या रचना मराठी भाषेतील कोणताही अर्थ व्यक्त करीत नाहीत. कोणतीही भाषा जे स्वनिम स्वीकारते त्यांचे निरनिराळ्या प्रकारचे संयोग करण्याची भाषेची क्षमता अमर्याद असते. यापैकी काही विशिष्ट संयोग भाषेत अर्थधारणेसाठी उपयोजिले जातात. वरील स्वनिमविचारात आपण भाषेच्या अर्थनिरपेक्ष संरचनेचा अभ्यास केला. येथे आपण भाषेतील सार्थ घटकाचा विचार करणार आहोत. या घटकाचा विचार केल्यानंतर भाषेत अर्थधारणेसाठी नवे संयोग कसे निर्माण होतात हे लक्षात येईल. नवा आशय, कल्पना, विचार मांडताना स्वनिमसंयोग किंवा आहे त्या संयोगातील स्वनिमांच्या अनुक्रमात बदल करून अर्थधारणेसाठी नवा संयोग तयार होणे या भाषेतील प्रक्रियेचा विचार येथे करू.

भाषेतील सार्थ घटकाला भाषिक रूप (Linguistic Form) म्हणतात. ही भाषिक रूपे आकाराने लहान मोठी असतात.

भाग आणि राग या स्वनिमरचना मराठी भाषेमध्ये विशिष्ट अर्थवाहक आहेत. या स्वनिम समूहातील भ आणि र हे स्वनिम अर्थभेदक आहेत. बाकी स्वनिकपरिसर एकसारखाच आहे.

भाग आणि राग या दोन स्वनिम रचना आहेत. या स्वनिम रचना सर्वात लहान आहेत. या रचनांचे पुन्हा विभाजन करता येत नाही. या रचनांना ‘रूपिका’ (Morph) म्हणतात.

खालील दोन वाक्ये पाहा,

१. महाविद्यालय चार भाग विभागले आहे.

२. प्राचार्य राग आहेत.

वरील वाक्यांमध्ये भाग आणि राग या दोन्ही रूपिका आहेत तशा ठेवण्यात आलेल्या आहेत. वाक्यातील या रूपिकांची जागाही योग्य आहे. परंतु, ही वाक्ये अर्थपूर्ण होत नाहीत. व्यवहारात ही वाक्ये अशी उच्चारली जात नाहीत. ती पुढीलप्रमाणे उच्चारली जाताना दिसतील.

१. महाविद्यालय चार भागात विभागले आहे.

२. प्राचार्य रागात आहेत.

वरील वाक्यांमध्ये भागात आणि रागात या रचना योग्य वाटतात. वरील वाक्यांची गरज त्या पूर्ण करतात. त्यामुळे ही वाक्ये सुविहीत झाली आहेत. भागात, रागात या रचनांना आपल्याला पद म्हणता येईल. या पदामध्ये,

भाग + आ + त

राग + आ + त

अशा तीन रूपिका आहेत. या मधील भाग या रूपिकेची भ् + आ + ग् + अ असे विभाजन केल्यास आपल्याला स्वन मिळतात. त्यांना भाषेत अर्थ नसतो. रूपिकेचे अर्थदृष्ट्या पुन्हा विभाजन शक्य नसते. त्यामुळे रूपिकेची व्याख्या 'भाषिक रूपातील अर्थदृष्ट्या अंतिम लघुत्तम घटक म्हणजे रूपिका' अशी करता येईल.

वरील वाक्यांमधील भाग आणि राग या रूपिका 'हा भाग उजाड आहे.' आणि 'मला राग अनावर होतो' या वाक्यांमध्ये परिवर्तीत होत नाहीत. त्यामुळे येथे भाग, राग ही पदे आहेत. तर 'प्राचार्य रागात आहेत' या वाक्यात 'राग' या रूपिकेला प्राचार्यांशी संबंधित होताना परिवर्तीत होऊन 'रागात' असे पद तयार होते. त्यामुळे पदाची व्याख्या करताना, 'केवळ स्वरूपातील रूपिका किंवा इतर शब्दांशी संबंधित होताना संबंधित भाषेच्या व्याकरणिक प्रक्रियेने बदलणारी आणि व्याकरणिक रूप धारण करणारी रूपिका म्हणजे पद होय.' (डॉ. दिलीप धोंडगे, पृष्ठ ९२) अशी केली जाताना दिसते. तर व्याकरणिक रूपातील शब्दाचे सर्वात लहान अविघटनक्षम रूप म्हणजे रूपिका होय.

रूपिका ही व्याकरणाचा मूल घटक असते.

पदाचे विघटन रूपिकांमध्ये होते.

भाषाव्यवहारामध्ये सार्थ (अर्थपूर्ण) घटकाला महत्त्व असते. भाषेतील कोणत्याही सार्थ घटकाला 'भाषिक रूप' (Linguistic form) असे म्हणतात. भाषेतील असे सार्थ घटक लहान-मोठ्या स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ,

१. महाविद्यालयाचे दोन खेळाडू राष्ट्रीय पातळीवर चमकले.

२. महाविद्यालयाचे दोन खेळाडू.

३. महाविद्यालयाचे

४. महा + विद्या + लय + आ + चे

या उदाहरणामध्ये क्रमांक १ हे पूर्ण वाक्य, क्रमांक २ हे उपवाक्य, क्रमांक ३ हा शब्द आणि क्रमांक ४ हे शब्दघटक आहेत. क्रमांक १ ते ४ ही सर्वच भाषिक रूपे आहेत. कारण हे सर्वच सार्थ घटक आहेत. क्रमांक ४ मधील महा, विद्या, लय, आ आणि चे ही देखील सर्व भाषिक रूपे आहेत. भाषेतील अशा सर्वात लघुत्तम रूपांनाच 'रूपिका' (Morph) असे म्हणतात.

म्हणजेच भाषेतील रूपांचे अर्थाच्या दृष्टीने विभाजन करीत गेल्यास शेवटी मिळणारे सर्वात लहान सार्थ रूप, ज्याचे पुढे पुन्हा विभाजन शक्य नसते, भाषेतील अशा रूपांना 'रूपिका' म्हणतात. व्यवहारामध्ये आपण सतत 'शब्द' हा शब्द अर्थ घटकासाठी उपयोजित असतो. शब्द हे देखील भाषेतील सार्थ घटक आहेत. परंतु, शब्द आणि रूपिका यामध्ये एक मूलभूत असा फरक आहे.

## ४.४ रूपिका आणि शब्द

'शब्द' आणि 'रूपिका' या दोन कल्पनांविषयी आपण चर्चा करू. भाषेतील शब्द आणि रूपिका हे दोन्ही अर्थघटक आहेत. परंतु, वरील उदाहरणाची चर्चा केल्याप्रमाणे रूपिकेचे अर्थदृष्ट्या पुन्हा विभाजन होऊ शकत नाही. तसे शब्दाचे होत नाही. शब्दाचे अर्थदृष्ट्या पुन्हा विभाजन होऊ शकते.

munotes.in

'महाविद्यालयाचे दोन खेळाडू राष्ट्रीय पातळीवर चमकले' या वाक्यातील, 'महाविद्यालयाचे' या शब्दात 'महा + विद्या + लय + आ + चे' असे पाच अर्थघटक आहेत. परंतु, त्याच्या पुढील 'दोन' या शब्दात एकच अर्थघटक आहे. म्हणजे दोन या शब्दाचे अर्थदृष्ट्या पुन्हा विभाजन शक्य नाही. त्यामुळे 'दोन' हा शब्दही आहे आणि रूपिकाही आहे. त्याचबरोबर 'राजूने आंबा पाडला' या तीन शब्दाच्या वाक्यामध्ये राजू + ने + आंबा + पाड + ला अशा पाच रूपिका दिसतात. म्हणजे एखाद्या शब्दात एकांपेक्षा अधिक रूपिका समाविष्ट असतात. परंतु, रूपिकेचे असे नसते. रूपिकेचे पुन्हा विभाजन होत नाही, शब्द ही संकल्पना व्यापक आहे. ती अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने वापरली जाते. कधी प्रत्ययविरहित, कधी सप्रत्यय तर कधी दुसऱ्या शब्दरूपासह संयुक्तपणे अशी भाषिक रूपे आपण शब्द म्हणूनच ओळखतो. त्यामुळे शब्दाचा विचार करताना या सर्वांचा विचार अपेक्षित आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी विसंगती व घोटाळे टाळण्याच्या उद्देशाने अशा रूपांना 'शब्द' न म्हणता 'पद' म्हणणे अधिक सयुक्तिक ठरते.

रूपिकांचे पुन्हा दोन प्रकार कल्पिन्यात आलेले आहेत.

१) वाक्यात स्वतंत्रपणे येऊ शकणाऱ्या रूपिका

२) वाक्यात स्वतंत्रपणे न येता दुसऱ्या रूपिकांच्या आश्रयाने येणाऱ्या रूपिका.

ज्या रूपिका वाक्यात स्वतंत्रपणे येऊ शकतात त्यांना 'मुक्त रूपिका' असे म्हणतात वरील उदाहरणामधील 'महाविद्यालयाचे' ही रूपिका स्वतंत्रपणे येऊ शकते. उदाहरणार्थ, महाविद्यालयाचे शिबिर, महाविद्यालयाचे प्राचार्य इत्यादी म्हणून ही 'मुक्त रूपिका' होय. तर ज्या रूपिका वाक्यात दुसऱ्या रूपिकांच्या आश्रयाने येतात त्यांना 'बद्ध रूपिका' असे म्हणतात. वरील उदाहरणातील आ, चे, लय या बद्ध रूपिका आहेत. या स्वतंत्रपणे वाक्यात येऊ शकत नाहीत.

## ४.५ पदविन्यास : व्याकरणाच्या कक्षेतील विषय

भाषा ही व्यवहारासाठी वापरली जाणारी व्यवस्था आहे. आशयाचे वहन हे तिचे मुख्य काम आहे. भाषा ही ध्वनींनी (स्वनिमांनी) बनलेली असली तरी; भाषिक ध्वनींना म्हणजेच स्वनिमांना स्वतःचे अर्थ नसतात. रूपिका सार्थ असतात. तरीही केवळ रूपिकांच्या माध्यमातून पूर्ण होत नाही. कारण भाषा म्हणजे केवळ रूपिकांना एकापुढे एक ठेवून केलेला व्यवहार नाही. व्यवहारासाठी या रूपिकांची विशिष्ट पद्धतीने विशिष्ट क्रमाने रचना केल्याने अर्थ प्राप्त होतात. उदाहरणार्थ,

तो गाणं शिकत जातो.

मराठीत भाषेतील या चार रूपिका आहेत. या एकापुढे एक ठेवून काहीही अर्थ व्यक्त करीत नाहीत. याच रूपिकेंची

तो गाणे शिकायला जातोय.

अशी रचना केल्यास विशिष्ट अर्थव्यक्ती होते. त्यामुळे भाषेमध्ये रूपिकांची अशी विशिष्ट रचना करणे अपेक्षित असते. भाषेतील या रचनापद्धतीलाच त्या भाषेचे व्याकरण असे म्हणतात. उदाहरणार्थ, 'त्यांच्याकडे', 'विद्यापीठातील' या शब्दरचना, 'विभागप्रमुख', 'प्रश्नप्रत्रिका' यासारख्या समासयुक्त रचना, 'हुशार मुले', 'अभ्यासू विद्यार्थी' यासारख्या

पदबंधात्मक रचना आणि 'मी आज वेळेत शाळेमध्ये पोहोचले' अशी वाक्यात्मक रचना व्याकरणाच्या कक्षेत येतात.

व्याकरणिक रूपातील शब्दाचे सर्वात लहान अविघटनक्षम रूप म्हणजे रूपिका होय. रूपिका ही व्याकरणाचा मूल घटक आहे, पदाचे विघटन रूपिकांमध्ये होते. रूपिका, त्याचे प्रकार, त्याच्यापासून निर्माण होणारी पदे इत्यादीचा विचार व्याकरणाच्या कक्षेत होतो. कोणत्याही भाषेतील पद, रूपिकांचा विचार त्या भाषेतील व्याकरणाच्या मूलतत्त्वाच्या आधाराने करावा लागतो.

पदनिर्मित होत असताना, विविध रूपिका एकत्र येत असताना त्यांच्यातील स्वनांवर परिणाम होऊन बदल होतो. बदलाच्या या प्रक्रियेला 'पदस्वनिमिकी' किंवा 'रूपस्वनिमिकी' म्हणतात, तेव्हा रूपिका, रूपिकांचे प्रकार, पदनिर्मितिप्रक्रिया, पदस्वनिमिका वगैरेचा अभ्यास भाषाविज्ञानामध्ये ज्या पद्धतीने होतो. त्याला 'पदविन्यास' म्हणतात. व्याकरण हे भाषेच्या अंतःसूत्रांशी व भाषिक व्यवहाराशी संबंधित असते. प्रत्येक भाषेची अंतःसूत्रे व व्यवहार ठराविक असतात. त्यामुळे प्रत्येक भाषेचे व्याकरण एकसारखे नसते.

उदाहरणार्थ, पुढील वाक्ये पाहा,

१. पाण्यात In the water

२. मी पुस्तक वाचतोय I am reading a book.

पहिल्या उदाहरणामध्ये इंग्रजीतील In the या पदांनंतर water हे पद येऊन अर्थ निर्माण होतो. मराठी भाषेत 'पाण्यात' या पदानेच तो अर्थ व्यक्त होतो. मराठीत पाणी या पदाला लागूनच इतर पदे येतात. आणि दुसऱ्या उदाहरणामध्ये इंग्रजी कर्ता - क्रियापद - कर्म अशी रचना दिसते. तर मराठीमध्ये कर्ता-कर्म-क्रियापद अशी रचना आहे. या उदाहरणावरून प्रत्येक भाषेचे व्याकरण वेगळे असल्याचे लक्षात येते.

**व्याकरण : भाषिक रूपांचा अभ्यास दोन पातळ्यांवर:**

भाषेमध्ये व्यवहारासाठी 'भाषिके रूपे' (Linguistic Forms) बनवावी लागतात. ही भाषिक रूपे शब्द आणि वाक्य अशा दोन्ही पातळ्यांवर बनविली जाताना दिसतात. कोणत्याही भाषेत शब्द, पदबंध, उपवाक्य आणि वाक्य अशा पातळ्यांवर भाषिक रूपे आढळतात.

व्याकरणामध्ये या भाषिक रूपांचा १. पदविचार २. वाक्यविचार अशा दोन पातळ्यांवर विचार करावा लागतो. पदविचारात शब्दापर्यंतचा विचार अंतर्भूत आहे. पदापेक्षा इतर मोठ्या रचनांचा म्हणजेच पदबंध, उपवाक्य आणि वाक्य यांचा विचार वाक्यविचारात होतो. पदविचार व वाक्यविचार हे व्याकरणाचे दोन भाग मानले जातात. ते केवळ अभ्यासाच्या सोयीसाठी वास्तविक पदविचार आणि वाक्यविचार हे दोन्ही भाग एकमेकांपासून पूर्णतः वेगळे काढता येत नाहीत. या दोन्हींच्या सीमारेषा अनेकदा अस्पष्ट असतात. शिवाय त्या भाषेगणिक बदलतानाही दिसतात. त्यामुळे एखाद्या भाषेत पदविचार महत्त्वाचा ठरतो तर एखाद्या भाषेत वाक्यविचार. एखाद्या भाषेतील भाषिक रूप कोणत्या विचारात मोडते हे त्या भाषेने स्वीकारलेल्या रचनापद्धतीवर ठरते.

munotes.in

उदाहरणार्थ, 'टेबलावर' या भाषिक रूपाचा विचार मराठीमध्ये पदविचारात करावा लागतो. तर हाच आशय व्यक्त करणाऱ्या इंग्रजी भाषेतील रूपाचा म्हणजे On the table चा विचार वाक्यविचारात करावा लागतो.

पदविचारात रूपिकेचे स्वरूप, रूपिकेचे प्रकार, रूपिकेचे कार्य आणि रूपिकांच्या विशिष्ट रचनांमुळे बनणारा शब्द याचा विचार केला जातो.

## ४.६ रूपिका-रूपिम-रूपिकांतर

सुरुवातीला आपण स्वन-स्वनिम-स्वनांतर ही संकल्पना समजून घेतलेली आहे. या संकल्पनेला समांतर अशीच ही संकल्पना आहे. रूपिका ही संकल्पनाही आपण मागील मुद्द्यामध्ये समजून घेतली. रूपिका ह्या भाषेतील अर्थदृष्ट्या लघुत्तम घटक असतात. अशा भाषेतील रूपिका कार्याच्या दृष्टीने येऊ शकतात. समान कार्य करणाऱ्या रूपिकांचा गट करता येतो. रूपिकांच्या अशा गटाला 'रूपिम' म्हणतात. रूपिम हे स्वनिमाप्रमाणे गटवाचक नाम आहे. रूपिम काल्पनिक असतो. तो अमूर्त असतो. भाषेत प्रत्यक्ष वावरत असतात त्या विशिष्ट रूपिम गटातील रूपिकांच. रूपिम अमूर्त असतो. कारण तो केवळ गटाचे प्रतिनिधित्व करतो. रूपिमाचे मूर्त आविष्करण रूपिका असतात. एका रूपिम गटात समाविष्ट असलेल्या रूपिकांना त्या विशिष्ट रूपिमाची रूपिकान्तरे म्हणतात. रूपिकान्तर ही कल्पना रूपिकांच्या संदर्भातच वापरली जाते. म्हणजे रूपिका व रूपिकान्तर एकच होय.

उदाहरणार्थ, माणूस या रूपिमाची माणूस, माणस, माणुस, मानस ही वेगवेगळी रूपिकांतरे आहेत. व्यवहारात माणूस, माणसाने, माणुसकी, मानसपुत्र इत्यादी रूपे वापरली जातात. भाषाविषयक लेखनामध्ये रूपिम महिरपी कंसात तर रूपिकान्तरे स्वनिमाप्रमाणे तिरप्या रेषांमध्ये दर्शवितात. उदाहरणार्थ,

| | |
|---|---|
| | /माणूस/ |
| {माणूस } | /माणस/ |
| | /माणुस/ |
| | /मानस/ |

रूपिका-रूपिम-रूपिकांतर यांच्या व्याख्यासंदर्भात चर्चा आपण केली. रूपिका ह्या भाषेतील अर्थदृष्ट्या लघुत्तम घटक असतात. अशा भाषेतील रूपिका कार्याच्या दृष्टीने येऊ शकतात. समान कार्य करणाऱ्या रूपिकांचा गट करता येतो. हे आपण पाहिले. या रूपिका १. अर्थदृष्ट्या समान असाव्यात, २. रूपदृष्ट्या समान असल्याच पाहिजेत असे नाही. ३. त्या रूपिकांमध्ये पूरक विनियोग अथवा मुक्त परिवर्तन हवे, ४. त्या रूपिका व्याकरणिक संरचनेच्या दृष्टीने समान असाव्यात. हे समजून घेण्यासाठी आपण अजून एक इंग्रजी भाषेतील अनेकवचनाचे उदाहरण पाहू.

| | | |
|---|---|---|
| Cat | : | Cats (कॅटस) |
| Dog | : | Dogs (डॉग्ज) |
| Rose | : | Roses (रोजिज्) |

वरील उदाहरणामध्ये एकवचन अनेकवचन अशा जोड्या आहेत. रूपिका भिन्न आहेत पण कार्य समान दिसते.



munotes.in

१. 'स्' ही रूपिका अघोष स्वनिमानंतर येते.

२. 'ज्' ही रूपिका सघोष स्वनिमानंतर येते.

३. 'इज' ही रूपिका स्पर्शसंघर्षी आहे. शिवाय ती घर्षक स्वनिमानंतर येते.

'स' ही रूपिका सघोष स्वनिमानंतर येऊ शकत नाही. व 'ज' ही रूपिका अघोष स्वनिमानंतर येऊ शकत नाही. याचा अर्थ यांच्यामध्ये पूरकविनियोग म्हणून स्,ज, इज् या रूपिकांना रूपिकांतरे म्हणता येईल. इंग्रजीतील 'अनेकवचन' या रूपिमांची ही रूपिकांतरे आहेत.

**४.६.१ रूपिकांतरांचे प्रकार:**

रूपिकांतराचे तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते. १. स्वनिमाश्रयी रूपिकांतर २.रूपिमाश्रयी रूपिकांतर ३. शून्य रूपिकांतर

**१. स्वनिमाश्रयी रूपिकांतर :** रूपिका - रूपिम - रूपिकांतर ही संकल्पना समजून घेताना आपण इंग्रजीतील 'अनेकवचनी' स, ज्, आणि इज् या रूपिकांचा विचार केला. 'स्' हे रूपिकांतर अघोष स्वनिमानंतर येते; 'ज्' हे रूपिकांतर सघोष स्वनिमानंतर येते आणि 'इज' हे रूपिकांतर स्पर्शसंघर्षी आणि घर्षक स्वनिमानंतर येते. म्हणजे ह्या तिन्ही रूपिकांतराचा उपयोग विशिष्ट स्वनिमांवर अवलंबून आहे. ज्या रूपिकांतराचा भाषेतील वावर आजूबाजूची स्वनिमिक परिस्थिती ठरविते, त्या रूपिकांतरांना 'स्वनिमाश्रयी रूपिकांतरे' असे म्हणतात. येथे रूपिम कोणत्या स्वनिमाच्या सान्निध्यात येते त्यावर त्याचे रूप अवलंबून असते.

उदाहरणार्थ, निषेधार्थी 'बे' या रूपिमाचे भाषेतील उपयोजन स्वनिमाश्रित आहे.

बे = बेशिस्त, बेपर्वाई, बेदिक्त, बेफिकीर बेभरोशी इत्यादी.

**२. रूपिमाश्रयी रूपिकांतर :** संयोग पावताना स्वनिमांशी संबंध नसलेली, पण विशिष्ट रूपिमांशी संबंध राखून त्यांच्या आश्रयाने संयोग पावणारी रूपिकांतरे ही रूपिमाश्रयी रूपिकांतरे होय. भाषेत काही वेळा भाषेने स्वीकारलेल्या संकेतानुसार कोणती रूपिकांतरे कोणत्या परिसरात यायचे हे ठरते. अशा रूपिकांतरानाच/-रूपिमाश्रयी रूपिकांतरे म्हणतात.

उदाहरणार्थ, मराठीतील अनेक धातू रूपिमाश्रयी आहेत.

{जा} (धातू)- वर्तमानकाळ –जातो, भूतकाळ-गेलाय

वरील जातो, गेला ही रूपिकांतरे रूपिमाश्रयी आहेत.

**३. शून्य रूपिकांतर :** भाषेतील काही रूपांचे अनेकवचन होताना मूळ रूप जसेच्या तसे राहते. अनेकवचनी रूपे/प्रत्यय दृश्य स्वरुपात नसतात. तेव्हा त्यांना शून्य रूपिकांतर असे म्हणतात. हे रूपिकांतर दृश्य स्वरूपात नसल्यामुळे ही एक वेगळी संकल्पना म्हणून पाहिले जाते.

उदाहरणार्थ : कवी कविता लिहितो

: कवी संमेलनात एकत्र येतात.

: मोर नदीकाठी आहे.

: मोर नदीकाठी आहेत.

या उदाहरणात अधोरेखित कवी व मोर ही रूपे एकवचनी आणि अनेक वचनी अशा दोन्ही अर्थाने वापरलेली आहेत. येथे अनेकवचनी प्रत्यय अस्तित्वात नसल्याने त्यांना शून्य रूपिकान्तर असे म्हणतात

{कवि} / कवी (अनेकवचन)/०/

{मोर} / मोर (अनेकवचन)/०/

शून्य रूपिकांतर /०/ या चिन्हांने दर्शवितात.

**४.६.२ रूपिमांचे प्रकार:**

रूपिमांना स्वतःचे अर्थ असतात. ते भाषेत विशिष्ट व्याकरणिक कार्य पार पाडताना दिसतात. या कार्याच्या स्वरूपावरून रूपिमांचे चार प्रकार कल्पिन्यात आलेले आहेत. ते खालीलप्रमाणे,

**१. अनन्यसाधारण रूपिम :** एखाद्याच किंवा अत्यंत मर्यादित रूपिमांना जोडून वापरल्या जाणाऱ्या रूपिमाला 'अनन्यसाधारण रूपिम' असे म्हणतात. त्यांचा पदात होणारा वापर अनन्यसाधारण असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| **उदाहरणार्थ,** | मारझोड | = | मार + झोड |
| | पिवळाजर्द | = | पिवळा + जर्द |
| | पांढराफटक | = | पांढरा + फटक |
| | हातखंडा | = | हात + खंडा |

या उदाहरणांमधील दुसरी पदे सार्थ आहेत असे म्हणता येत नाही. त्याचबरोबर त्यांचे इतरत्र उपयोजन होईल हेही सांगता येत नाही. म्हणजेच या रूपांचा वापर मर्यादित आहे. ही रूपे म्हणजेच अनन्यसाधारण रूपिम आहेत.

**२. आशयबोधक रूपिम:** मूर्त किंवा अमूर्त आशयाचे सूचन करणाऱ्या रूपिमांना आशयबोघक रूपिम असे म्हणतात. त्यांना धातू किंवा मूळ असेही म्हटले जाते.
उदाहरणार्थ, झाड, जमीन, फूल, घर, देव, बस, पळ

कोणत्याही भाषेत या रूपिमांची संख्या सर्वाधिक असते. या रूपिमांच्यामुळे वस्तूंचा, पदार्थाचा, विचारांचा किंवा भावनांचा बोध होतो हे मुक्त रूपिम असतात.

**३. कार्यसूचक रूपिक :** आशयबोधक रूपिमे मुक्त रूपिमे आहेत. परंतु, भाषाव्यवहारात अर्थ पूर्णतेसाठी त्यांचा उपयोग होत नाही. कारण केवळ या रूपिमांना भाषिक व्यवहार शक्य नसतो. उदाहरणार्थ, 'विहीर गर्दी नाही' हे विधान होऊ शकत नाही. परंतु, 'विहिरीवर गर्दी झाली नाही' हे विधान होते.

**४. मिलन रूपिम :** जेव्हा दोन निरनिराळे अर्थ एकाच रूपिमाने दर्शविले जातात, तेव्हा त्या रूपिमाला मिलन रूपिम म्हणतात. त्यालाच संमिश्र रूपिम असेही म्हटले जाते.

उदाहरणार्थ, 'घोड' या धातू रूपिमाला 'आ' हा प्रत्ययकारी रूपिम लागला की घोडा हा रूपिम मिळतो किंवा 'गेला' या क्रियापदात गे, ल, आ हे तीन रूपिम आहेत.

### • रूपिमांची आवृत्तिक्षमता:

मराठी भाषेतील व्याकरणात धातू आणि प्रत्यय यांचे अनुक्रमे आशयबोध रूपिम आणि कार्यकर रूपिम असे आपण वर्गीकरण अथवा प्रकार केलेले आहेत. धातू म्हणजे शब्दाचे मूळे रूप होय. धातूंना दोन प्रकारचे प्रत्यय लागतात. एक विकारक (विभक्ती) प्रत्यय आणि दुसरे साधक प्रत्यय. धातूच्या मागे अथवा पुढे साधक प्रत्यय लावून नवे साधित शब्द बनतात. जसे; अज्ञान, कमजोर, नामंजूर चांगलेपणा, स्वस्ताई, शूरत्व इत्यादी या शब्दांत अ, कम, ना, पणा ई, त्व हे साधक प्रत्यय लागून नवे साधित शब्द निर्माण झाले आहेत. साधक प्रत्ययामुळे भाषेतील शब्दसंग्रह वाढतो.

विकारक अथवा विभक्ती प्रत्यय धातूंना लागून त्यांचे वाक्यातील व्याकरणिक कार्य स्पष्ट केले जाते. त्यांच्यापासून नवे शब्द बनत नाहीत. हे प्रत्यय संख्येने कमी असेल तरी भाषा त्यांच्यावाचून पावलोपावली अडते. कारण विभक्ती प्रत्यय हे भाषेच्या अंतर्गत संरचनेचे घटकच असतात. साधन व विकारक प्रत्यय पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

लोह + आर = लोहार + की = लोहारकी (साधक प्रत्यय) - की

लोह + आर = लोहार + ने = लोहाराने (विभक्ती प्रत्यय) - ने

भाषेतील आशयाचे रूप विस्तृत असते. त्यामुळे भाषेतील आशयसूचक रूपिम संख्येने विपुल असतात. उलट भाषेतील व्याकरणिक संबंध ठरलेले असतात आणि ते मोजकेच असतात त्यामुळे कार्यसूचक रूपिमांची संख्या मर्यादित असते. मात्र कार्यसूचक रूपिम भाषेत पुन्हा पुन्हा वापरले जातात. आशयसूचक रूपिम त्या मानाने कमी वेळा वापरले जातात. वेगळ्या शब्दात सांगायचे झाले तर भाषेतील कार्यसूचक रूपिमांची आवृत्तीक्षमता (वारंवारिता) अधिक असते आणि आशयसूचक रूपिमांची आवृत्तिक्षमता (वारंवारिता) तुलनेने फारच कमी असते.

### • धातूंचे वर्गीकरण:

धातू म्हणजे मूळ रूपिम. धातूचे वर्गीकरण दोन प्रकारात केले जाते.

१. धातूला लागणाऱ्या प्रत्ययावरून

२. धातूच्या वाक्यातील कार्यावरून

यातील पहिल्या प्रकाराचा विचार पदविन्यासात केला जातो. तर दुसऱ्या प्रकाराचा वाक्यविन्यासात धातूंचे तीन प्रकार होतात. १.नाम, २. सर्वनाम, ३. अव्यय, नामाचे नाम, सर्वनाम, विशेषण असे तीन प्रकार होतात. त्यामुळे मराठीत धातूंचे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि अव्यय असे पाच प्रकार होतात. अव्यये अविकारी असतात नाम, सर्वनाम आणि विशेषण यांना वचन, लिंग आणि विभक्ती (सामान्यरूप) हे विकार होतात. क्रियापदाला वचन, लिंग, पुरुष, काल आणि अर्थ असे पाच विकार होतात. नाम, सर्वनाम,

विशेषण आणि क्रियापद यांना होणाऱ्या विकारांची एकत्रित माहिती देणे म्हणजेच त्यांची विकारसरणी (Declension) सांगणे होय.

**• विकारसरणी:**

**वचन :** एकवचन आणि अनेकवचन असे वचनाचे दोन प्रकार आहेत. नामाचे अंत्य स्वनिम व लिंग यांना अनुसरून मराठीत /ए /, /आ /, / ई /, /अ/ , /या /, /वा /, ही रूपिकांतरे होतात. उदाहरणार्थ; राजे, वाटा, लेकर, नद्या, सासवा, शाळा, गाया, बाया, वासरं, पिसवा, जावा इत्यादी.

**लिंग :** मराठी भाषेत लिंग हा नामांच्या संदर्भात विकारापेक्षा सहजउपाधीच्या स्वरूपाचा प्रकार आहे. 'मी' गणातील सर्वनामांना लिंगविकार होत नाही. नाम ज्या लिंगी असेल तेच लिंग सर्वनामाला स्वीकारावे लागते. उदाहरणार्थ; मी-मला, माझा, आम्ही, आम्हाला, आपण, आमचा इत्यादी. 'तू' गणाच्या सर्वनामांना मात्र नामाच्या लिंगाला अनुसरून लिंगवचनविकार स्वीकारावे लागतात. उदाहरणार्थ : तू – तुम्ही, तुला, त्याला, त्याने, तिला, तिचा, तिने, त्यांनी, त्याचा, तिच्या इत्यादी. विशेषणाच्या बाबतीत 'सुंदर' गणाची विशेषणे अविकारी असतात. उदाहरणार्थ; ती सुंदर आहे, तो सुंदर आहे, हत्ती सुंदर आहे, घोडी सुंदर आहे. मात्र 'पांढर' गणाच्या विशेषकांना विशेष्याच्या लिंगवचनसापेक्षतेने लिंगवचनविकार होतात. उदाहरणार्थ ; खडू पांढरा आहे. राख पांढरी आहे, घोडे पांढरे आहेत, इमारत पांढरी आहे, ती बैलजोडी पांढऱ्या रंगाची आहे.

**विभक्ती :** नाम, सर्वनाम, विशेषण हे तिन्ही प्रकार विकाररहीत असतात तेव्हा ते 'सरळ विभक्ती' त असतात. जेव्हा ते विकारासह असतात तेव्हा त्यांना विभक्तिविकार (सामान्यरूप) होतो. संस्कृत परंपरेने मराठीत आठ विभक्ती रूढ आहेत. नामांच्या बाबतीत त्याचे अंत्याक्षर व लिंग यांना अनुसरून एकवचनी आणि अनेकवचनी असे दोन भिन्न प्रकारचे विभक्तिविकार होतात. सर्वनामाबाबत 'मी' ची /म /, / मा / इत्यादी, 'तू' ची/ त्या/ , / ती/ रूपिकांतरे होतात. विशेषणाबाबत वचननिरपेक्ष सामान्य विभक्तिविकार होतो. विशेषणाची / या/ , / आ/ , /ए/ अशी रूपिकान्तरे होतात. नाम व सर्वनाम यांच्या सामान्य विभक्तीपुढे अन्य प्रत्यय वा उत्तरयोगी शब्द येतात. उदाहरणार्थ, त्याच्याकडे, रामापुढे विशेषणाबाबत असे घडत नाही. क्रियापदांना वचन, लिंग, पुरूष, काळ आणि अर्थ असे विकार होतात. उदाहरणार्थ; बस-बसोत, बसतात, बसतोय, बसलो, बसली, बसशील, बसाल, बसायची, बसत, बसावा, बसावी, बसतास, बसा, बसतो, बसू, बसणारा, बसव इत्यादी. इथे 'बस' या क्रियापदाला अनुक्रमे वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ, रीतिकाळ, इच्छार्थक, संकेतार्थ, आज्ञार्थी, आशीर्वादार्थ, प्रार्थनार्थ, कर्तृवाचक विशेषणानुसार, प्रयोजक धातुनुसार विकार लागलेले दर्शविले आहेत. अव्ययमुळांना विकार होत नाहीत तेव्हा विकारसरणीत त्यांचा विचार करण्याची आवश्यकता नाही. नामिक (नाम, सर्वनाम, विशेषण) आणि धातुमुळांना (क्रियापद) होणाऱ्या वर नमुद केलेल्या विकारांचे स्पष्टीकरण म्हणजेच रूपिमांची विकारसरणी होय.

**• पदघटना:**

पदांची घटना या प्रकारात साधित शब्दांचा विचार येतो. आतापर्यंत आपण विभक्तिप्रत्ययांमुळे होणाऱ्या विकारी घटनांचा विचार केला. आता साधक प्रत्ययापासून

निर्माण होणाऱ्या शब्दांचा / पदांचा विचार करू. साधक प्रत्ययामुळे पदांची व्याकरणिक वैशिष्ट्ये कळतात. उदाहरणार्थ; नाम-विशेषण-क्रियापद-अव्यय प्रत्ययघटित, सामासिक व अभ्यस्त असे साधिक शब्दांचे तीन प्रकार होतात.

**प्रत्ययघटित शब्द / पदे पुढीलप्रमाणे:**

| **रूपिम** | **साधित रूप** | **प्रत्यय कोठे** | **व्याकरणिक वैशिष्ट्य** |
|---|---|---|---|
| सूर | सुरावट | उत्तर | नाम |
| नाव | नावाडी | उत्तर | नाम |
| हिव | हिवाळा | उत्तर | नाम |
| येथ | येथून | उत्तर | अव्यय |
| जवळ | जवळून | उत्तर | अव्यय |
| जीभ | पडजीभ | पूर्व | नाम |
| शासन | अनुशासन | पूर्व | नाम |
| जात | सजातीय | पूर्व | विशेषण |
| लायक | नालायक | पूर्व | विशेषण |

साधक प्रत्यय हा धातूच्या पूर्वी किंवा नंतर कोठेही येऊ शकतो. सुरावट, नावाडी या साधित शब्दांत तो नंतर आलेला आहे. तर अनुशासन, सजातीय, नालायक या साधित शब्दांत तो धातूंपूर्वी आलेला आहे.

साधक प्रत्यय लागून तयार झालेल्या शब्दांचा अर्थ आणि मूळ धातूचा अर्थ यांमध्ये अंतर असते. म्हणजेच साधक प्रत्ययामुळे रूपिमाचा अर्थ बदलतो. साधक प्रत्यय हे नाम, विशेषण, अव्यय व क्रियापद यांना लागतात आणि साधित शब्द तयार होतात.

- **समास:**

समास हा साधित शब्दांचा दुसरा प्रकार आहे. सामासिक विचार दोन किंवा अधिक पदांची बनलेली असते. या पदांची रचना व्याकरणिक संबंधदर्शक प्रत्ययांनी अर्थवान होते. हे संबंधदर्शक प्रत्यय अध्याहृत असतात. अशी रचना भाषेच्या निधीत भर घालणारी ठरते. या सामासिक पदांना वाक्यातील इतर घटकांशी नाते जोडताना विभक्तिप्रत्यय घ्यावे लागतात. यामुळे त्यांचा विचार पदविन्यासात करावा लागतो.

समासात प्रत्ययांचा व कार्यकार शब्दांचा लोप होत असतो. उदाहरणार्थ, राजवाडा या शब्दात 'चा' या प्रत्ययाचा लोप झाला आहे. रामलक्ष्मण या शब्दांत 'आणि' या कार्यकर शब्दाचा लोप झाला आहे. पुरणपोळी या शब्दात (पुरण) 'घालून केलेली' या शब्दाचा लोप झालेला आहे. समासाचे दोन प्रकार होतात. अंतः पदप्रधान समासात दोन पदांऐवजी एकच पद वापरात येऊ शकते. उदाहरणार्थ; लग्नपत्रिका ऐवजी पत्रिका, राजवाडा ऐवजी वाडा, अन्यपदप्रधान समासात दोन्ही पदाऐवजी अन्य पद महत्त्वाचे ठरते. उदाहरणार्थ, मी दशाननाची भूमिका पाहिली. या वाक्यात दश आणि आनन या पदाऐवजी रावण हे अन्य पद महत्त्वाचे ठरते. यावरून समासाचे काही उपप्रकार होतात. ते पाहू.

१. अव्ययीभाव समास हा पूर्वपदप्रधान समास असतो.
उदाहरणार्थ : यथाशक्ती, दररोज, प्रतिवर्ष

२.	तत्पुरूष समास हा उत्तरपदप्रधान समास असतो.
उदाहरणार्थ : महादेव, खडीसाखर, नवरात्र, मुखकमल

३.	द्वंद्व समासात दोन्ही पदे प्रधान असतात.
उदाहरणार्थ : आईबाप,मीठभाकर, पापपुण्य, घरदार

अन्यपदप्रधान बहुव्रीही समासात कोणतेच पद प्रधान नसून त्या व्यतिरिक्त अन्य पदच प्रधान असते. उदाहरणार्थ : नीलकंठ, दशानन, गजानन, चंद्रमौलि, विधवा, मृगनयना, गायतोंडे, रमारमण.

**• अभ्यस्त पदे:**

समासातील दोन पदे म्हणजे दोन भिन्न मुक्त रूपिम (पदे/शब्द ) असतात. अभ्यस्तामध्ये दोन रूपिम हे भिन्न नसून ते एकाच रूपिमाच्या पुनरावृत्तीच्या स्वरूपाचे असतात. पहिला शब्द + दुसरा शब्द = तिसरा शब्द (खरेतर रूपिम) असे समासाच्या रचनेचे स्वरूप असते. तर अभ्यस्ताचे पहिला शब्द + पहिलाच शब्द = दुसरा शब्द असे रचनात्मक स्वरूप असते. शब्दांची ही पुनरावृत्ती तीन प्रकारची असते.

**१. पूर्णाभ्यस्त शब्दः**

नाम	:	हळहळ, कळकळ, बडबड, चिवचिव, पळापळ
विशेषण	:	मऊमऊ, गारगार, लाललाल, गरमागरम
अव्यय	:	तुरूतुरू, पटापट, भडभड, तिळतिळ

**२. अंशाभ्यस्त शब्द**

नाम	:	गडबड, शेजारीपाजारी, दगडबिगड
विशेषण	:	लेचापेचा, सटरफटर, अर्धामुर्धा, लहानसहान
अव्यय	:	आरपार, लगबग, आडवातिडवा

**३. अनुकरणात्मक अभ्यस्त शब्द**

:	धोधो, फाडफाड, रिपरिप, चकचक, थरथर

पदविचारात आधुनिक भाषाविज्ञानातील वाक्यविचारासारखा टप्पाही येऊ शकतो. याशिवाय, याठिकाणी, अशातऱ्हेने, तोपर्यंत, अशाप्रकारे, यानुसार, त्यातून, याबाबत असे शब्द एकत्र लिहावयाचे की स्वतंत्र असा वाद होऊ शकतो. कारण की, पण अशा शब्दाअगोदर की, नंतर, स्वल्पविराम लावायचा हाही वादाचा विषय आहे. स्वल्पविरामास आपण खंडाधिष्ठित स्वनिम म्हणतो मात्र अशा अर्धविराम, स्वल्पविरामाने वाक्याचा अर्थ बदलू शकतो. मराठी भाषिक बोलतात योग्य पण लिहिताना अशा विरामचिन्हांचा वापर कसा करावयाचा हेच त्या भाषिकाला कळत नाही. (डॉ. अनिल गवळी, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर)

## ४.७ शब्दार्थ व टिपा

**संरचना :** घटकांची मांडणी घटकांमुळे बनणारी एकजीव अशी रचना.

**भाषिक क्षमता :** कोणतीही भाषा ग्रहण करण्याची जन्मजात अशी क्षमता.

**अघोष ध्वनी :** वायुप्रवाह बाहेर पडताना कंठामध्ये असलेल्या स्वरयंत्रातील वळी विलग राहून होणारा ध्वनी.

**सघोष ध्वनी :** स्वरयंत्रातील वळी जवळ येऊन वायुप्रवाहाच्या रेट्याने कंप पावतात त्यामुळे निर्माण होणारे ध्वनी.

**स्पर्श ध्वनी :** वायुप्रवाहास जीभ किंवा ओठ यांनी प्रथम अटकाव करून मग एकदम त्यास जाऊ दिल्याने निर्माण होणारा ध्वनी.

**प्रत्यय :** लिंगवचनपुरुष यांचे शब्दाला लागणारे जोड.

**कर्ता :** क्रियापदाने निर्देश केलेली क्रिया करणारा आणि बहुधा वाक्यारंभी येणारा शब्द.

**कर्म :** क्रियापदातील कृतीचा ज्यावर परिणाम होतो ती वस्तू किंवा व्यक्ती दाखविणारा आणि बहुधा क्रियापदाच्या लगोलग येणारा शब्द.

**विकार :** बदल.

**वाक्यव्यवस्था :** वाक्यरचना.

**पदबंध :** एक प्रधान किंवा गाभ्याचा शब्द किंवा रूपिम आणि इतर पूरके यांची क्रमानुवर्ती गुंफण.

## ४.८ आपली प्रगती तपासा

प्रश्न १. मराठीतील दहा रूपिमांची रूपिकांतरे तुमच्या वहीमध्ये नोंदवा

## ४.९ समारोप

फेर्दिना द सोस्यूर यांनी भाषाभ्यासामध्ये एककालिक भाषाभ्यास आणि कालक्रमिक भाषाभ्यास असा भेद केला. या भेदाबरोबर सोस्यूर यांनी रूप, व्यवस्था आणि संरचना या संकल्पना मांडून भाषाभ्यासाची दिशाच बदलून टाकली. भाषाभ्यासात त्यांनी केलेला भेद आणि मांडलेल्या नव्या संकल्पना यामुळे २० व्या शतकात पारंपरिक भाषाभ्यासाविरुद्ध अनेक आक्षेप घेतले गेले. भाषा ही एक सामाजिक संस्था असून परिवर्तनशील असते, हे ग्राह्य धरूनही एका कालखंडात भाषा स्थिर मानून तिचे विश्लेषण करता येते. हे सोस्यूरच्या सिद्धांतातील मूलभूत तत्त्व क्रांतिकारी ठरते. सोस्यूरची ही तत्त्वेच आधुनिक संरचनावादी



munotes.in

भाषाविज्ञानाचा पाया घालणारी ठरली.सोस्यूरच्या प्रभावाखाली ब्लूमफील्ड यांनी संरचनावादी अभ्यासपद्धतीचा विकास केला. पारंपरिक भाषाभ्यास अवैज्ञानिक म्हणजेच प्राकृतिक विज्ञानांच्या पद्धतीचा अवलंब न करणारा आहे असा ब्लूमफील्डवादी भाषा अभ्यासकांचा दावा होता. प्राकृतिक विज्ञानांच्या पद्धती पूर्णतः अनुभवनिष्ठ पद्धती आहेत. ऐंद्रीय निरीक्षण हा या पद्धतीचा गाभा आहे.

कोणत्याही घटिताचा वैज्ञानिक पद्धतीचा अभ्यास करायचा असेल तर प्रथम घटितांचे ऐंद्रीय निरीक्षण करायचे, त्यासाठी प्रयोग करायचे आणि या विशिष्ट घटितांच्या निरीक्षणाच्या म्हणजेच पुराव्याच्या आधारे सर्वसामान्य निष्कर्ष काढायचा, अधिक निरीक्षण करून हा निष्कर्ष पडताळून पाहायचा. येथे प्रत्यक्ष निरीक्षणालाच महत्त्व असल्याने निरीक्षणाला ज्या गोष्टी उपलब्ध नाहीत त्याची या अभ्यासपद्धतीत दखल घेतली जात नाही. या पद्धतीने संरचनावादी भाषाभ्यासकांनी भाषांकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित केला. यातूनच भाषेचे ध्वनी, शब्द, वाक्य आणि अर्थ हे घटक निश्चित करून त्यांचे विश्लेषण देण्याची पद्धत म्हणजेच भाषेच्या संरचनेच्या विविध पातळ्यावरील विश्लेषणाची पद्धती विकसित झाली. 'अर्थ' हा घटक गुंतागुंतीचा, व्यामिश्र आणि व्यापक असल्यामुळे सोस्यूर, ब्लूमफील्ड आणि त्यांच्या प्रभावातील अनेक भाषाभ्यासकांनी तो आपल्या विश्लेषणातून बाजूला ठेवले. हे अभ्यासक अर्थ या घटकाला रचनात्मक मूलघटक व्यवच्छेदक आहेत वा नाहीत एवढे ठरवण्यापुरतेच स्थान देताना दिसतात. आपल्या प्रस्तुत विवेचनामध्ये भाषेच्या संरचनेतील पद-पदिम-पदांतर या घटकांचे विश्लेषण आलेले आहे. त्यासाठी आपण रूपिका-रूपिम-रूपिकांतर असे शब्दप्रयोग केले. रूपिका ह्या भाषेतील अर्थदृष्ट्या लघुत्तम घटक असतात. अशा भाषेतील रूपिका कार्याच्या दृष्टीने येऊ शकतात. समान कार्य करणाऱ्या रूपिकांचा गट करता येतो त्यांनाच 'रूपिम' म्हणतात. रूपिम हे स्वनिमाप्रमाणे गटवाचक नाम आहे. रूपिम काल्पनिक असतो. तो अमूर्त असतो. भाषेत प्रत्यक्ष वावरत असतात त्या विशिष्ट रूपिम गटातील रूपिकाच. रूपिम अमूर्त असतो. कारण तो केवळ गटाचे प्रतिनिधित्व करतो. रूपिमाचे मूर्त आविष्कारण रूपिका असतात.

## ४.१० संदर्भ ग्रंथ


१. डॉ. धोंडगे, दिलीपः 'आधुनिक भाषाविज्ञान, ( संपा. कल्याण काळे), प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२. डॉ. गवळी, अनिल : 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.


## ४.११ अधिक वाचन


१. डॉ. द. दि. पुंडे : सुलभ भाषाविज्ञान

२. डॉ. महेंद्र कदम : मराठी वर्णनात्मक भाषाविज्ञान

३. डॉ. कल्याण काळे / अंजली सोमण (संपादित) : आधुनिक भाषाविज्ञान

## ४.१२ नमुना प्रश्न

### दीर्घोत्तरी प्रश्न

१. रूपिका -रूपिम - रूपिकांतर या संकल्पना सविस्तर लिहा.

२. पदविन्यास व्याकरणाच्या कक्षेतील विषय सविस्तर स्पष्ट करा.

### लघुत्तरी प्रश्न

१. रूपिमांचे प्रकार थोडक्यात लिहा

२. रूपिकांतरांचे प्रकार थोडक्यात लिहा

### टिपा लिहा.

१. रूपिका

२. रूपिकांतर

*****

munotes.in

# ५

# वाक्यविचार: प्रथमोपस्थित संघटक, विश्लेषणपद्धतीचे स्वरूप, रचनांचे प्रकार, स्तर, वाक्यांचे पृथक्करण

**घटक रचना**

५.१ उद्देश
५.२ प्रास्ताविक
५.३ प्रथमोपस्थित संघटक
५.४ रचनांचे प्रकार
    ५.४.१ पदबंध
    ५.४.२ नामपदबंध
        ५.४.२.१ नाम
        ५.४.२.२ सर्वनाम
    ५.४.३ विशेषणपदबंध
    ५.४.४ क्रियापदबंध
    ५.४.५ क्रियाविशेषणपदबंध
५.५ वाक्यांचे पृथक्करण
५.६ समारोप
५.७ संदर्भ
५.८ नमुना प्रश्न

## ५.१ उद्देश

भाषाभ्यास करत असताना आपल्या शब्द, ध्वनी, त्याचे अर्थ या सूक्ष्म घटकांपासून वाक्यरचनेसारख्या दीर्घ रचनांचाही अभ्यास करावा लागतो. सदरील घटकामध्ये आपण वाक्यरचनेचा विचार करणार आहोत. या विचाराअंती आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१. वाक्यरचना कोणकोणत्या घटकांनी सिद्ध होते हे ध्यानात येईल.

२. वाक्यातील प्रथमोपस्थित संघटक म्हणजे काय हे कळेल.

३. वाक्यरचनेतील विविध प्रकाराचे स्वरूप लक्षात येईल.

४. तसेच या प्रकारातील विविध पदबंधाचे वाक्यातील स्वरूप अभ्यासता येईल.


५. वाक्याच्या पृथक्करणाचा स्तर अभ्यासून मूलरचीत वाक्ये व रचनांतरित वाक्याचे स्वरूप पाहता येईल.

munotes.in

## ५.२ प्रास्ताविक

भाषेच्या व्याकरणामध्ये भाषेतील अर्थपूर्ण रचनांचा अभ्यास केला जातो. या रचनांचे पदविचार आणि वाक्यविचार हे दोन भाग असल्याने भाषेच्या व्याकरणाचेही असे दोन भाग पडतात. या विभागांमुळे अभ्यासाची सोय होते ही विभागणी काटेकोरपणे होत नाही. पदविचार आणि वाक्यविचार हे दोन्ही विभाग परस्परपूरक असतात. दोहोंमध्ये अर्थपूर्ण रचना आढळते. वाक्यात केवळ स्वनिम आणि रुपिम नसतात, तर रुपिमांचे वेगवेगळे बंधही असतात. त्यांनाच 'भाषिक पद' असे म्हटले जाते. ही भाषिक पदे आकाराने लहान किंवा मोठी असतात. वाक्यांश, उपवाक्ये, वाक्ये यांचा समावेश पदबंधांमध्ये होतो. या वाक्यांच्या वर्णनात्मक पद्धतीने केलेल्या अभ्यासाला वाक्यविन्यास किंवा वाक्यविचार असे म्हणतात. भाषेच्या वर्णनात्मक पद्धतीमध्ये वाक्यविचार हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. पारंपरिक स्वरूपाच्या व्याकरणामध्ये प्रमाणभाषेतल्या केवळ वाक्यांनाच महत्त्व दिले जात होते आणि विशिष्ट सैद्धांतिक भूमिका घेऊन नंतर वाक्यांचे पृथक्करण करणे यावर विशेष भर देण्यात येत असे. वर्णनात्मक भाषाविज्ञानाने या दोन्ही गोष्टी नाकारल्या आहेत. व्यवहारामध्ये वापरल्या जाणाऱ्या भाषेचे काही नमुने निवडून त्यांच्या अभ्यासातून काही सूत्रांची निश्चिती करण्याचा प्रयत्न वर्णनात्मक भाषाभ्यासामध्ये होतो. वाक्याचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. १. मूलरचित वाक्ये आणि २. रचनांतरित वाक्ये.

पदबंधानंतर वाक्याच्या स्वरूपाचा विचार करावा लागतो. वाक्य ही देखील एक रचनाच आहे. रचनेच्या विश्लेषणपद्धतीनुसार वाक्य समजावून घेता येते. वाक्य या रचनेचे पदबंध हे प्रथमोपस्थित संघटक असतात, तर शब्द हे पदबंधांचे प्रथमोपस्थित संघटक असतात. रुपिम हे शब्दाचे प्रथमोपस्थित संघटक असतात. वाक्यविचारामध्ये केवळ शब्दांचे रचनेच्या दृष्टीने असलेले परस्पर संबंध अभ्यासायचे असतात. त्यामुळे रूपिमांद्वारे होणाऱ्या शब्दांची रचना वाक्यविचारामध्ये तपासली जात नाही. भाषेमधील सर्वाधिक मोठी रचना वाक्य होय. उद्देश आणि विधेश असे वाक्याचे दोन भाग पडतात. हे उद्देश आणि विधेश हे वाक्याचे प्रथमोपस्थित घटक असतात. उद्देश या प्रथमोपस्थित संघटकामध्ये कर्ता आणि त्याची विशेषणे यांचा समावेश होतो, तर विधेय या प्रथमोपस्थित संघटकामध्ये कर्म, पूरके, क्रियाविशेषणे व क्रियापदे यांचा समावेश होतो. कधीकधी विशिष्ट संबंधवाचक घटकांनी दोन किंवा अधिक वाक्य एकत्र येऊनही वाक्यांची रचना बनते. उदा. आणि, पण, परंतु, जेव्हा-तेव्हा, जर-तर, म्हणून, व इ. अशा रचनेमध्ये आलेल्या वाक्यांना उपवाक्य असे म्हणतात. मुळात उपवाक्य हे वाक्यच असते. कारण उपवाक्य आणि वाक्य यांची रचना सारखीच असते. वेगळ्या भाषेत सांगायचे, तर जेव्हा एखादे वाक्य भाषिक रचनेचा प्रथमोपस्थित संघटक किंवा संघटक म्हणून येतो, तेव्हा ते उपवाक्य ठरते. थोडक्यात सांगायचे, तर रुपिमांपासून शब्द बनतात, शब्दांपासून पदबंध तयार होतात, पदबंधांपासून उपवाक्य तयार होतात आणि उपवाक्यांपासून वाक्ये तयार होतात. या वाक्यांपासून पुढे परिच्छेद आणि त्यातून पुढे प्रकरण आणि ग्रंथ निर्माण होतात. वाक्य विचारात केवळ रुपिमांपासून पुढची शब्द ही रचना आणि वाक्य ही रचना अभ्यासली जाते. वाक्यविचाराचा शेवटचा घटक शब्द असतो, तर सुरुवातीचा घटक वाक्य असते. वाक्य विचारात आपण वाक्याचे विभाजन करतकरत शब्दांजवळ येऊन थांबतो. हे पुढील आकृतीवरूनही लक्षात घेता येईल.




अशा प्रकारे प्रथमोपस्थित संघटक शोधतशोधत अंतिम घटक म्हणून शब्द सापडतात, हे यातून लक्षात येते.

## ५.३ प्रथमोपस्थित संघटक

भाषिक रूपांच्या वेगवेगळ्या रचना असतात आणि त्या रचनांचे विश्लेषण करताना प्रथमोपस्थित संघटक लक्षात घ्यावे लागतात. कोणत्याही सार्थ आणि विभाजनक्षम भाषिक रूपाला रचना म्हणतात. रुपिम सार्थ आहे, पण अर्थदृष्ट्या त्याचे आणखी विभाजन होत नाही. त्यामुळे रुपिमाला रचना म्हणता येत नाही. मात्र रुपिमानंतरची सर्व भाषिक रूपे रचनाच असतात. वाक्यविचारात शब्दांच्या अनोन्यसंबंधांचा विचार केला जातो. जेव्हा दोन वाक्ये मिळतात आणि त्यांच्यामध्ये सरळ संबंध नसतात, हे लक्षात येते. अशा वाक्यांचे विश्लेषण करताना ब्ल्यूमफिल्ड (Bloomfield, 1933) या भाषावैज्ञानिकाने "प्रथमोपस्थित संघटक" (Immediate constituents) ही संकल्पना मांडली. स्वनिम आणि पदिम यांच्यासारखीच ही संकल्पनाही 'लघुतम घटक' या संकल्पनेचा वापर करते. प्रथमोपस्थित संघटक हे एकमेकांशी लघुतम संबंधांनी बांधलेले असतात. स्वनिमविचार आणि पदिमविचार या पातळ्यांप्रमाणेच वाक्याच्या पातळीवरही विभाजन आणि प्रतियोजन या दोन पद्धती अमेरिकन संरचनावादी परंपरेने वापरलेल्या आहेत. वाक्यांचे विश्लेषण करताना त्यांनी 'प्रथमोपस्थित संघटक' हा शब्द वापरलेला आहे. ही संकल्पना उदाहरणाच्या आधारे समजून घेता येईल. उदा. 'गरीब विवेक धावत गेला' या वाक्यामध्ये 'गरीब' या पदाशी 'विवेक' या पदाचा संबंध आहे. तोच संबंध 'गरीब' या पदाचा ' धावत गेला' या पदाशी नाही. एका पातळीवर 'गरीब विवेक धावत गेला' या रचनेचे दोन मूलघटकांमध्ये विश्लेषण करता येते. (गरीब विवेक) आणि (धावत गेला) हे या पातळीवरील प्रथमोपस्थित संघटक आहेत. यापुढील पातळीवर (गरीब) आणि (विवेक) हे एका रचनेमधील प्रथमोपस्थित संघटक आहेत, तर (धावत) आणि (गेला) हे दुसऱ्या रचनेमधील प्रथमोपस्थित संघटक आहेत. शेवटच्या पातळीवर (गरीब), (विवेक),

munotes.in

(धावत) आणि (गेला) हे जे घटक हाती लागतात, हे अर्थातच प्रथमोपस्थित संघटक नसून अंतिम घटक आहेत. झीलिंग् हॅरीस या भाषाभ्यासकाने पदिमांच्या शृंखलांचे प्रतियोजन कसे करायचे, याची एक पद्धती विकसित केली. याच प्रेरणेतून रुलॉन वेल्स (Wells, 1947-1966) या भाषाभ्यासकाने 'विस्तार' (expansion) ही संकल्पना मांडली. यातून 'प्रथमोपस्थित संघटक' ही संकल्पना आणखी स्पष्ट करण्यात आली. वितरण आणि प्रतियोजन (आदेश) यांच्या साहाय्याने संरचनावादी अभ्यासकांनी पदरचनांचे वर्गीकरण केले आहे. ते दोन प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१. अंतःपदप्रधान (endocentric) प्रथमोपस्थित संघटक

२. अन्यपदप्रधान (exocentric) प्रथमोपस्थित संघटक

ज्या रचनांमध्ये प्रथमोपस्थित घटकांपैकी एक घटक प्रमुख असतो आणि त्या घटकाचे त्या संपूर्ण रचनेच्या जागी प्रतियोजन करता येते, अशा रचनेला 'अंतःपदप्रधान' म्हणतात. वरील उदाहरणामध्ये 'गरीब विवेक' ही रचना आणि 'विवेक' हे पद यांचे वितरण सारखेच आहे. त्यामुळे त्यांचे प्रतियोजन करता येते. येथे ' विवेक' हे पद 'गरीब विवेक' या रचनेतील प्रधान घटक (head) ठरतो. याउलट काही रचनांमध्ये प्रथमोपस्थित संघटकांपैकी कोणताच घटक प्रधान घटक आहे असे म्हणता येत नाही, कारण कोणत्याही घटकाचे प्रतियोजन संपूर्ण रचनेच्या स्थानी करता येत नाही. अशा रचनांना 'अन्यपदप्रधान संघटक' म्हणतात.

अशा प्रकारे वाक्यविचार करताना वाक्यामधील प्रथमोपस्थित घटकांचा विचार करतकरत अंतिम घटकांपर्यंत जायचे असते. पुढील उदाहरणावरूनही हे स्पष्ट करता येईल.

१. विवेक बागेत गेला.

२. बऱ्याच दिवसांनंतर विवेक बागेत गेला आणि परत आला.

यातील पहिल्या वाक्यात विवेक, बागेत, गेला हे तीन प्रथमोपस्थित संघटक आहेत. या दोन वाक्यांपैकी पहिल्या वाक्यामध्ये विवेक-बागेत-गेला या तीनही शब्दांचा सरळ संबंध असल्याने त्यांचा सहज अन्वय लागत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अशा वाक्यांचे विश्लेषण आपण सहज पद्धतीने करू शकतो. परंतु दुसऱ्या वाक्यामधील संबंध हा असा सरळ नसल्याने त्यातील शब्दांचा तसा सरळ अन्वय लावता येत नाही. बारकाईने पाहिल्यास वरील दुसऱ्या वाक्यात दोन उपघटक सापडतात.

१. बऱ्याच दिवसानंतर विवेक बागेत गेला

२. परत आला.


प्रथमोपस्थित संघटक या संकल्पनेच्या अंगाने तपासून पाहिले तर या वाक्यामध्ये तीन घटक अंतर्भूत असल्याचे आढळून येते.

१. बऱ्याच दिवसानंतर विवेक


२. बागेत गेला.

३. परत आला.

हे अधिक स्पष्ट करण्यासाठी पुढील रेखाकृती उपयुक्त ठरेल.




अशा प्रकारे वाक्यातील घटकांचे विभाजन करत गेल्यास आपल्याला सर्वात प्रथम मिळणारे वाक्यघटक लक्षात घ्यावे लागतात. वरील उदाहरणामधील तीन वाक्यघटक हे 'प्रथमोपस्थित संघटक' आहेत. हे ठरवताना या घटकांमधील संघटना ध्यानात घेणे गरजेचे आहे. ही संघटना वाक्यामध्ये कार्यरत असणाऱ्या कार्यलक्षी संबंधांवरून लक्षात घ्यावी लागते. याचे कारण 'बागेत गेला' हे एक कार्यलक्षी अर्थपूर्ण प्रथमोपस्थित संघटक आणि 'बऱ्याच दिवसानंतर' हा दुसरा संघटक आहे, हे ध्यानात घ्यावे लागते. वरील आकृतीमध्ये शेवटी मिळालेले बऱ्याच, दिवसानंतर, विवेक, बागेत, गेला, आणि, परत, आला हे 'अंतिम संघटक' आहेत. ते प्रथमोपस्थित संघटक.




यातून लक्षात येते की, 'प्रथमोपस्थित संघटक' ही संकल्पना वाक्यविश्लेषण करताना काही दृष्टींनी महत्त्वाची ठरते. या संकल्पनेमुळे पारंपरिक वाक्यविचारामधील तर्कशास्त्रीय संकल्पना टाळून वाक्यविश्लेषण करता येते. त्याचबरोबर पारंपरिक वाक्यपृथक्करणामध्येही प्रथमोपस्थित घटकांच्या विश्लेषणामुळे ही कल्पना बरीच सुस्पष्ट आणि विकसित झाली. पारंपरिक वाक्यपृथक्करणामध्येही उद्देशपूरक व विधेयपूरक या संकल्पनांमध्ये पदांच्या 'विस्तारा' ची संकल्पना दडलेली होती. पारंपरिक व्याकरणामध्ये विशिष्ट प्रकारे वाक्याचे पृथक्करण करण्याचा आग्रह असे, परंतु त्यांचा दृष्टिकोन आदेशात्मक असल्यामुळे त्या पृथक्करणामागच्या निकषांची व तत्त्वांची फारशी चर्चा व दिग्दर्शन त्यात नसे. त्यामुळे वाक्याचा विचार करताना 'प्रथमोपस्थित संघटक' ही संकल्पना साहाय्यक ठरते.

वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे उद्देश आणि विधेय ही दोन्ही आहेत. उद्देशाचे प्रथमोपस्थित संघटक मूळ उद्देश आणि उद्देशविस्तार हे आहेत. त्याचप्रमाणे विधेयकाचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूळ विधेय आणि विधेयविस्तार हे आहेत. जुन्या व्याकरणाच्या भाषेमध्ये यातील मूळ उद्देशाला कर्ता आणि मूळ विधेयाला क्रियापद म्हटले जात होते.

असे असले, तरी प्रथमोपस्थित संघटकांद्वारा वाक्यांचा अभ्यास करण्याच्या पद्धतीमध्ये काही दोष आढळतात. कारण काही वाक्यांचे प्रथमोपस्थित घटकांमध्ये विश्लेषण करताना वेगवेगळे विभाजन करता येते आणि त्यामध्ये नेमके कोणते खरे याबद्दल संदिग्धता निर्माण होते. उदा. 'तो गरीब विवेक धावत गेला' या रचनेचे प्रथमोपस्थित घटक १. (तो) (गरीब विवेक धावत गेला) असे विभाजन करता येते किंवा २. (तो घरी धावत गेला) (राम) असेही विभाजन करता येते. यातील कोणते

munotes.in

विभाजन खरे, याचे समाधानकारक उत्तर देता येत नाही. शिवाय मराठीमध्ये वाक्यांची संख्या मर्यादित असल्यामुळे ही समस्या आणखी गंभीर बनते.

## ५.४ रचनांचे प्रकार

### ५.४.१ पदबंध:

प्रथमोपस्थित संघटक हा रचनांचा एक प्रकारच होय. त्यानंतर शब्दांच्या पुढची रचना म्हणजे पदबंध होय. भाषेमध्ये जेव्हा शब्द विशिष्ट अर्थाने आणि रचनातत्त्वाने एकमेकांशी जुळतात, तेव्हा पदबंध तयार होतो. उदा. एम. ए. च्या प्रथम वर्षातील विद्यार्थी, मराठी विषय घेतलेले विद्यार्थी, मुंबई-पुणे रस्ता, काळा-सावळा मुलगा ही भाषिक रुपे पदबंध आहेत. पदबंधामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**१. आंतरिक स्थैर्य :** पदबंधातील शब्दांचा क्रम आणि त्यांची जुळणी यामध्ये बदल किंवा फरक न होणे म्हणजे आंतरिक स्थैर्य होय. वरील उदाहरणांमध्ये 'मराठी विषय घेतलेले विद्यार्थी' या पदबंधाचा क्रम बदलून 'विषय घेतलेले विद्यार्थी मराठी' असा फरक केल्यास किंवा 'काळा-सावळा मुलगा' या पदबंधाचा क्रम बदलून 'सावळा मुलगा काळा' असा फरक केल्यास मूळ रचनेतील आंतरिक स्थैर्य नाहीसे होईल. त्यामुळे त्यांना पदबंध म्हणता येत नाही. त्यामुळे पदबंधामध्ये आंतरिक स्थैर्य आवश्यक असते.

**२. बाह्य स्वातंत्र्य :** याचा अर्थ समग्र पदबंध आपला जागा बदलू शकतो. उदा. वातावरणात सकाळच्या कोवळ्या उन्हात एक वेगळाच आनंद असतो. या रचनेऐवजी- सकाळच्या कोवळ्या उन्हात वातावरणात एक वेगळाच आनंद असतो, असेही आपण म्हणू शकतो. या उदाहरणांवरून लक्षात येते की, पदबंध हे वाक्यामध्ये शब्दांसारखेच वावरत असतात. शब्दांचे जसे नाम, विशेषण, क्रियाविशेषण इ. प्रकार पडतात तसेच पदबंधाचेही नाम-पदबंध, विशेषण-पदबंध, क्रियाविशेषण-पदबंध, क्रियापद-पदबंध असे प्रकार पडतात. 'गाडीतील मोठ्या आकाराची पेटी बाजूला काढा' या वाक्यातील 'गाडीतील मोठ्या आकाराची पेटी' हा नाम-पदबंध होय. 'सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेले पाहुणे खोलीच्या बाजूची जागा पकडून बोलत बसले होते' या वाक्यामधील 'सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेले पाहुणे' हा विशेषण-पदबंध होय, तर 'खोलीच्या बाजूची जागा पकडून' हा क्रियाविशेषण-पदबंध होय आणि 'बोलत बसले होते' हा क्रियापद-पदबंध होय. पदबंधाची ही रचना केवळ शब्दांचीच असते असे नाही, ही तर दोन किंवा अधिक पदबंधांचीही असू शकते. उदा. 'नदीच्या पलीकडे असलेल्या गावामधील राजभवनातील सुंदर राजकन्या' या पदबंधाची रचना १. नदीच्या पलीकडे असलेल्या, २. गावामधील राजभवनातील आणि ३. सुंदर राजकन्या अशा तीन संघटकांनी तयार झालेली आहे. यातील पहिले दोन पदबंध हे विशेषण-पदबंध असून तिसरा पदबंध हा नाम-पदबंध आहे. यावरून लक्षात येते की, पदबंधाचे संघटक म्हणून कधीकधी पदबंधही येऊ शकतात.

भाषेतील सर्व वाक्ये ही संरचनायुक्त असतीलच असे नाही. भाषेमध्ये काही तयार वाक्यदेखील असतात. उदा. अर्थात, असे का, कोण जाणे, काय एक एक नवल, खोटारडा कुठचा, कुणास ठाऊक इ. या तयार वाक्यांचे नीट निरीक्षण केले, तर असे लक्षात येईल की, यातील बहुतेक वाक्ये ही उद्गारवाचक आहेत. या वाक्यांमध्ये उद्देश

आणि विधेय हे प्रथमोपस्थित संघटक मिळावेत, अशी यांची रचना नाही. याशिवाय भाषेमध्ये वापरल्या जाणाऱ्या काही वाक्यांमध्ये उद्देश हा प्रथमोपस्थित संघटकच अनुपस्थित असतो. उदा. उजाडलेले, मावळले, सांजावलेले इ. तर काही वाक्यांमध्ये उद्देश हा प्रथमोपस्थित संघटक हा अध्याहृत असतो. उदा. बस इथे, लवकर घे, इथून उठ इ. भाषेमधील तयार रचना, उद्देश हा संघटक अनुपस्थित असणाऱ्या रचना आणि उद्देश अध्याहृत असणाऱ्या रचना यांचे विचार प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पद्धतीने करता येणार नाही. मुख्य म्हणजे अशा रचना या ती ती भाषा बोलणाऱ्यांच्या काही खास लकब किंवा पद्धती असतात आणि त्या वापरानेच आत्मसात करता येतात. पदबंधाचे नामपदबंध आणि क्रियापदबंध असे दोन मुख्य प्रकार पडतात.

### ५.४.१.१ नामपदबंध:

नामपदबंध म्हणजेच वाक्यातील उद्देश होय. 'शहाणी मुले अभ्यास करतात' या वाक्यामध्ये 'शहाणी मुले' हा नामपदबंध आहे. कारण मुले या नामाविषयी 'शहाणा' हे पद अधिक माहिती देते. म्हणून 'शहाणी' या पदास विशेषण असे म्हणता येते. परंतु यांचा एकत्रित विचार केल्यास 'शहाणी मुले' हा 'नामपदबंध' ठरतो. या नामपद बंधाप्रमाणेच विशेषणाचेही पदबंध असतात.

उदा. १. ती पांढरी गाय

२. त्या दहा पांढऱ्या गाई

३. त्या दहा पांढऱ्या दुभत्या गाई


या उदाहरणांमध्ये 'गाय' या नामाविषयी अधिक माहिती पुरवणारे हे सर्व घटक आहेत, हे यातून लक्षात येते. यांनाच 'विशेषणपदबंध' असे म्हणतात. विशेषणपदबंधामुळे नामाची व्याप्ती मर्यादित होत गेल्याचेही या उदाहरणांवरून दिसते. ती, दहा, पांढऱ्या, दुभत्या ही सर्व विशेषणे असून त्या एकाच 'गाय' या नामाबद्दल अधिक माहिती पुरवितात. त्यामुळे त्यांना विशेषणपदबंध म्हणतात. याच उदाहरणांचा आणखी बारकाईने विचार केल्यास असेही लक्षात येते की, या वाक्यांमध्ये आलेली (दुभत्या, दहा) ही सर्व विशेषणे ही प्रत्यक्षात नामे, सर्वनामे (ती, त्या) आहेत. त्याचबरोबर काही वचनाचे कार्य करणारे (उदा. पांढऱ्या) काही घटकही या वाक्यामध्ये असल्याचे लक्षात येते. यातून पुढील सूत्र लक्षात येते.

( नामपदबंध) - (विशेषणपदबंध) नाम + वचन


कंसामध्ये वैकल्पिक पर्याय दर्शविले जातात. कारण प्रत्येक वाक्यामध्ये विशेषण असेलच असे नाही. त्याचबरोबर नामेही असतील असेही नाही. म्हणून त्यांना वैकल्पिक असे दर्शविले आहे.

वाक्यामध्ये नाम, सर्वनाम, विशेषण यांच्यासोबतच शब्दयोगी रूपांचाही समावेश असतो. 'अभ्यासू असल्याने महाविद्यालयात पहिला येणारा विवेक' या पदबंधामुळे 'मुळे, त' ही शब्दयोगी रूपे असून त्यांचा संबंध नामाशी आहे. शब्दयोगी रूपे ही बऱ्याचदा नामांशी किंवा नामसदृश्य शब्दांसोबत जोडून येतात. ही रूपे बद्ध आणि मुक्त अशा दोन्ही स्वरूपाची असतात. मुळे, -त ही बद्ध शब्दयोगी रूपांची उदाहरणे होत, तर वर, खाली, जवळ ही मुक्त स्वरूपाची शब्दयोगी रूपे आहेत. काहीवेळा बद्ध आणि मुक्त स्वरूपाची शब्दयोगी

रूपे एकत्रही वाक्यात वापरली जातात. शब्दयोगी अव्ययांप्रमाणेच क्रियापदेही नामपदबंधाच्या क्षेत्रात कार्य करताना दिसतात. शब्दयोगी अव्ययांप्रमाणेच क्रियापदेही नामपदबंधाच्या म्हणजेच उद्देशाच्या क्षेत्रात कार्य करताना दिसतात. आतापर्यंत मांडलेल्या नामपदबंधाचे सूत्र एकत्रितपणे पुढील आकृतीतून मांडता येते.




वरील सूत्र उदाहरणातून पुढील आकृतीद्वारे समजून घेता येईल.




munotes.in

**५.४.२.१ नाम:**

नामपदबंधामध्ये नामे असतातच. नामांचे चेतन नाम (चेतन नामाला चलनाम असेही म्हणतात.), अचेतन नाम (अचेतन नामाला अचल नाम असेही म्हणतात.), सामान्य नाम आणि विशेष नाम असे वेगवेगळे प्रकार पडतात. मुलगा, माणूस, प्राणी ही चेतन नामाची, तर वृक्ष, दगड, स्वर्ग ही अचेतन नामाची उदाहरणे आहेत. जेव्हा एखाद्या

नामामधून विशिष्ट जातीच्या सामान्यत्वाचा बोध होतो, अशा नामांना सामान्य नामे म्हणतात. ही सामान्य नामे समूहाचे प्रतिनिधित्व करणारी असतात. उदा. फळ, झाड, पुस्तक ही सामान्य नामे आहेत. कारण यांच्यापासून सामान्य तत्त्वाचा बोध होतो. फळ म्हटले की खाण्याची, वृक्षाशी संबंधित वस्तू अशा सामान्यत्वाचा बोध होतो. काही नामा मधून विशिष्टत्वाचा बोध होतो. अशा नामांना विशेष नामे म्हणतात. आंबा, चिंच, राम, सीता, पिंपळ, वटवृक्ष ही विशेष नामे आहेत. यातील आंबा, चिंच यांना आपण 'फळ' म्हणू शकतो. परंतु वटवृक्षाला पिंपळ म्हणू शकत नाही. म्हणजेच ही विशेष नामे आहेत. या सर्वांचा नामबंधामध्ये समावेश होतो. वरील उदाहरणांमधील वृक्ष, फळ अशी नामे ही अचल किंवा अचेतन नामे म्हणून ओळखली जातात. यातून पुढील सूत्र लक्षात येते.

चेतन - अचेतन ( चल- अचल), सामान्य- विशेष.

हे विवेचन पुढील आकृतीवरून सहज लक्षात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| | चेतन- अचेतन (चल-अचल) | वचन | विकारी |
| नामपदबंध | (नाम) | +(सर्वनाम) | +(विशेषणपदबंध) |
| | सामान्य- विशेष | पुरुष | अविकारी |

**५.४.२.२ ब सर्वनाम:**

नामाऐवजी किंवा नामाची विशिष्टता दर्शविण्यासाठी उपयोजिल्या जाणाऱ्या पदांस सर्वनाम असे संबोधले जाते.

उदा. १. तो सुंदर लिहितो. – नामाऐवजी उपयोजन

२. तो मुलगा की, ज्याने काल गीत लिहिले.

या वाक्यामध्ये 'तो' हे सर्वनाम गीत लिहिणाऱ्या मुलाची विशिष्टता अधोरेखित करते. म्हणजेच नामपदबंधात विशेषणांबरोबरच सर्व नामांचाही समावेश करावा लागतो. सर्वनामांचे वचन, लिंग आणि पुरुषानुसार विभाजन करता येते. मी-प्रथमपुरुष, ती -स्त्रीलिंग, ते-तृतीयपुरुष, अनेकवचन-आदरार्थी (ते माझे नातेवाईक आहेत.) अशाप्रकारे सर्वनामांचे विभाजन करता येते.

यावरुन पुढील सूत्र समोर येते.

नामपदबंध = (सर्वनाम) + वचन + लिंग + पुरुष

आतापर्यंतच्या विवेचनावरून पुढील सूत्रही मांडता येते.

munotes.in

नामपदबंध = { ( सर्वनाम) + लिंग + वचन + पुरुष + (विशेषणपदबंध) विकारी / अविकारी + नाम + वचन}

**५.४.१.२ विशेषणपदबंध:**

नामाविषयी अधिक माहिती पुरविणाऱ्या घटकांच्या संचास विशेषणपदबंध असे म्हणतात.

या विशेषणपदबंधाचे दोन प्रकार पडतात.

**१. विकारी विशेषणपदबंध:** नामांच्या लिंग, वचन, पुरुषांचा ज्या विशेषणांच्या पदांवर विकार होतो म्हणजेच नामांप्रमाणे विशेषणाची रचना असते (बदलते) त्यास 'विकारी विशेषणपदबंध' असे म्हणतात.

**२. अविकारी विशेषपदबंध:** नामांच्या, लिंग, वचन, पुरुषांचा विकार न होणाऱ्या म्हणजे स्वतंत्र उपयोजन होणाऱ्या विशेषणांस 'अविकारी विशेषणपदबंध' म्हणतात.

**उदा.** १. तो हुशार आहे.

२. ती हुशार आहे.

३. ते हुशार आहेत.

ही विकारी विशेषणपदबंधाची उदाहरणे आहेत.

१. तू सुंदर आहे.

२. ती सुंदर आहे.

३. ते सुंदर आहेत.

ही अविकारी विशेषणपदबंधाची उदाहरणे आहेत.

यावरून लक्षात येते की, विकारी आणि अविकारी विशेषणे वाक्यांमध्ये असतात. त्याचबरोबर विशेषणाचे पदबंध असतात, हेही आपण मागे पाहिले आहेच. विशेषणांमध्ये नामे, वचनही असतात. हे पुढील सूत्रातून सांगता येतील.

नामपदबंध = (विशेषणपदबंध) विकारी - अविकारी + नाम + वचन

**५.४.१.३ क्रियापदबंध:**

क्रियापद हा वाक्यामधील एक अतिशय महत्त्वाचा घटक असतो. वाक्यामध्ये क्रियापदे मूळ नसतात, तर मूळ 'धातू' असतात. या धातूंना आख्यात प्रत्यय लागून क्रियापदे तयार होतात (ये- येणे, आला, जा-जाणे, गेला, अस-आहे, होता, पड-



munotes.in

पडला). प्रत्येक वेळी धातूंना प्रत्यय लागूनच क्रियापदे तयार होतात असे नाही, तर मूळ धातूही अनेकदा वाक्यामध्ये क्रियापदाचे कार्य करताना दिसून येतात. 'उठ, बस, खा, जा, कर,पी' असे काही मूळ धातू वाक्यामध्ये आज्ञार्थी क्रियापदाचे कार्य करताना दिसतात. म्हणजेच मूळ धातू आणि धातूंना प्रत्यय लागून तयार होणारी रूपे ही वाक्यामध्ये क्रियापदाचे कार्य करतात.

१. बस बघू. २. तेवढं कर आणि मग जा.

३. तो जेवून निघून गेला ४. तेवढं खाल्ल्यानंतर जायला हरकत नाही.

मूळ धातू, प्रत्ययरहित (निघून), प्रत्ययांसहित (खाल्ल्यानंतर) अशा तीन पद्धतीने क्रियापदे आलेला दिसतात.

१. अतिशय मळमळते. २. तिचे डोळे पाणावले. ३. ती माणसे पुढारलेली.

या वाक्यामधील क्रियापदांचे मूळ धातू सांगता येत नाहीत. ही क्रियापदे नामसाधित (पाणी-पाणावले, पुढारी -पुढारलेले) पदांपासून बनलेली आहे.

क्रियापदांमधून वाक्यांचा काळ, व्याप्ती, अभिवृत्ती (आज्ञार्थ,विध्यर्थ), सुसंवाद आदींचा बोध होतो त्यामुळे वाक्यांमध्ये क्रियापदांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते.

उदा. १. विवेक जेवतो. २. विवेक जेवला.

३. विवेक जेवेल. ४. विवेक नेहमी दुपारीच जेवे.

या वाक्यांमध्ये 'जेव' या मूळ धातूला अनुक्रमे '-तो,-ला,-एल,-ए' हे प्रत्यय जोडले गेले आहेत. त्यांना पारंपरिक व्याकरणामध्ये 'आख्यात प्रत्यय' असे म्हटले जाते. परंतु ही रुपिमे आहेत. कारण या प्रत्ययांमधून काळाचा निर्देश होतो. त्यामुळे या प्रत्ययांना 'काळाची रुपिकांतरे' म्हणता येते. वरील प्रत्ययांमधून अनुक्रमे १. वर्तमानकाळ, २. भूतकाळ, ३. भविष्यकाळ आणि ४. रीतीकाळ यांचा बोध होतो. यावरून लक्षात येते की, क्रियापदे ही काळ दर्शविण्याचे कार्य करतात. हेच विवेचन पुढील सूत्राद्वारे मांडता येते.

क्रियापद ⟶ {धातू +काळ (वर्तमान, भूत, भविष्य, रीती)}

वाक्यांमधून जसा काळाचा बोध होतो, तसाच वाक्यांमधील क्रियेच्या व्याप्तीचाही बोध होतो. क्रिया पूर्ण, अपूर्ण की घटिष्य आहे, याचा म्हणजेच व्याप्तीचा बोध क्रियापदातून होतो.

उदा. १. तो झोपला आहे. तो झोपला होता. पूर्ण

२. तो झोपत आहे. तो झोपत होता. अपूर्ण

३. तो झोपणार आहे. तो झोपणार होता. घटिष्य

व्याप्ती (पूर्ण, अपूर्ण, घटिष्य)

व्याप्तीसोबतच सुसंवादाचाही बोध क्रियापदामधून होतो. क्रियापद स्वतंत्र्य म्हणजे तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी नसते, तेव्हा ते कधी कर्त्यानुसार बदलते, तर कधी

कर्मानुसार बदलते. यावरून क्रियापदाचा सुसंवाद कधी कर्त्याशी असतो, तर कधी कर्माशी असतो, हे लक्षात येते.

अ. १. विवेक गायीस मारतो.
२. सविता गायीस मारते.
} कर्त्यानुसार क्रियापदाची रचना म्हणजेच कर्त्याशी सुसंवाद

आ. १. विवेकने गाय मारली.
२. सविताने गायींना मारले.
} कर्मानुसार क्रियापदाची रचना म्हणजेच कर्माशी सुसंवाद.

इ. १. विवेकने गायीस मारले.
२. विवेकने बैलास मारले.
३. सविताने शेळीस मारले.
} कर्ता आणि कर्म दोन्हीनुसारही क्रियापदाची रचना बदलत नाही. म्हणजे येथे कर्ता/कर्म यांच्याशी संवाद नाही. क्रियापद स्वतंत्र आहे.

वर दिलेल्या उदाहरणांमध्ये कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचन, पुरुषानुसार क्रियापदाची रचना केली जाते. म्हणजेच कर्ता आणि कर्म यांच्याशी क्रियापद सुसंवाद साधते. त्यामुळेच सुसंवाद हे तत्त्व क्रियापदाच्या संदर्भात वापरता येते.

सुसंवाद → {लिंग वचन पुरुष, वचन पुरुष }

वाक्य आज्ञार्थी, संकेतार्थी की विध्यर्थी याचाही बोध क्रियापदामधूनच होतो. यातून वाक्याची ‘अभिवृत्ती’ लक्षात येते.

उदा. १. तुम्ही या. अभ्यास करा. मारून टाक. — आज्ञार्थ

२. विवेकने अभ्यास करावा. सर्वांनी मिळून खावे. — विध्यर्थ

३. तू गेला असता (स) तर बरे होते. — संकेतार्थ

यावरून खालील सूत्र मांडता येते.

अभिवृत्ती→ {विध्यर्थ, आज्ञार्थ ,संकेतार्थ }


आतापर्यंत केलेले विवेचन एकत्रितपणे सूत्ररूपाने पुढील आकृतीतून दाखवून देता येईल.

क्रिया. प्र. {
धातू +काळ {वर्तमान, भूत / भविष्य, रीती} + व्याप्ती {पूर्ण, अपूर्ण / घटिष्य}
+ सुसंवाद {लिंग + वचन + पुरुष / वचन + पुरुष} + अभिवृत्ती {आज्ञार्थ, विध्यर्थ / संकेतार्थ}
}



munotes.in

विवेक अभ्यास करीत आहे.




वरील सर्व विवेचनावरून क्रियापदबंधाचे सूत्र मांडता येते.

(क्रियापदबंध) ⟶ {(क्रियाविशेषणपदबंध) + (विधेयपूरक) + क्रियापद}

शेवटी - 'वाक्य' ⟶ नामपदबंध + क्रियापदबंध हे सूत्र सिद्ध होते.

वाक्यातील विधेयास क्रियापदबंध असे म्हणतात. वाक्यातील विधेयाचे कार्य करणाऱ्या पदबंधास 'क्रियापदबंध' असे म्हणतात. वाक्यात काहीतरी उद्देश असतो, त्यास 'उद्देश' म्हणतात. उद्देशासी संबंधित विधानास 'विधेय' असे म्हणतात. विधेयकातील विधाने म्हणजेच शब्दबंध क्रियापदाशी संबंधित असतात. त्यामुळे त्यांना 'क्रियापदबंध' असे म्हणतात.

| नेहमी अनुपस्थित राहणारा राम | काल शाळेत आला. |
|---|---|
| उद्देश | विधेय |

१. तो लिहितो.

२. तो सुंदर लिहितो.

३. तो सुंदर आहे.

४. तो महाविद्यालयात नोकरी करीत आहे.

यापैकी पहिल्या उदाहरणामध्ये 'तो' हे सर्वनाम असून 'गातो' हे क्रियापद आहे. म्हणजेच वाक्यात नामपदबंध आणि क्रियापदबंध असतात.

### ५.४.५ क्रियाविशेषणपदबंध:

वर दिलेल्या उदाहरणांमधील दुसऱ्या वाक्यामध्ये 'सुंदर' हे पद 'लिहिण्या' संबंधी अधिक माहिती पुरवते. म्हणजेच लिहिण्याच्या क्रियेबद्दल ते अधिक माहिती सांगताना दिसते.

munotes.in

त्यामुळे त्यास क्रियाविशेषण असे म्हणतात. दुसऱ्या विधानात क्रियापदाविषयी अधिक माहिती मिळते. हे सूत्र पुढील प्रमाणे स्पष्ट करून सांगता येईल.

(क्रियापदबंध) ⟶ क्रियाविशेषण

वाक्यांमध्ये केवळ सुटी क्रियाविशेषणे नसतात. त्यातून स्थल-कालाचा बोध होतो. ही क्रियाविशेषणे ही विशेषणप्रमाणे विकारी (चल) आणि अविकारी (अचल) असतात. खालील उदाहरणे पहाः

| विशेषण - विकारी | | क्रियाविशेषण - विकारी |
|---|---|---|
| गोरा | मुलगा | तो गोरा आहे. |
| गोरी | मुलगी | ती गोरी आहे. |
| गोरे | मुलगे | ते गोरे आहेत. |
| शहाणा | विवेक | तो शहाणा आहे. |
| शहाणी | विद्या | ती शहाणी आहे. |

यावरून लक्षात येते की, क्रियाविशेषणे ही विकारी असू शकतात. 'सुंदर, बावळट, वेडपट' अशी काही पदे अविकारीही असतात. क्रियाविशेषणांवरून विकारी, अविकारीचा जसा बोध होतो, तसाच त्यामधून स्थळ-काल-रीतीचाही बोध होतो.

१. तो शाळेत आहे. ⟶ स्थल

२. तो कालच येऊन गेला. ⟶ काल


३. तो नेहमीच अनुपस्थित असतो. ⟶ रीती

यावरून क्रियाविशेषणाचेही पदबंध असतात असे लक्षात येते. हे पदबंद पुढील आकृतीतून स्पष्ट करता येतील.

{ (क्रियाविशेषणपदबंध) ⟶ (क्रियाविशेषण) विकारी / अविकारी + (क्रियाविशेषण) स्थल / काळ / रीती }

तो <u>काल वारंवार रस्त्याने</u> भटकत होता

munotes.in




**विधेयपूरक :**

काही वेळेला वाक्यामध्ये क्रियाविशेषणासारखे दिसणारे पद हे विधीपूरक असते. मागील उदाहरणांमध्ये 'तो सुंदर आहे' या वाक्यामध्ये सुंदर हे क्रियाविशेषण आहे,असे वाटते. परंतु ते क्रियाविशेषण नसून 'विधीपूरक' आहे, हे बारकाईने तपासल्यानंतर लक्षात येते. 'तो मुलगा हुशार आहे', 'विवेक प्रामाणिक आहे' या विधानांमधील अधोरेखीत पदे ही विधीपुरकेच आहेत. कारण ही पदे प्रत्यक्ष क्रियेबद्दल अधिक माहिती सांगत नसून क्रियेच्या संदर्भात काही संदर्भ पुरवतात. म्हणून त्यांच्यासाठी विधीपुरक असा शब्द वापरला जातो. अशी पदे अनेकदा नामे किंवा विशेषणे असल्याचे दिसून येते.

उदा . 'ती मुलगी आहे',

'तो प्राध्यापक आहे',

क्रियापदांना अधिक संदर्भ पुरवणाऱ्या घटकांमध्ये केवळ विधिपुरके नसतात, तर त्यामध्ये कर्मांचाही समावेश होतो.

उदा. त्याने पुस्तक वाचले.

मी आंबे खाल्ले.

रामाने रावणाला मारले.

वरील विधानांमधील अधोरेखित केलेली पदे ही कर्मे आहेत. कर्मांचा संबंध हा कर्त्याशी असला तरी प्रत्यक्ष ती क्रियेविषयीच कार्य करताना दिसतात. वरील उदाहरणामधील प्रत्यक्षरीत्या वाचण्याविषयी, खाण्याविषयी आणि मारण्याविषयी अधिक माहिती पुरवतात त्यामुळे क्रियापदांशी कर्माचा संबंध असल्याचे दिसून येते. खालील उदाहरणे पहा.

१. त्याने लगेच बाजी मारली.

२. सर्वांनी मिळून चोरी केली.

या वाक्यांमधील 'बाजी, चोरी,' ही क्रियाविशेषणे नसून विधिपुरके आहेत. यावरून लक्षात येते की, क्रियापदाशी केवळ क्रियाविशेषणपदबंधच संबंधित असतात असे नाही, तर विधी आणि कर्मेदेखील क्रियापदाशी संबंधित असतात. विधी आणि कर्म यांना मिळून 'विधिपूरक' असा शब्द वापरला जातो. 'विधिपूरक' या शब्दासाठी इंग्रजीमध्ये


munotes.in

'Emplement' असा शब्द वापरला जातो. यातून क्रियापदाचे तिसरे सूत्र लक्षात येते,ते असेः

(क्रियापदबंद) ⟶ { क्रियाविशेषणपदबंध) + (विधेय पूरक) + क्रियापद }

विधेयपूरकामध्ये विधी आणि कर्म यांचा समावेश होतो. पुढील आकृतीद्वारे हे आणखी स्पष्ट करता येईल.

उदाः त्याने घरावर धाड टाकली.




वरील उदाहरणांमध्ये 'घरा' हे नाम आणि 'वर' हे शब्दयोगी आहे. यावरून लक्षात येते की, विधेयपूरकामध्ये नामपदबंध आणि शब्दयोगीपदबंध असतात. यावरून विधेयपूरकाचा विस्तार पुढीलप्रमाणे दाखवतो येतो.

(विधेयपूरक)→नामपदबंध शब्दयोगीपदबंध

वाक्यांमध्ये नाम, शब्दयोगी यांच्याप्रमाणेच विशेषणेही विधेयपूरकाचे कार्य करताना दिसतात. १. तो हुशार आहे. २. तो सुंदर आहे. या वाक्यांमध्ये हुशार, सुंदर ही विशेषणे वाटत असली, तरी ती विधीचे कार्य करताना दिसतात. 'सुंदर[1] मुलगा सुंदर[2] वाटेलच असे नाही' या वाक्यामधील 'सुंदर[1]' विशेषण आहे. तर 'सुंदर[2]' हे विधी आहे यावरून पुढील सूत्र लक्षात येते.

विधेय पूरक → { नामपदबंध + विशेषणपदबंध + शब्दयोगी पदबंध }

- **रचनांतरित वाक्यः**

इ. स.१९५० नंतर चॉम्स्की या भाषाभ्यासकाने पृष्ठस्तरीय रचनेपेक्षा अंतः स्तरीय रचनेचे अधिक महत्त्व सांगून वाक्यविचार नव्याने मांडला. यापूर्वी म्हणजे इ.स.१९५० पूर्वीपर्यंत झालेल्या संशोधनामध्ये पृष्ठस्तरीय वाक्यांचेच संशोधन झालेले होते. चॉम्स्की यांच्या मते अंतःस्तरीय पातळीवर घडणाऱ्या भाषिक क्रियांवर विशिष्ट नियमांच्या प्रक्रिया होऊन म्हणजेच रचनांतरण होऊन पृष्ठस्तरीय वाक्ये निर्माण होत असतात. पृष्ठस्तरावर ज्या-ज्या रचना होतात, त्या अंतःस्तरावरील प्रक्रियांनी नियंत्रित झालेल्या असतात. त्यामुळेच वाक्याचा विचार मांडताना 'रचनांतरण' (Transformation) ही संकल्पना अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

munotes.in

१. त्याने पैसे दिले.

२. तो कसा काय गेला ?

३. विवेक गावाला जात नाही.

४. गावाला गेला नाही तू ?

ही वाक्ये पृष्ठस्तरीय पातळीवर संदिग्ध वाटत नाहीत. त्यांचे संबंध अनुक्रमी (Liner) स्वरूपाचे वाटतात. परंतु सूक्ष्मपणे निरीक्षण केल्यानंतर या प्रत्येक वाक्यामध्ये अधिक काही घटक कार्य करीत असल्याचे लक्षात येते. अशी वाक्य सूक्ष्म अवलोकन केल्यास पुढील पद्धतीने दाखविता येतील.

१. त्याने (कोणाला तरी) पैसे दिले. ⟹ त्याने पैसे दिले.
२. तो गेला. (प्रश्न) ⟹ तो कसा काय गेला ?
३. विवेक गावाला जातो.(नकार) ⟹ विवेक गावाला जात नाही.
४. तू आणखी येथेच आहेस. (प्रश्न) ⟹ तू गावाला गेला नाहीस ?

या उदाहरणामधील पहिल्या रचना या अंतःस्तरावर तयार झालेल्या असतात. परंतु त्यांचे रचनांतरण (⟹) होताना संदर्भानुसार, परिस्थितीनुसार पृष्ठस्तरावर बदल झालेले दिसून येतात. त्यामुळे वाक्यांचा केवळ पृष्ठस्तरीय अर्थ लक्षात घेऊन चालत नाही. वाक्यांमागे रचनांतरणाचे कोणते घटक आणि नियम कार्य करीत असतात, हे शोधणेही तितकेच आवश्यक असते.

वरील वाक्य सूक्ष्मपणे तपासली, तर आणखी काही घटक सापडतील. पहिल्या वाक्यामध्ये 'कोणालातरी' या पदाचा 'लोप' (Delection) झाल्याचे दिसते. येथे लोप प्रक्रियेने रचनांतरण होताना दिसते. 'त्याला अधिक बोललेलं आवडत नाही.' या वाक्यामध्ये 'कोणीही' या पदाचा लोप झालेला आहे. येथे 'त्याला कोणीही अधिक बोललेलं आवडत नाही' असे वाक्य अभिप्रेत आहे.

'तो कसा काय बोलला ? या विधानामध्ये वस्तुतः 'कसा' या पदाने प्रश्नार्थी वाक्य तयार झाल्याचे दिसून येते. परंतु त्याला जोडून 'काय' हे पद आले आहे. या पदाचे या वाक्यामध्ये फारसे कार्य दिसत नाही. परंतु भाषेमध्ये अशी अनावश्यक पदे अनेकदा योजिली जातात. अशा अनावश्यक घटकांना 'निवेशन' (Insertion) असे म्हटले जाते. (उदा. सर्वांच्यामागे -सर्वांमागे -च्या -निवेशन = सर्वांच्यामागे).

बोलताना अनेकदा वाक्यामधील पदांच्या क्रमामध्ये बदल केले जातात. त्यामुळे बोलताना प्रत्येक वेळी कर्ता, कर्म, क्रियापद ठरलेल्याच क्रमाने येतील असे नाही. अनेकदा रचनांचा क्रम बदलतो. 'गेला नाहीस तू मामाकडे ?' या वाक्यामध्ये संभाषणाच्या ओघामध्ये स्थानांतर/स्थलांतर होताना दिसते. अशा स्थानांतरामुळे रचनांतरित वाक्ये तयार होतात उदा. १. नेहमीच झटके येतात त्याला. २. सर्वांत शेवटी त्याचा क्रमांक.

अनेकदा दोन किंवा अधिक अंतःस्तरीय वाक्यांचे रचनांतरण होऊन एकच पृष्ठस्तरीय वाक्य तयार होते. अशा वाक्यांचे पृथक्करण रचनांतरणाचे नियम लावून करावे लागते.

munotes.in

उदा. 'गावावरून यायला उशीर झाला.' या वाक्यामध्ये दोन अंतःस्तरीय रचना आहेत. १. कोणीतरी (मी) गावावरून येणे. २. कोणालातरी (मी) उशीर होणे. अधिक सूक्ष्मपणे पाहिल्यास 'कोणीतरी (मी) गावाला गेले होते' ही तिसरी अंतःस्तरीय रचनादेखील सापडते. त्यावरून लक्षात येते की, येथे 'कोणीतरी (मी) गावाला गेला, गावावरून आला आणि येताना मात्र उशीर केला. या तीन अंतःस्तरीय वाक्यांचे रचनांतरण होऊन वरील एकच वाक्य सिद्ध झाले आहे. या वाक्यांमध्ये 'गावाला गेला' या पदाचा 'गावावरून येणे' या पदावर 'प्रतिन्यास' (Substitution) झाला आहे. अशाप्रकारे सर्वसाधारणपणे लोप, स्थलांतर, निवेशन, प्रतिन्यास या पद्धतीने रचनांतरित वाक्ये तयार होत असतात. त्याचबरोबर नकार, प्रश्न, आज्ञा, संदिग्धता, अनेकार्थता यामुळेही रचनांतरित वाक्ये तयार होतात. या रचनांतरणाच्या नियमामागे 'अर्थविचार' हा घटक केंद्रस्थानी असतो.

## ५.५ वाक्यांचे पृथक्करण

प्रथमोपस्थित संघटकांच्या पद्धतीने वाक्यांचे केले जाणारे पृथक्करण हे पारंपरिक व्याकरणामधील वाक्याच्या पृथक्करणासारखेच आहे. कारण येथे उद्देश आणि विधेय यांना वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक मानले आहे. त्याचबरोबर उद्देशाचे मूळ उद्देश आणि उद्देशविस्तार आणि विधेयकाचे मूळ विधेय आणि विधेयविस्तार असेही घटक पुढच्या पायरीवर उपलब्ध होतात, असेही आपण वर पाहिले आहे. मूळ उद्देशाला पारंपरिक व्याकरणामध्ये कर्ता म्हटले जाते. कर्ता हा क्रियेस प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असतो. प्रत्यक्ष कर्ता म्हणजे ज्या कर्त्यामुळे प्रत्यक्ष क्रिया घडते, तो. उदा. विवेक ग्रंथ वाचतो, मुलगा आंबे पाडतो या वाक्यांमध्ये 'राम', 'मुलगा' ही पदे प्रत्यक्ष कर्ता आहेत. याउलट 'त्याला आंबा हवा'. या वाक्यांमध्ये क्रिया कर्त्याच्या ठिकाणी घडताना दिसते. त्यामुळे या कर्त्याला अप्रत्यक्ष कर्ता असे म्हणतात. थोडक्यात, वाक्यामध्ये दर्शवलेल्या क्रियेला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असणाऱ्या नामपदबंधाला मूळ उद्देश किंवा कर्ता असे म्हणता येईल अनेकदा मूळ उद्देशांच्या जोडीला विस्तारक पदबंध असतात. यांचेही उदाहरण आपण वर पाहिले आहे.

### मूलरचित वाक्य आणि रचनांतरित वाक्यः

वाक्यांचे मूलरचित वाक्य आणि रचनांतरित वाक्य असे दोन प्रकार पडतात. भाषेतील कोणते वाक्य मूलरचित आहे आणि कोणते वाक्य रचनांतरित आहे, याचे ज्ञान भाषिक क्षमतेमुळे होते, असे चॉम्स्की म्हणतात. प्रत्येक भाषकाला आपल्या मूळ मातृभाषेतील अनेक चढ-उतार, लकबी, रचनेची कौशल्ये आत्मसात झालेली असतात. चॉम्स्की यांच्या मते, भाषिक क्षमतेमुळे भाषकांना अंत:प्रेरणेने अनेक गोष्टींचा उलगडा करणे शक्य होते. या क्षमता भाषकाकडे जन्मजातच येतात. यावरून लक्षात येते की, प्रत्येक पृष्ठस्तरीय रचनेच्या मागे अंतःस्तरावरील मूलरचित क्षमता कार्यरत असते. तसेच या पृष्ठस्तरीय रचना अंतःस्तरीय मूलरचनांनी नियंत्रित झालेल्या असतात.

उदा. 'विवेक अभ्यास करत नाही'. या वाक्यामध्ये 'विवेक अभ्यास करतो' हे मूलरचित वाक्य निजभाषक पटकन ओळखू शकतो. या मूलरचित वाक्याचे रचनांतर पुढीलप्रमाणे दाखवता येईल.

विवेक अभ्यास करतो + नकार ⇨ विवेक अभ्यास करत नाही. या उदाहरणामधील मूलरचित वाक्य हे होकारार्थी असल्याचे दिसून येते. यास 'अस्तिपक्ष' (positive) असे म्हटले जाते. अस्तिपक्षी वाक्यांमध्ये काही विधाने होकारात्मक असतात. म्हणून त्यांना 'विधान' (prepositions) असे म्हणता येते असे स्टीनबर्ग यांनी म्हटले आहे. येथे विधान ही संज्ञा 'वाक्य' या अर्थाने वापरलेली नाही. अशा विधानांचे रचनांतरण होताना 'नकारार्थी' (Negative) पदे कार्यरत होतात. नकारार्थी पदांना 'नास्तिपक्ष' असे म्हणतात. रचनांतरित वाक्ये निर्माण होताना भाषकाचे काही 'हेतू' (purpose) असतात. ते वाक्यांमध्ये दडलेले असतात. प्रश्न, आज्ञा, नकार, संदिग्धता, विनंती, होकार अशा हेतूंनीच मूळ विधाने नियंत्रित होत असतात. या हेतूंमुळेच वाक्यांचे रचनांतरण होत असते. पुढील सूत्रातून हे स्पष्ट करता येईल.

विधान + हेतू ⟹ रचनांतरण

विवेक अभ्यास करतो + हेतू (नकार) ⟹ विवेक अभ्यास करत नाही.

रचनांतरित वाक्यांच्या पृथक्करणात जी मूलरचित वाक्ये सापडतात, ती रचनांतरित वाक्यांचे नेमके विश्लेषण करत असतात. त्यामुळे या मूलरचित वाक्यांना 'वाक्यपूर्व घटक' असे मिलिंद मालशे यांनी आपल्या 'आधुनिक भाषाविज्ञान' या पुस्तकात म्हटले आहे. तर रमेश धोंगडे यांनी 'वाक्यविस्तारक' असा शब्द आपल्या 'अर्वाचीन मराठी' या पुस्तकात वापरला आहे.


उदा. १. तो झोपला आहे - हेतू (नकार) ⟹ तो झोपला नाही.
२. तो झोपला आहे - हेतू (विनंती) ⟹ तू जरा झोपणार का.
३. तो झोपला आहे - हेतू (आज्ञा) ⟹ तू झोपून घे.

रचनांतरित वाक्ये निर्माण करीत असताना भाषकाच्या मनात एकच एक हेतू असेल असेही सांगता येत नाही. कारण पृष्ठस्तरीय वाक्याच्या मागे एकापेक्षा अधिक हेतू दडलेले असू शकतात

उदा. पहा.
१. काय विशेष प्रगती?
२. सध्या काय सुरू आहे?
३. काय विशेष आहे सध्या?
} ⟹ काय चाललंय?

वरील उदाहरणांमध्ये सुरुवातीची तीन मूलरचित वाक्य आहेत. कधी कधी अशी वाक्ये अधिकही असू शकतात. ही वरील वाक्ये 'काय चाललंय?' त्या रचनांतरित वाक्याने नियंत्रित झालेली दिसतात. वाक्यांमागे असणाऱ्या सामाजिक संदर्भाचाही विचार या अनुषंगाने करावा लागतो. आतापर्यंतचे विवेचन पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येते.

उदा. झाडावर काय आहे?




**आपली प्रगती तपासा**

**प्रश्न**-क्रियापदबंध ही संकल्पना स्पष्ट करा.

## ५.६ समारोप

एकूणच सदरील घटकांमध्ये आपण वाक्यरचनेचा विचार विस्ताराने केला आहे. या रचनेतील प्रथमोपस्थित संघटक म्हणजे काय ? वाक्यरचनेच्या प्रकाराचे स्वरूप, तिचे स्तर आणि वाक्याचे पृथक्करण इ. घटकांचा विश्लेषणपूर्वक विचार केला आहे. वाक्याचे उद्देश आणि विधेश असे मुख्यतः दोन भाग होतात. भाषाविज्ञानातील या संकल्पनाही कोणत्या पद्धतीने कार्यरत असतात यांचा अभ्यास विविध उदाहरणांच्या अधारे केला आहे. एखाद्या भाषेचे ज्ञान असते. म्हणजेच त्याला त्या भाषेच्या रचनेचे ज्ञान असते. व्याकरणिक नियमांनुसार कर्ता, कर्म, क्रियापद, नाम, सर्वनाम विशेषण या घटकांचे भाषेतील वाक्यरचनेत कोणते स्थान असते हेही त्या भाषिकाला माहीत असते. वाक्यरचनेत या घटकांचे स्थान निश्चित असते व ते नियमानुसार बदलतही असते. या नियमांची जाणीवही भाषिकाला असते. वाक्यरचनेला अर्थ प्राप्त होण्यासाठी हे नियम काळजीपूर्वक हाताळले जातात. जेणेकरून वाक्याचा अर्थ बाधित होणार नाही. घटकामध्ये आपण वाक्यरचनेतील

munotes.in

या सबंध बारकाव्यांचा विचार अनेक समीकरणे व उदाहरणांच्या आधारे केला आहे. ज्यातून वाक्यविचार ही संकल्पना आपल्याला अधिक स्पष्ट होते.

## ५.७ संदर्भ


१. डॉ. पुंडे, दत्तात्रय, 'सुलभ भाषाविज्ञान', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, सुधारित द्वितीयावृत्ती : ११ मे २००५, पृ. ९९ ते १०९.

२. डॉ. कदम, महेंद्र, 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, सुधारित द्वितीयावृत्ती :२७ मार्च २००९, पृ. १४१ ते १५८.

३. मालशे, मिलिंद, 'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन', लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती : नोव्हेंबर २००४, पृ.६९ ते ७३.


## ५.८ नमुना प्रश्न

### अ. दीर्घोत्तरी प्रश्न

१. प्रथमोपस्थित संघटक म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. नामपदबंधातील 'नाम' आणि 'सर्वनाम' यांचे विश्लेषण करा.

### ब. टीपा लिहा

१. नामपदबंध

२. रचनांतरित वाक्ये.

### क. एका वाक्यात उत्तरे लिहा

१. 'काळाची रूपिकांतरे' कशाला म्हटले जाते ?

२. मूलरचित वाक्यांना मिलिंद मालशे यांनी काय म्हटले आहे ?

*****

# ६

# प्रमाणभाषा व बोली : बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व, मराठीच्या बोली- वऱ्हाडी, अहिराणी व कोकणी या बोलींचा प्रमाणबोलीच्या तुलनेने अभ्यास

**घटक रचना**


६.१ उद्देश

६.२ प्रस्तावना

६.३ भाषा

६.४ प्रमाणभाषा

६.५ बोली : संकल्पना व स्वरूप

६.५.१ बोलीची निर्मिती

६.५.२ प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील संबंध

६.५.३ बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व

६.५.४ समाजभाषाविज्ञान आणि बोलीविज्ञान

६.५.५ बोली भूगोल

६.५.६ बोलीविज्ञानाची अभ्यासपद्धती

६.६ मराठीच्या बोली

६.६.१ अहिराणी-खानदेशी बोली

६.६.२ वऱ्हाडी बोली

६.६.३ कोकणी बोली

६.७ आपली प्रगती तपासा

६.८ समारोप

६.९ संदर्भ ग्रंथ

६.१० नमुना प्रश्न


## ६.१ उद्देश

१) प्रमाणभाषा व बोली या संकल्पना अभ्यासणे

२) प्रमाणभाषा आणि बोलींचे संबंध अभ्यासणे.

३) बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करणे.

४) प्रमाण मराठी आणि बोलींचे परस्पर संबंध व साम्यभेद अधोरेखित करणे.

५) मराठीच्या बोलींचे स्वरूप समजावून घेणे.

## ६.२ प्रस्तावना

मानवी जीवनात प्रत्येक क्षेत्रामध्ये भाषेचे अस्तित्व जाणवते. भाषेच्या द्वारे मानव त्याचे राग, लोभ, विचार, भावभावना व्यक्त करत असतो. भाषेद्वारा माणसे एकमेकांशी संपर्क साधतात. भाषेचे मूलभूत कार्य म्हणजे सामाजिक संदेशन होय. मानवी समाज व भाषा यांचा संबंध अतूट असतो, स्वत:ची भाषा व बोली नाही असा एकही मानवी समाज आढळत नाही. समाजाचा प्रत्यक्षातील भाषिक व्यवहार बोलीमधूनच जास्त प्रमाणात होत असतो. स्थानिक बोली कितीही असल्या तरी त्या ज्या व्यापक प्रदेशात बोलल्या जातात तेथील शासन व्यवहारासाठी, शिक्षणासाठी एक विशिष्ट बोलीच प्रमाणभाषा म्हणून मान्य केली जाते. ही भाषा मुद्दाम शिकावी लागणारी भाषा असते. या उलट बोली म्हणजे वेगवेगळ्या वर्गाच्या व्यवहारासाठी स्वाभाविकपणे वापरली जाणारी असते.

भाषा ही काही वर्गाच्या बाबतीत प्रमाणभाषेच्या फार जवळची असते, तर काही वर्गाच्या बाबतीत ती फार दूरची असते. आपण एकाच नावाने ओळखतो ती भाषा सर्वत्र एकरूप कधीच नसते, ती त्या भाषेच्या सर्व प्रदेशात सारखी बोलली जात नाही, आणि त्यावरून तिचे भौगोलिक भेद ओळखले जातात. खानदेशी, वऱ्हाडी, कोकणी यांसारख्या बोलींची नावे अशा भौगोलिक भेदांवरूनच पडलेली आहेत. प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातले साम्यभेदाचे नाते ध्वनी, शब्द, रूपविचार आणि वाक्यविचार ह्या सर्व स्तरांवरून केला जातो. यावरून एक विशिष्ट बोली प्रमाणभाषेचीच बोली आहे का नाही हे अभ्यासले जाते. वऱ्हाडी बोलीची व्याकरणप्रक्रिया स्थूलमानाने प्रमाण मराठीसारखीच आहे. त्यामुळे आपल्याला वऱ्हाडी कळण्यास फार अडचण पडत नाही. एखाद्या समाजाच्या स्थितीगतीचा, प्रगतीपरागती, संपन्नता-विपन्नता, ज्ञान-अज्ञान यांचा अभ्यास करून त्यांच्या सामाजिक प्रश्नांची, राजकीय पेचप्रसंगांची दखल घेता येते. समाजाचे म्हणून भाषिक प्रश्न, भाषिक समस्या असतात त्यांचे निवारण करण्यासाठी बोलींचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

## ६.३ भाषा

भाषा ही एक मौखिक क्रिया आहे. जी बोलली जाते ती भाषा. भाषा ही एक ध्वनिरूप संकेतावर आधारलेली संप्रेषण प्रणाली आहे. भाषेमध्ये मानवी मुखाद्वारे निर्माण केले जाणारे निवडक ध्वनी वापरलेले असतात. या ध्वनींची रचना सानुक्रम असते. आणि अशा सानुक्रम ध्वनी रचनेला संकेताने अर्थ बहाल केलेले असतात. मानवी जीवनामध्ये भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवाच्या विकासात आणि संक्रमण अवस्थेत भाषेचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे.

एका विवक्षित समाजाचे आपल्या विचार विनिमयासाठी, आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी विवक्षित ध्वनींनी बनलेला शब्द विवक्षित अर्थाने वापरला. त्या शब्दातून वाक्य तयार केले. त्यातून भाषेचा जन्म झाला. अशा प्रकारे भाषा ही प्रथम बोली म्हणूनच जन्माला आली. बोलणे भाषण-संभाषण करणे हेच तिचे मूळ कार्य. हे कार्य करणारी जिवंत बोली, परिवर्तनशील असते. परिस्थितीने व प्रादेशिक दूरतेने ती बदलत जाते. पण तिची बदलण्याची वृत्ती वा प्रक्रिया जिथे थांबते वा तिची गती मंद होते तिथे तिला लिपिबद्धता येते. ही भाषेची पहिली पायरी होय.

लिपीच्या साह्याने त्या विवक्षित बोलीत ग्रंथरचना होऊ लागते. आसपासच्या अन्य बोली बोलणाऱ्यांकडूनही तिचा लेखनासाठी उपयोग होऊ लागतो. तसेच तिला समाजातल्या प्रतिष्ठित वर्गाकडून व राज्यकर्त्यांकडून मान्यता मिळते. म्हणजेच ती आपले मूल बोलीरूप सोडून वा टिकवून भाषारूप होते. अशी बोलीतून प्रमाणभाषा निर्माण होण्याचा हा एक प्रकार आहे.

## ६.४ प्रमाणभाषा

"एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोली-भेदांना व स्थानिक- भेदांना समाविष्ट करून घेणारी राजकारण, समाजकारण, संस्कृती व शिक्षण या क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली गेलेली भाषा म्हणजे प्रमाणभाषा होय."

**प्रमाणभाषेबद्दलची मते:**

१) भाषावैज्ञानिकांच्या मते, 'साम्यभेद दर्शविणाऱ्या काही बोलींच्या समूहाला लावली जाणारी अशी कल्पना म्हणजे प्रमाणभाषा होय.' एकमेकांच्या खूप जवळ असणाऱ्या बोली आणि स्थानिक भेद यांची बेरीज म्हणजे प्रमाणभाषा होय. एकच ऐतिहासिक परंपरा असणाऱ्या लोकांच्या बोली वेगवेगळ्या असतात, पण त्यामध्ये बरेच साम्य व काही भेद असतात. अशा बोलींचे एकत्व निर्देशित करणारी भाषा म्हणजे प्रमाणभाषा होय.

२) प्रमाणभाषेबद्दलचे दुसरे मत, "काही भाषा वैज्ञानिक असे मानतात की प्रमाणभाषा ही एक आदर्श अशी बोली आहे. उच्चार, व्याकरण व शब्दसंग्रह याबाबतीत तिच्यापेक्षा थोडेफार भिन्नत्व असणाऱ्या इतर बोली बोलणारे लोक ह्या आदर्श बोलीला मान्यता देऊन तिचा प्रमाणभाषा म्हणून स्वीकार करतात आणि तिच्या अंमलाखाली वावरतात."

३) तिसरे मत असे की, थोडेफार भिन्नत्व असणाऱ्या एकमेकींच्या जवळ असणाऱ्या एकच इतिहासपरंपरा असणाऱ्या बोलींचा समूह वाङ्मयनिर्मिती, लेखन व्यवहार, शिक्षण व सांस्कृतिक संचिताची जपणूक यासाठी ज्या भाषेचा अगर बोलीचा वापर करतो ती प्रमाणभाषा होय.

४) भाषावैज्ञानिकांचे पूर्वापार चालत आलेले एकमत आहे. ते म्हणजे प्रमाणभाषा ही समाजाची सर्व सामान्य भाषा असते. समाजातील एखाद्या घटकांकडून तिचा विशिष्ट वापर केला जात असताना या सर्व भाषेच्या रूपात आवश्यक ते बदल करून घेतले जातात. अशी बदल झालेली भाषिक रूपे म्हणजे बोली आणि मूळ सर्वसामान्य भाषा म्हणजे प्रमाणभाषा.

डेव्हिड क्रिस्टल यांच्या मते, "प्रमाणभाषा ही एक सुप्रष्ठित अशी बोलीच असते आणि तिच्यावर संज्ञापन, शिक्षण, भाषाव्यवस्थापन अशा समाजाला उपकारक असणाऱ्या प्रकारच्या जबाबदाऱ्या असतात."

डॉ. ना. गो. कालेलकरांच्या मते, "प्रमाणभाषा हे सोयीसाठी मानलेले, लेखनाशी आणि त्या मार्फत शिक्षण, राज्यकारभार, वर्तमानपत्रे ह्यासारख्या माध्यमांशी संबंधित असलेले, एक भाषिक रूप आहे. सर्व प्रचलित भाषिक रूपांशी संबंधित असलेले पण

त्यांतल्या कोणाशीही पूर्णपणे एकरूप नसलेल्या व्यक्तीने केलेल्या प्रयोगापेक्षा व्याकरणात्म संहितेतल्या नियमांनी ज्यातल्या प्रयोगांची शुद्धाशुद्धता ठरवता येते, असे ते एक आदेशात्मक भाषिक रूप आहे."

थोडक्यात प्रमाणभाषा प्रत्यक्ष अस्तित्वात असते आणि एकभाषक समाज तिचा आदर्श स्वरूपात वापर करीत असतो.

### ६.४.१ प्रमाणभाषेची आवश्यकता:

एखाद्या विशिष्ट परिसरात समान वैशिष्ट्ये असणारी बोली सर्वजण बोलत असतात. शेजारच्या परिसरात थोडा फरक असणारी बोली बोलत असतात. अशा विविध बोली बोलणाऱ्या प्रदेशातील व्यवहाराच्या सोयीसाठी एका बोलीची निवड करून व्यवहार सुकर होण्यासाठी प्रमाणभाषेची आवश्यकता असते. समाजाचा ज्ञानव्यूह, इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी प्रमाणभाषेचाच वापर केला जातो. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहारांसाठी प्रमाणभाषेचा वापर केला जातो. समाजाचे स्थैर्य व एकसंधत्व टिकविण्यासाठी प्रमाणभाषा आवश्यक असते. एकूण लेखनव्यवहारासाठी प्रमाणभाषाच वापरली जात असल्याने समाज स्थैर्याला पोषक वातावरण तयार होते.

भाषेची समृद्धी ही तिच्या शब्दसंपत्तीवर अवलंबून असते. मराठीने अनेक परकीय भाषांतून शब्दसंपत्ती घेतली आहे. ग्रामीण, दलित, प्रादेशिक या लेखकांनी आपापली भाषा प्रमाणभाषेत आणली. त्यामुळे प्रमाणभाषा समृद्ध होऊ लागली आहे. प्रमाणभाषा ही केवळ श्रेष्ठवर्णियांचीच न राहता ती सर्व जनांच्या बोलींतील शब्द स्वीकारून व्यापक झाली आहे. श्री. म. माटे यांनी 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' या लेखात स्पष्ट केले आहे की, समाजातील सर्व व्यवहारक्षेत्रातील शब्द, वाक्प्रचार, म्हणी प्रमाणभाषेने स्वीकारले आहेत. उदा. इंगा दाखवणे, ठिय्या देणे, पाचर मारणे, अंगाचा तिळपापड होणे. तसेच पाश्चात्य भाषांतील अनेक शब्द मराठी भाषेत रूळले आहेत. उदा. पोर्तुगीज शब्दांमध्ये अननस, पेरू, कोबी, बटाटा, आरमार, पिस्तूल, पिंप वगैरे. फ्रेंच भाषेतील फरसबी, फिरंग, काडतूस असे काही शब्द प्रमाणभाषेने स्वीकारले आहेत. अशा प्रकारे कोणत्याही समाजाला, कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात प्रमाणभाषेची आवश्यकता असतेच. अन्यथा कोणतेही व्यवहार होणे अशक्य आहे.

munotes.in

## ६.५ बोली : संकल्पना व स्वरूप

एकभाषिक समाजाच्या एका गटाकडून किंवा एकभाषिक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाणघेवाणीसाठी, दैनंदिन व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपाला बोली असे म्हणतात. बोली हे दैनंदिन वापराचे प्रत्यक्ष व्यवहारातले भाषिक साधन आहे.

### ६.५.१ बोलीची निर्मिती:

भारतीय समाज रचनेत काही व्यवहार, व्यापार एखाद्या विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असतात. कारण गावगाड्याचा वा समाजरचनेचा तो एक आवश्यक असा भाग असतो. अशा वर्गातल्या लोकांच्या भाषेचे स्वरुप आणि तिची पातळी सामान्य भाषेपेक्षा वेगळी होते. भिन्न

असणारी ही भाषा एकाच व्यवसायातल्या अनेक व्यक्तींना एकत्र आणते आणि सामान्य भाषेहून वेगळी असलेली एक बोली होते. अशाप्रकारे समाजरचनेच्या वा सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून एक भाषिक समाजाच्या आतच विविध गट तयार होतात व त्यातून बोलींची निर्मिती होते. समाजामध्ये राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक प्रभावक्षेत्रांच्या अधिपत्याखाली काही गट दबावामध्ये वावरत असतात. प्रभाव गटाला भिऊन, दबकून राहणारे दास्य गट किंवा दुर्बळ गट अशी समाजाची विभागणी होताना दिसते. या दोन्ही गटांची म्हणजे प्रभाव गटाची व दास्यगटाची एकेक बोली तयार होते.

वास्तविक कोणतीही बोली तिच्या स्वतःच्या क्षेत्रातल्या गरजेनुसार पुरेशी विकसित झालेली भाषा असते. प्रत्येक बोलीचे उच्चारणाचे व व्याकरणाचे काही नियम असतात आणि त्या बोलीचे सर्व भाषा ते नियम पाळत असतात. तसेच प्रत्येक बोलीला स्वतःचा असा शब्दसंग्रह असतो. तो शब्दसंग्रह ती बोली वापरणाऱ्या लोकांच्या परिचयाचा असतो.

### ६.५.२ प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील संबंध:

प्रमाणभाषा लेखनात शासनाच्या व्यवहारासाठी, शिक्षणासाठी प्रसारमाध्यमात वापरली जाणारी भाषा असते. ही थोडी कृत्रिम, मुद्दाम शिकावी लागणारी भाषा असते. बोली म्हणजे ज्याच्या त्याच्या वर्गाच्या व्यवहारात स्वाभाविकपणे वापरली जाणारी भाषा असते. ही भाषा काही वर्गाच्या बाबतीत प्रमाणभाषेच्या फार जवळची असते. तर काही वर्गाच्या बाबतीत ती फार दूरची असते.

प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातले जवळदूरचे नाते ध्वनी, शब्द, रूपविचार आणि वाक्यरचना ह्या सर्व स्तरांवर असू शकते.

एखाद्या ऐतिहासिक घटनेमुळे भाषेच्या अनेक रूपातून एखादे रूप पुढे येते आणि मग तिचा विकास हळूहळू, क्रमाक्रमाने प्रमाण भाषेच्या रूपात होतो. पुण्याची मराठी, प्रमाण मराठी झाली. कारण पेशवे तिथे राज्य करीत होते. त्या भाषेला राजाश्रय मिळाला म्हणून हळूहळू तिचा विकास होऊन ती सर्वसामान्य झाली.

प्रमाणभाषेच्या तुलनेने बोली ही अधिक जिवंत आणि चैतन्यमय असते. तिला वेग, चढ - उतार, विविध हेल असतात. त्यामुळे बोली ही प्रमाणभाषेपेक्षा जास्त आकर्षक असते. प्रमाणभाषेत उच्चार आणि लेखन यात नवनवे प्रयोग होत नाहीत. ती बऱ्यापैकी स्थिर असते. तर बोलींमध्ये मात्र उच्चार आणि लेखनाचे नवनवे प्रयोग स्वाभाविकपणे घडतात.

बदलत्या युगात, शिक्षणप्रसारासाठी जागृत समाजात लोकांना व्यापक विनिमयासाठी प्रमाणभाषेचा अधिकाअधिक वापर करावाच लागतो. भाषेच्या दृष्टीने समाज अधिकाअधिक संघटित होतो. पण नित्य व्यवहारासाठी स्वतःची बोली वापरणे आणि लेखनासाठी आणि सांस्कृतिक व्यवहारांसाठी प्रमाणभाषा वापरणे यातही सामाजिक ऐक्याने द्विविध स्वरूप आणि प्रगतीच प्रतिबिंबित होते.

बोलींमध्ये बदल झाला तरी त्यात प्रमाणभाषेच्या सर्वच घटकांचा समावेश होणे संभवनीय नाही. याउलट प्रमाणभाषेचे सर्वच घटक आपल्याला अमुक एका निश्चित बोलीत दाखवता येणार नाहीत.

munotes.in

एकाच नावाने ओळखली जाणारी भाषा सर्वत्र एकरूप कधीच नसते. एक भाषा त्या भाषेच्या सर्व प्रदेशात सारखी बोलली जात नाही आणि त्यावरुन तिचे भौगोलिक भेद ओळखले जातात. पु. ल. देशपांडे यांनी आपल्या लेखनात बोलींच्या विविध भेदांचा विनोदासाठी उपयोग करुन घेतला आहे. तसेच उद्धव शेळके यांनी 'धग' या कादंबरीत, व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशची माणसे', रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' मनोहर तल्हारांनी 'माणूस' कादंबरीत बोलींचा वापर केलेला आढळतो. प्रमाणभाषा आणि बोली दोन्हींचा वापर एकाच साहित्यकृतीमध्ये झालेला दिसतो. अशा प्रकारे प्रमाणभाषा आणि बोली यांचे नातेसंबंध स्पष्ट होतात.

### ६.५.३ बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व:

समाजाच्या दैनंदिन विविध व्यवहार क्षेत्रांमध्ये बोलींचाच प्रत्यक्ष वापर होत असतो. ही वस्तुस्थिती आहे. ती समाजाचा अपरिहार्य भाग आहे. एखाद्या समाजाची भाषिक गरज भागवण्याइतकी ती पुरेशी विकसित असते. आपल्या सामाजिक, व्यावहारिक, व्यावसायिक, कौटुंबिक इत्यादी गरजांच्या परिपूर्तीसाठी आपल्या बोलीचा वापर करावयाचा की प्रमाणभाषेचा आश्रय घ्यायचा याचा सारासार विचार बोली बोलणाऱ्यांनी घ्यायचा असतो. आज जगात सर्वत्रच निरनिराळ्या बोली बोलणारे लोक आपापले अनुभव सांगण्यासाठी, लेखनासाठी उत्सुक झाल्याचे चित्र दिसते. त्यामुळे लेखन पेलण्याची क्षमता बोलीमध्ये असते.

बोली हे दैनंदिन व्यवहारातले नैसर्गिक साधन असून ते मौखिक व जिवंत असते. आता तर आकाशवाणी, दूरदर्शन यासारख्या प्रसार माध्यमांनी बोलींचा वापर सुरू केला आहे. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात बोलीचा समावेश केला आहे. बोलींची वापरक्षेत्र वाढत आहेत.

महाराष्ट्राच्या विस्तृत प्रदेशात व महाराष्ट्राबाहेर मराठी समाजाकडून सारख्याच रूपाची मराठी बोलली जात नाही. तर मराठीच्या विविध बोली बोलल्या जातात. त्यामध्ये एक प्रमाणभाषा आहे आणि इतर बोली या प्रमाणभाषेपासून स्वनिमप्रक्रिया, व्याकरण प्रक्रिया, शब्दसंग्रह यांच्या बाबतीत कमी-अधिक दूर आहेत. तथापि प्रमाणभाषेइतकेच त्या प्रत्येक बोलींना महत्त्व आहे. कारण बोली ह्या त्या त्या भाषिकांचा सामाजिक, सांस्कृतिक वारसाच असतो.

सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी १८९४ मध्ये भारतीय बोलींबरोबर मराठीच्या बोलींचा अभ्यास केला आहे. एकूण बारा खंड प्रकाशित झाले असून त्यातील ७ व्या खंडात मराठी व तिच्या बोली यांचे सर्वेक्षण केले आहे. ग्रिअर्सनने १७९ भाषा नोंदवल्या आहेत व त्याबरोबरच ५४४ बोलींचा उल्लेख केला आहे. ग्रिअर्सनने नोंदवलेल्या १७९ भाषांपैकी १६५ भाषा हळूहळू मृत्यूला सामोऱ्या जात आहेत. तसेच १९२१ च्या जनगणनेनुसार भारतात १८८ भाषा आणि ४९० बोली अस्तित्वात होत्या. भाषा अभ्यासक गणेश देवी यांनी भारतीय भाषांचे सर्वेक्षण करून २८ खंड प्रसिद्ध करण्याचा मानस व्यक्त केला आहे. या पैकी 'महाराष्ट्रातील भाषा लोकसर्वेक्षण' खंडात महाराष्ट्रातील ५० पेक्षा अधिक भाषेतील मराठीच्या अकरा बोली (भाषा), आदिवासींच्या १६ बोली, भटक्या विमुक्तांच्या १८ ते २० बोलींचा समावेश केला आहे. एकूण भारतातील बोलींची संख्या १५०० हूनही अधिक आहे.

आजपर्यंत मराठीच्या वऱ्हाडी, अहिराणी, डांगी, कोकणी, नागपुरी, खानदेशी, हळबी इत्यादी बोलींचा अभ्यास झाला आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या महादेव माडिया, राजगोंड, आंध, कोलाम, परधान, हळवा, कवार इत्यादी आदिवासींच्या भाषांचे संशोधन होणे आवश्यक आहे. तसेच वंजारी, फासेपारधी, कैकाडी, भोई, वडार, इ. भटक्या जमाती व दलित वर्ग यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होत आहेत. या सर्वांचा परिणाम त्यांच्या भाषांवर होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे आज अनेक बोली नाममात्र राहिल्या आहेत, तर अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

बोलीभाषा या शेकडो वर्षांच्या प्रवासातून व रोजच्या व्यवहारातून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे बोली ही विशिष्ट समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती असते. मराठीच्या विविध बोलीतले शब्द संतांच्या अभंगातून, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू, महानुभाव पंथाचे साहित्य, पौराणिक साहित्य, बखरी, लावण्या यातूनही आढळून येतात.

बोलीतील शब्द हे इतर भाषांमधून घेतलेले नसतात, तर ते शेकडो वर्षांच्या वापरातून विकसित झालेले मूळ शब्द असतात. विशिष्ट बोलींमधून विशिष्ट परिसर, संस्कृती आणि विशिष्ट प्रदेशात माणसांची मानसिकता अभिव्यक्त होत असते. स्थानिक लोकसंस्कृती आणि जीवन व्यवहार यांचे यथामूल वर्णन करणारे आणि अनेकदा त्या त्या भूभागातील लोकांच्या मानसिकतेशी आणि स्वभाव वैशिष्ट्यांशी चपखलपणे जोडले गेलेले बोलीतले शब्द, वाक्प्रचार म्हणी हे बोलींचे अविभाज्य घटक असतात.

बोलींमधील म्हणी म्हणजे लोकपरंपरेने स्वीकारलेली त्या त्या समाजातील नीती-अनीती, रुढी-परंपरा, मानवी स्वभाव, उपदेश, उपहास, विनोद इ. विषयीची सुटसुटीत पद्धतीने केलेली दृष्टान्तस्वरुप विधाने होत. मोजक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करणाऱ्या म्हणी म्हणजे भाषेतील अत्यंत अमूल्य असा खजिनाच. म्हणी हा बोलीभाषेतील प्रकार प्रमाणभाषेने आपल्यात सामावून घेतला आहे.

सर जॉर्ज ग्रिअर्सनच्या लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया (१९०३-१९२३) ने १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारतीय भाषांची नोंद केली, त्यांची माहिती गोळा केली, त्यानुसार भारतात त्या काळात १७९ भाषा आणि ५४४ बोली अस्तित्वात होत्या. पुढे १९२१ च्या जनगणनेनुसार भारतात १८८ भाषा आणि ४९० बोली अस्तित्वात होत्या.

१९७१ च्या जनगणनेत १०८ भाषांची नोंद झाली. परिणामतः जवळजवळ १५०० हूनही अधिक मातृभाषा या कायमच्या मूक झाल्या. यातल्या बऱ्याच भाषा या भटक्या विमुक्त समाजात, आदिवासींत बोलल्या जातात. परंतु वाढत्या शिक्षण प्रसारामुळे, बदललेल्या सामाजिक मूल्यांमुळे आदिवासी, भटक्या विमुक्त जमाती, दलित वर्ग यांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात उलथापालथी होऊ लागल्या आहेत. त्यांची राहणी, विचारसरणी, आशाआकांक्षा, जीवनमूल्ये आमूलाग्र बदलत आहेत. या सर्वांचा परिणाम त्यांच्या भाषांवर होणे अपरिहार्य आहे. विशेषतः बलवान सामाजिक गटांत दुर्बल सामाजिक गट विरुन गेल्याने आज अनेक बोली नाममात्र राहिल्या आहेत. तर अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या जमातींच्या भाषांचे संशोधन करुन त्यांची व्याकरणे, शब्दकोष तयार करणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्या बोलींमधील लोकसाहित्याचा संग्रह करणे अत्यंत निकडीचे आहे. कारण त्यांच्या समाज आणि संस्कृतीची ओळख बहुसंख्य वाचकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. तसेच उपेक्षितांच्या अंतरंगाची ओळख झाल्याने त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे शक्य होईल.

munotes.in

बोलींचा अभ्यास हा भाषाविज्ञानाच्या प्रगतीसही हातभार लावीत असतो. भाषांच्या संरचनेतील साधर्म्ये व वैधर्म्ये अभ्यासणे सहज शक्य होईल. या माहितीच्या आधारावर भाषेच्या सार्वत्रिक वैशिष्ट्यांचे ज्ञान होऊन भाषेसंबंधी तात्त्विक विचाराची प्रगती होते.

सामाजिक व सांस्कृतिक मानवशास्त्र, समाजशास्त्र, मानवजातिशास्त्र, शिक्षणशास्त्र, मनोविज्ञान इ. ज्ञानशाखांतील संशोधकांस प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये जाऊन निरीक्षण व टिपणे करणे आवश्यक ठरते. अशा वेळी अध्ययनाचा विषय झालेल्या समाजाच्या बोलीचे ज्ञान त्यांना उपयुक्त ठरते. विशेषतः लोकसमूहाचे सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तन आणि त्याचा आशयाच्या संरचनेशी व घाटाशी असलेला अन्योन्य संबंध यांचे ज्ञान भाषेवरील प्रभुत्वाशिवाय अशक्य आहे.

लोकसमूहांची संस्कृती, सामाजिक व आर्थिक संघटन, ज्ञान, श्रद्धा, मूल्ये इत्यादींविषयक माहिती संकलित करुन त्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाय शोधून काढणे या शासनाच्या कामासाठी बोलींचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

मानवी समाजाचा अभ्यास करण्यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करुन घेणे, वेगवेगळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील विविध वर्गांची ओळख करुन घेण्यासाठी त्यांच्या जीवनाचा, सवयींचा अभ्यास करणे गरजेचे आहे. एकूणच मानवांचे समाजजीवन, त्यांची संस्कृती भाषेच्या माध्यमातून व्यक्त होते. त्या भाषेचा अभ्यास मात्र कोणी करीत नाही अशी खंत भाषावैज्ञानिक डॉ. ना. गो. कालेलकरांनी व्यक्त केली आहे. कारण मानवाचे संपूर्ण जीवन अभिव्यक्त करणारी भाषा ही एकमेव संस्था आहे. तिला पर्याय नाही. भाषेचा विनाश म्हणजे समाजाचाच विनाश होय. म्हणूनच समाजाच्या अभ्यासाचा आरंभ भाषेच्या अभ्यासापासून व्हायला पाहिजे.

एखाद्या समाजाची एकूण स्थितीगती काय आहे हे त्या समाजाच्या भाषेच्या अभ्यासातून सहज समजू शकते. समाजाची संपन्नता, विपन्नता, प्रगती-अधोगती, ज्ञान-अज्ञान, सुसंस्कृतपणा-असंस्कृतपणा इत्यादी गोष्टी एका भाषेच्या जोरावर जोखता येतात.

सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने समाजात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलींचा अभ्यास आवश्यक ठरतो.

बोलींचा अभ्यास केला तर प्रमाणभाषा व बोली यांचे अनुबंध नीट कळतात, तसेच दोन बोलींमधील जवळीक व दूरताही कळते, भाषेमुळे होणारे गैरसमज टाळता येतात आणि भेद मिटवून एकता साधता येते.

कित्येक समाजाचे भाषिक प्रश्न, भाषिक समस्या असतात. त्यांच्या निवारणासाठी बोलींचा अभ्यास फलदायी ठरतो. कधी कधी राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठीही बोलींचा अभ्यास उपयुक्त ठरू शकतो. उदाहरणार्थ- भाषिक प्रश्नांवरुन उद्‌भवणारे सीमावाद मिटवण्यासाठी बोलींचा अभ्यास केला जातो. डांगी ही मराठीचीच एक बोली असल्याने डांग ह्या भौगोलिक प्रदेशाचा समावेश महाराष्ट्रात व्हावा अशी मागणी करताना डांगी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास प्रा. रा. श्री. जोग यांनी केला होता.

प्रमाणभाषा ही केवळ अभिजनांचीच भाषा न राहता ती आपोआपच सर्वजनांच्या बोलीतील शब्द स्वीकारुन व्यापक बनते. श्री.म. माटे यांनी 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी'

या त्यांच्या लेखात सर्व व्यवहार क्षेत्रातील शब्द भाषेत येत असतात आणि ते सतत आलेच पाहिजेत. कारण त्यामुळे आपली प्रमाणभाषा समृद्ध होत राहते. जसे 'इंगा फिरविणे', 'ठिग्या देऊन बसणे', 'सव्यापसव्य करणे' 'घाण्याला जुंपणे' असे अनेक वाक्प्रचार, म्हणी बोली मधून, व्यवसाय क्षेत्रांमधून प्रमाणभाषेत प्रविष्ट होतात. या दृष्टीने व्यवसायनिष्ठ दृष्टीने बोलींचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य या प्रवाहामधून विविध साहित्य प्रकारांमधून लेखन होत आहे. यांना साहित्यामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या साहित्यामधून त्यांच्या बोलींचा अभ्यास करणे सहज शक्य होईल. त्यामुळे मराठी साहित्य क्षेत्र समृद्ध होईल. कारण साहित्य हे समाजजीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करते.

बोलींचा अभ्यास केवळ साहित्यापुरताच आवश्यक आहे असे नाही, तर इतर अनेक सामाजिक शास्त्रांकरिता, भौतिक शास्त्रांकरिता या बोलींचा अभ्यास उपकारक ठरत आहे. जसे धर्मशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास ह्यासारखी सामाजिक शास्त्रे आणि भूगोल, नक्षत्रविज्ञान यांसारख्या भौतिक शास्त्रांकरिताही बोलींचा अभ्यास उपकारक ठरत आहे. लोकसाहित्य या विद्याशाखेत बोलींचा अभ्यास हा महत्त्वाचा ठरत आहे.

### ६.५.४ समाजभाषाविज्ञान आणि बोलीविज्ञानः

अलीकडच्या काळात भाषाभ्यासाला वास्तवलक्ष्यी बनवण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न समाजभाषाविज्ञान या अभ्यासशाखेने केला आहे. समाजभाषाविज्ञान ही शाखा भाषाव्यवहाराचा अभ्यास करते. भाषा समाजात प्रत्यक्षात कशी बोलली जाते याचाच प्रामुख्याने अभ्यास केला जातो. मानवी समाज लिंग, वय, व्यवसाय, परंपरा इ. अनेक कारणांनी विभागला जातो. अशा निरनिराळ्या सामाजिक गटांची भाषा भिन्न असते. या भाषाभेदांचा, त्यामागची कारणे समजून घेऊन समाजभाषा दृष्टीने वैज्ञानिक अभ्यास करतात. हा अभ्यास वर्णनात्मक, उपयोजित आणि औपपत्तिक असा तीन प्रकारांनी केला जातो. त्याचप्रमाणे बोलींचा अभ्यास सुद्धा याच तीन प्रकारांनी केला जातो. विविध बोलींची वर्णनात्मक स्वरुपाची व्याकरणे तयार करणे हा वर्णनात्मक अभ्यास आहे. भारतात आधुनिक भाषाविज्ञानाचा प्रादूर्भाव झाल्यानंतर पीएच. डी. पदवीसाठी निरनिराळ्या बोलींचा अभ्यास सुरू झाला. मराठीच्या बोलींची १९९१ अखेर ३५ व्याकरणे तयार झाल्याची नोंद आहे. (मराठी प्रबंध सूची डॉ. व. वि. कुलकर्णी) डेक्कन कॉलेजमध्ये डॉ. अ. मा. घाटगे यांच्या संपादकत्वाखाली 'मराठी बोलींचे सर्वेक्षण' हा प्रकल्प राबवला गेला. असा उपयोजित अभ्यास करता येतो. यातून बोलींच्या व्याकरणांचा तुलनात्मक अभ्यास करता येतो.

### ६.५.५ बोली-भूगोलः

या अभ्यासामुळे विशिष्ट भाषिक प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या सर्व बोलींची वैशिष्ट्ये नोंदवली जातात. बोलींचे नकाशे तयार केले जातात. यातून प्रत्येक भाषेची आणि बोलींची साधारण सीमारेषा निश्चित करुन त्याचे भाषिक नकाशे तयार करण्यात येतात. भौगोलिक दृष्टीने बोलींच्या सीमारेषा निश्चित करण्याचा अभ्यास हे प्रमुख कार्य बोली भूगोलातून केले जाते. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा बोलींवर कसा परिणाम होत असतो याचा अभ्यास करता येतो. यातून बोलींचा वास्तवलक्षी अभ्यास करता येतो.

### ६.५.६ बोलीविज्ञानाची अभ्यासपद्धती:

प्रत्यक्ष बोलीक्षेत्रात जाऊन क्षेत्रीय अभ्यास करता येतो. प्रमाण बोलींशी तुलना करुन विशिष्ट बोलींची वैशिष्ट्ये अधोरेखित करुन त्यांची उपपत्ती शोधता येते. अशा प्रकारे समाजभाषाविज्ञान आणि बोली भूगोल या दोहोंच्या साहाय्याने भाषाभेदांचा अभ्यास करता येतो. बोलींच्या अभ्यासातून त्यांच्या इतिहासाचा शोध घेता येतो तसेच भौगोलिक कारणांमुळे झालेल्या परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट होते. डॉ. कालेलकर या संदर्भात म्हणतात, 'भाषांचे स्थलांतर, जुन्या भाषांचे अवशेष, सांस्कृतिक क्षेत्रांचा विस्तार, विनिमयाची सुलभता किंवा त्यातले अडथळे इत्यादी भाषेच्या इतिहासाला आवश्यक आणि पोषक माहिती या प्रकारच्या अभ्यासातून मिळू शकते.' सामाजिक चळवळींचा आणि शास्त्रीय प्रगतीचा प्रभाव किती दूर पोहोचला आहे आणि किती खोल गेला आहे, हे त्यावरुन अभ्यासता येते. कोणत्या प्रदेशाने नवे शब्द घेतले, जुने टाकले, का टाकले याचा अभ्यास करता येतो.

महाराष्ट्रात मराठी या प्रमाण भाषेतून शिक्षण दिले जाते. परंतु वेगवेगळ्या बोलींच्या प्रदेशामध्ये शिक्षण देत असताना प्रथम त्यांच्या बोलींचा अभ्यास करुन त्यांना शिकवणे सहज शक्य होईल. ग्रामीण भागातील मुलांना शिकवताना बोलींचा वापर केल्यास लवकर आत्मसात करता येईल. यासाठी शिक्षकांना त्या त्या बोलींचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

समाजामध्ये शिक्षणप्रसार, सामाजिक बदल, राजकीय प्रचार करण्यासाठी कार्यकर्त्यांनी, मंत्र्यांनी बोलीवर प्रभुत्व मिळविणे गरजेचे आहे. त्यामुळे तळागाळातील समाजाचा विकास करणे शक्य होईल.

## ६.६ मराठीच्या बोली

मराठी भाषेमध्ये अनेक बोलींचे अस्तित्व आपल्याला दिसून येते. अहिराणी, वऱ्हाडी, कोकणी, भिल्ली, पावरी, भटक्या विमुक्त समाजाच्या अशा अनेक बोली आपल्याला आढळून येतात. यातील अनेक बोलीतील शब्द हे मराठीच्या प्रमाणभाषेत नाहीत. त्या शब्दांचे विशिष्ट अर्थ, त्यांची विशिष्ट उच्चार पद्धती, सुरावटी, हेल यामुळे ती बोली दुसऱ्या बोलींपेक्षा वेगळी ठरते. या त्यांच्या वेगळेपणाचा अभ्यास भाषाविज्ञानात केला जातो. या घटकात आपण अहिराणी, वऱ्हाडी व कोकणी बोलींचा अभ्यास करणार आहोत.

### ६.६.१ अहिराणी-खानदेशी बोली:

अहिराणी बोलीलाच खानदेशी असे प्रदेशवाचक नाव आहे. साधारणपणे ह्या भाषेचे क्षेत्र पूर्व व पश्चिम खानदेश हे जिल्हे, दक्षिणेकडे नाशिक जिल्ह्याच्या उत्तर सीमेपर्यंत, बुलढाणा, बऱ्हाणपूरपर्यंत असे डोंगराळ क्षेत्र पसरलेले आहे. बागलाणी-नंदुरबारी हे तिचे पोटभेद आहेत.

डोंगराळ प्रदेश व बोलीपुरतीच मर्यादित असल्यामुळे वीस वीस कोसांवर बदलावी इतके पोटभेद तीत सामावू शकतात, असे प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांचे म्हणणे आहे.

डॉ. ग्रिअर्सनच्या भाषिक पाहणीत या भाषेचा समावेश गुजरातीची पोटभाषा म्हणून करण्यात आला आहे. पंजाब, मध्यप्रदेशाच्या मथुरा प्रांतातून आभीर लोक इकडे आले. त्यांच्या प्रभावातून ही बोली आकारास आली असावी; असे काही अभ्यासकांचे मत आहे. ग्रिअर्सनचे म्हणणे होते की, या बोलीचा मराठीत समावेश करणे उचित नाही. अनेक परसर्ग-प्रत्यय मराठीशी एकरुप होणारे असले, तरी सदर बोलीचे आंतरिक रूप गुजराती व राजस्थानीशी मिळतेजुळते आहे. काही का असेना, उत्तर भारत व ही बोली याचा निश्चित काही संबंध आहे. हिच्या परिसरातील वारली, ठाकरी, भिल्ली खानदेशी सरमिसळ होत गेली आहे; हे ही पुन्हा एक सत्य आहे. या बोलीचा गट हा गुजराती-मराठीच्या दरम्यानचा दुवा असावा. पण त्यांचा गुजरातीकडचा झुकाव बघून ग्रिअर्सन खानदेशीला गुजराती पोटभाषेत घालायला वळले असावेत.

ग्रिअर्सनचे असेही मत होते की, अहिराणीचा गाभा महाराष्ट्रीपेक्षा शौरसेनीला जवळ आहे. जेव्हा की त्याचे त्या दोन्ही समकालीन मित्र क्षेत्रातल्या बोली होत्या, हे गृहीत चूक आहे. शौरसेनी महाराष्ट्री पूर्वीची आहे. गुजरातीच्या प्रभावाचा नेमका अर्थ पुढे चांदोरकरांनी लावला व अहिराणी लोकांच्या मराठीच्या स्वाभिमान, निष्ठेचे प्रमेयही त्यासाठी पुढे केले.

अहिराणी भाषा व संस्कृतीचा व्यवच्छदेक अभ्यास करणाऱ्या भा. र. कुलकर्णी यांना मराठी, ना गुजराती आर्यवर्गटोळीची संस्कृतपूर्व परंपरागत चालत आलेली स्वायत्त भाषा आहे असे वाटते.

प्रा.कृ. पां. कुलकर्णी यांनी कोकणी-अहिराणी भाषांची विचिकित्सा केली आहेः

१. गुजराती उच्चार कानावर ठसक्यासारख्या असा आढळून येत नाही.
२. शब्दांच्या बाबतील ७०% शब्द मराठी व ३०% गुजरातीचे सापडतात.
३. रूपप्रक्रियेतील नामविभक्ती व आख्यात विभक्ती या दोन प्रधान बाबीत मराठीचे वर्चस्व आहे.

### ६.६.१.१ अहिराणी बोलीसंबंधीचे वादः

अहिराणी ही गुजरातीची बोली आहे की मराठीची असा एक वाद आहे. ग्रिअर्सनने अहिराणीस गुजरातीची एक बोली असे स्पष्टपणे म्हटलेले नाही. ती मराठीची बोली नाही असे मात्र ते म्हणतात, खानदेशीचे अमराठी बोली म्हणून स्पष्टीकरण करताना ग्रिअर्सन म्हणतात "भिल्ली म्हणून समजल्या जाणाऱ्या बोली खानदेशाच्या भाषेत हळूहळू मिसळून गेल्या आहेत, तर खुद्द खानदेशी ही काही मराठी बोली नाही. पुष्कळ प्रत्यय मराठीत वापरल्या जाणाऱ्या प्रत्ययांशी जुळते आहेत हे खरे, पण बहुतांश प्रत्यय आणि अंतर्गत रूप मात्र गुजराती आणि राजस्थानीशी जुळते आहे."

अहिराणी बोलीबद्दल उपस्थित झालेल्या वादाचा विचार करण्यासाठी १९३५ मध्ये एक तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. या समितीने अहिराणी ही मराठीची बोली असल्याचे पुढील निष्कर्षाच्या आधारे दाखवून दिले.

१) अहिराणीतील मराठी-गुजराती शब्दांचे प्रमाण १००:४१ असे आहे.
२) षष्ठी वगळता अहिराणीतील सर्व विभक्ती मराठीनुसार आहे.
३) आख्यात प्रक्रियाही एक ल्यबन्त वगळता मराठीप्रमाणेच आहे.

४) अहिराणीच्या स्वनिमप्रक्रियेवर मराठीचाच प्रभाव दिसतो.

खानदेशीच्या बाबत ग्रिअर्सनने केलेले विधान ग्राह्य न मानण्याची दोन महत्त्वाची कारणे कालेलकर सांगतात.

१)खानदेशीचा गाभा महाराष्ट्रीपेक्षा वेगळा असून तो शौरसेनीला अधिक जवळचा आहे असे ग्रिअर्सन म्हणतो. कालेलकरांच्या मते, शौरसेनी व महाराष्ट्री ही बाह्यतः प्रादेशिक रूपे वाटली, तरी मुळात ते एकच भाषिक रूप असून शौरसेनी हे कालदृष्ट्या आधीचे व महाराष्ट्री हे नंतरचे रूप आहे.

२)भाषाशास्त्रीय निकषांपेक्षा डॉ. कालेलकर संबंधित बोली वापरणाऱ्या लोकांचे दळणवळण कोणत्या भागाशी अधिक आहे आणि आपण कोणत्या भाषिक समाजाला अधिक जवळचे आहोत असे त्यांना वाटते, हे महत्त्वाचे मानतात. आपण महाराष्ट्रीय आहोत ही दृढ भावना खानदेशी बोली बोलणाऱ्यांच्या मनात आहे तेव्हा अहिराणी वा खानदेशी ही मराठीची बोली मानणे रास्त आहे.

### ६.६.१.२ उच्चार प्रक्रिया:

| | | |
|---|---|---|
| आद्य | अ - आ | अक्षय तृतीया – आखाजी, अंगण – आंगन |
| आद्य | अ - ओ | बय – बोय |
| मध्य | अ – उ | मंडळी – मंडुई |
| मध्य | अ - ए | सांगत-सांगेत |
| आद्य | अऊ – ओ | अमूप – मोप |
| आद्य | अय - ए | तर-तय-ते |
| आद्य | आ – अ | आभाळ-अबाव, चहा-चा |
| आद्य | इअं-ए | विहीर-इहर-हयेर |
| आद्य | उ-ऊ | उष्ट्र-हूट |
| आद्य | उ-ओ | धुणं-धोनं |
| आद्य | ऊ-उ | शून्य-सुन |
| आद्य | ए-य | एक-यक |
| आद्य | एअ-इ | शेवया-सिया |
| आद्य | ओ-व | ओतणे-वतणे |

| | |
|---|---|
| अनुस्वारागम | नाद-नांद, रक्त-रघत, मग-मंग |
| अनुस्त्रारलोप | चिंच-चीच, भिंत-भीत, कुंकू-कुक्कु |
| स्वभक्ती | पर्वत-परबत, पत्र-पत्तर, लग्न-लगन |
| मध्यस्वरलोप | चोरटा-चोट्टा, पोरटा-पोट्टा |
| महाप्राणागम | आग-आघ, वर-वऱ्हे, उभारु-हुबारु, उष्ट्र-हूट |
| घोषीकरण | क्-ग्, एक-येग, ख-ग सख्खा-सग्गा, फ्-ब्, फरशी-बरशी |
| मूर्धन्यीकरण | त्-ठ माती-माठी, ण्-न् आण-आन, मरण-मरन,<br>य-व छाया-छाव, मध्य र्-ट खराटा-खट्टा, इथे-अठे<br>तिथे-तठे |

| | | |
|---|---|---|
| आद्य र-ल रोड, लोड, | रडणे-लडणे | |
| आद्येतर र-ल | पारडे-पालडे | |
| भ-इ | कवठ-कईठ | |
| व-ब | पर्वत-परबत | |
| व-य | वेगळं-येगळं | |
| वि-इ | विमान-इमान, | विळा-इया |
| व व्यंजनलोप | कदा-काहे-कव्ह्य, | |
| व व्यंजनलोप | सेवया-सिया | |
| उष्म्यांच्या प्रक्रिया श-स | शाक-साक, | शक्ती-सक्ती |
| श चा लोप | आश्चर्य-आचरय | |
| प-स | षट-सऊ | |
| श-श | आरसा-आरशी | |
| श-छ | उत्सव-अच्छाव | |
| ळा-ज | चपळा-चपडाई | |
| ळा-य | काळा-काया, | डोळा-डोया |
| ळ चा लोप | केळी-केई, | मोळी-मोयी |
| द्वितीकरण | कुंकु-कुक्कु | |
| वर्णव्यत्यास | गुढीपाडवा-गुडीपाडवा | |
| अभ्यस्त शब्द | तांदूळबिंदूळ-तांदूयबिंदूय | |
| मोठ्यामोठ्या – | मोटल्या मोटल्या | |
| वाटून बिटून- | वाटाई निटाई | |
| एकटं दुकटं- | यकलं दुकलं | |

### ६.६.१.३ व्याकरणिक प्रक्रिया:

१) **लिंगभेद:** मराठीप्रमाणेच अहिराणीत तीन लिंगे आहेत. स्त्रीलिंग साधताना 'ईण-इन' हाच प्रत्यय लागतो. जसे पाटलीन, देशमुखीन याला अपवाद अंडोर (मुलगा)-अंडेर (मुलगी)

२) **वचनभेद**-मराठीप्रमाणे दोनच वचने आहेत. अनेकवचन साधताना पुढील प्रक्रिया होतात.

१. अकारान्त शब्दांचे रुपान्तर एकारान्तात होते. घर-घरे शिवाय मूळ शब्दातील अंत्य लांबवून अनेक वचन साधता येते. घर-घर ऽऽ
२. आकारान्त शब्दाचे अनेकवचन अकारान्त-आकारान्त-एकारान्त होते. घोड-घोडा-घोडे
३. इकारान्त व उकारान्त शब्दांचे अनेक वचन मराठीप्रमाणेच होते.

३) **विभक्ती:** विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी सामान्यतः सामान्यरूप केले जात नाही. उदा. वानीना, पादनाले, गावमां. काही वेळा सामान्य रुपात 'स' असा आगम होतो. पोटेस्नी,

munotes.in

सापासले, दारास्ना, झाडास्नावऱ्हे (झाडावर) अहिराणीतील विभक्तिरूपे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती पुढे दिली आहेत. ती पाहिल्यावर असे लक्षात येते की दोन्ही वचनात अहिराणीचे विभक्तिप्रत्यय एकच आहेत. फक्त अनेकवचनी नामास प्रत्यय लागण्याआधी 'स' हा प्रत्यय लागतो, असे आढळते.

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | - | - |
| द्वितीया | ले | सले, हले |
| तृतीया | न्ही, नी, कडतीन | सन्ही, सनी, सकडतीने<br>कड, नाकन, वरी<br>सकड, लनाकन, सवरी |
| चतुर्थी | ले, से | सले, सकरी, ससे |
| पंचमी | तिन, थिन, पान | सतिन, सथिन, सपान |
| षष्ठी | न्ह, न्हीन, नी | सन्ह, सन्हीन, सन, सनी |
| सप्तमी | म, मा, माझार | सम, समा, समाझार |

षष्ठीचा न-न्ह आणि सप्तमीचा म-मा या प्रत्ययांबाबत गुजारातीचा प्रभाव दिसून येतो.

**आख्यात विभक्ती:**

मराठीच्या तुलनेने अहिराणीचे वेगळेपण जाणवते ते तीच्या क्रियापदांच्या रुपात. पुढील उदाहरणांत दुहेरी उभ्या रेघांपूर्वीचे रूप पुल्लींगी आणि नपुंसकलिंगी वाचक आणि नंतरचे स्त्री वाचक आहे.

**वर्तमान काळ**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथम पुल्लिंगी | बोल्-अस् | बोल्-त्-अस् |
| द्वितीय पुल्लिंगी | बोल्-अस् | बोल्-त्-अस् ।।<br>बोल्-त्-इस् |
| तृतीय पुल्लिंगी | बोल्-अस् | बोल्-त्-अस् ।।<br>बोल्-त्-ईस् |

**बोल भूतकाळ प्रत्यय:**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथम पुल्लिंगी | बोल्-न्-ऊ | बोल्-न्-ऊ-त् |
| द्वितीय पुल्लिंगी | बोल्-न्-आ ।।<br>बोल्-न्-ई | बोल्-न्-आ-त् ।।<br>बोल्-न्-या-त् |
| तृतीय पुल्लिंगी | बोल्-न्-आ<br>बोल्-न्-अं<br>बोल्-न्-ई | <br>बोल्-न्-आ-तू ।।<br>बोल्-न्-या-त् |

अहिराणीत धातूला न प्रत्यय किंवा शून्य प्रत्यय लागून भूतकाळी रूप होते. मराठीला ही प्रक्रिया अपरिचित आहे.

munotes.in

**बोल भविष्यकाळ प्रत्यय**

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरूषी | बोल्-स् | बोल्-स्-त |
| द्वितीय पुरूषी | बोल्-सी | बोल्-शा-त् |
| तृतीय पुरूषी | बोल्-ई | बोल-त-ईन |

बोलणे, जेवणे, चालणे वगैरे अकर्मक धातूंची भूतकालीन रूपे बोलून-बोलतून, बोलना-बोलनी, बोलनात, बोलन्यात अशी न प्रत्ययाचे पर्याय लागून होतात. ती गुजरातीतील बंधागो, दिखाणो (बांधले, दाखवले) या धर्तीची होत.

**काही अपरिचित शब्दः**

अंठी (अक्कल), आंडोर (मुलगा), आंडेर (मुलगी), कल्ड (पायातील कडे), गोखला (कोनाडा), झोऱ्या (सतरंजी), निस्ताई (सावकाश), वंगई (झोपाळा), रावन्या (विनवण्या), शेनफडी (केरसणी), शेरी (गल्ली), हाड्या (कावळा).

**अहिराणी : एक नमुना :**

आज काय से? गुडीपावडा. गुडीपावडासे काय करतस? पुरनच टाकतस कनै? पुरनच करनं से. पुरन टाक दिसू. इंदुन वाप ते नै म्हंतात "माल उग्र आवडत नै" असं. पन मी पुरनच टाकसू, धरीधर पुऱ्या सेतस आन मी कुठ वरनभात करु का? पुरनच टाकसू मंग आते पुरनच टाक दिसू.

## ६.६.२ वऱ्हाडी बोली

या बोलीचे क्षेत्र विस्तीर्ण. बुलढाण्याच्या पूर्वेकडून वऱ्हाडीचे क्षेत्र सुरू होते. एलिचपूर, बैतुल, छिंदवाडा, शिवणी, बालाघाट यांचा दक्षिण भाग हिच्या कक्षेत येतो. नंतर भंडारा, चंद्रपूरचा वायव्य भाग, वणी, वाशीम या प्रदेशाला व्यापून ती परत बुलढाण्यापर्यंत पोचते. वऱ्हाडी बोली प्राचीन असल्याचा दावा करण्यात आलेला आहे.

वऱ्हाडीच्या शब्दसंग्रहात हिंदीचा शब्दभरणा बराच आहे. इस्लामी राजवटीपासून हिंदीत शिरलेले अरबी, फार्सी शब्द वऱ्हाडीने आत्मसात केले आहेत. हिंदीचे क्षेत्र वऱ्हाडी बोलीच्या प्रदेशालगत आहे. भाषावार प्रांतरचना होण्यापूर्वी मध्यप्रदेश राज्यात मराठी आणि हिंदी भाषक लोक एकत्र नांदत होते या काही कारणांमुळे वऱ्हाडी बोलीवर हिंदीचा लक्षणीय प्रभाव दिसतो.

### ६.६.२.१ उच्चारप्रक्रियाः

प्रमाण मराठीतील दीर्घ उच्च्यारांचे वऱ्हाडीत सामान्यपणे ऱ्हस्वीकरण होताना दिसते. याशिवाय आ-अ, ओ-व, क-ग, व-इ, क-य, र आत्मसात होऊन साधलेले द्वित्वीकरण, ऋ च्या प्रक्रिया, स्वरभक्ती, मध्यस्वरलोप या उच्चार प्रक्रिया महत्त्वाच्या आहेत.

आद्य अ-आ अगोदर-आगुदर, बंडी-बांडी

| | |
|---|---|
| आद्य अ-इ, ई, | अल्प-इलुसं, झरा-झिरा, जम्मत-जीम्मत |
| आद्य अ-ए | कदा-केदा, छडी-छेडी, भय, भेव |
| आद्य आ-अ | आषाढ-अखाड, कासार-कसार, वाटाणा-वटरा |
| उ-ओ | खुराडे-खोराडे, झुंड-झोंड, भुंडी-भोंडी |
| ए-ये | एकता-येकला, एकोपा-येकोपा |
| ऐ-अय | ऐपत-अयपत, चैन-चयन, हैराण-हयराण |
| ओ-अ- | बोलावणे-बलावणे, फोटो-फटू |
| ओ-उ | अगोदर-आगुदर, जोंधळा-जुंधळा, फोनो-फनु |
| ओ-व | ओठा-वटा, ओंफस-वंफस, ओक-वक |
| औ-ऊ, अउ-आऊ, अव-आव | पौष-पूस, पौक-शउक, औत-आउत, दौत-दवत, हौस-हावशा |

**ऋ च्या प्रक्रिया:**

| | |
|---|---|
| ऋ-अ | तृण-तन |
| ऋ-इ | दृष्ट-दिष्ट |
| ऋ –ई | ऋण-रीन |
| ऋ-उ | पृच्छ-पुसणे |
| ऋ-इर | मृग-मिरग्या, - मिरग कृष्ण-किरसन |

| | |
|---|---|
| २.अनुस्वारागम | दारिद्र्य-दलिंदर, निश्चिती-निचंती, मुद्रिका-मुंदी, |
| ३.अनुस्वारालोप | विंचू-इचू, कुंकू-कुखु, मांजर-माजर |
| ४.स्वरसमीकरण | सिनेमा-सेनेमा, जायबंदी-जेरबंदी |
| ५.स्वरवि,मीकरण | कुसूर-कसूर-कुपुत्र-कपूत |
| ६.स्वरव्यत्यास | नवतरुणी-नवतुरणी |
| ७.आद्य स्वरागम | व्याही-इवाही |
| ८.स्वरभक्ती | कर्मगती-करमगती, रत्न-रतन, शुक्र-सुकीर, नक्षत्र-नकतेर, फ्रॉक-फराग |
| ९.मध्यस्वरलोप | आरभाट-अर्बट, इयचा-इच्चा, कबुतर-खबुत्र, शहाणा-शाणा |
| १०.महाप्राणागम | येरबाळी-हेरवाळी, किस्सा-खिस्सा, लुबरा-लुभरा |
| ११.महाप्राणलोप | विध्वंस-इदास, सखू-सकू, स्वभाव-सबाव |
| १२.घोषीकरण | क-ग आकाशदिवा-अगसदवा, भोक-भोग |
| | ख-ग खडीसाखर-गडीसाखर, खटपट-गटपट |
| | च-ज खजांची-खजांजी |
| | ट-ड शकट – शकडं |
| १३. अघोषीकरण | ग-क आगटी-आकटी |
| | ज-च आजचा-अच्चा |
| | द-ट बादली – बाल्टी |
| १४.मूर्धन्यीकरण | तिटकारा-टिटकारा, तिलक-टिक्का |

| | |
|---|---|
| १५.दन्ततालव्य | झोकणे-ढोकणे |
| १६.ओष्ठ्य | पिंप-टीप |
| १७.मूर्धन्य-दन्त्य | ण – न अळणी – अयनी, वाण – वान |
| १८.दन्त्यतालभ्य-उष्मे | च – श चिमणी – शिमनी |
| | च-स खिचडी – खिसळी |

**१९. इतर उल्लेखनीय व्यंजनप्रक्रिया**

| | |
|---|---|
| ज – ग | ज्ञान – ग्यान |
| न – ल | जन्म – जलम, बदनामी – बदलामी |
| म – न | निमंत्रण – निवतन |
| र –ल | रेडिओ – लेहू |
| ल - य | कलंक – कयंक |
| व – ब | वखार – बखार, अवजड-बाजड, व्यापार – वेपार |
| व - य | वेसकर-येसकर, वेटोळी - येटाई, वेसन - येसण |
| व –इ | विंचू – इचू, विंचर – इचर |

**२०.उष्म्यांच्या प्रक्रिया**

| | |
|---|---|
| ष-ख | पुष्प – पुख, दुष्काळ – दोखाड |
| ष – स | बंढ - संढ |
| ष – ह | गोष्ट – गोठ |
| श – स | यश - येस |
| श – छ | पसीना – पछिना |
| स– श | सीधा – शिदा |
| ह - य | गहिना – गयना, कहाणी – कायनी, शहाणा – शायना |
| क - य | ओंजळ – आंजोयी, ओघळ – वघय |
| ळ - य | टंगळमंगळ – टंगळमंगय |

**२१. व्यंजनलोप**

| | |
|---|---|
| **२२.समव्यंजनलोप** | खसखस – खाकस, जबाब – जाब |
| **२३. व्यंजनव्यत्यास** | सुकुमार – खुसुमार, हिरवं – हिवरं |
| **२४. द्वित्वीकरण** | काटी – काट्टी, दुरडी –दुड्डी, दादला – दाल्ला, |
| | पोस्टी – पोट्टी |

**२५. संयुक्त व्यंजनांच्या प्रक्रिया**

| | |
|---|---|
| क्ष– ख | क्षीर – खीर, क्षणभर – खिनभर |
| स्व : स | स्वभाव – सभाव, स्वप्न – सपन |

| | |
|---|---|
| | अन्पत्र 'स' चा लोप स्थल – थळ, हस्ती – हत्ती, स्तन-थान<br>स्फुरण– फुरण, स्थाली – थायली |
| अर्थस्वरांचा लोप | ट्यूब –टूप, व्यर्थ - वेर्थ |
| | पुण्य – पून, पथ्य – पथ |
| | ग्वाही– गाही, द्वाड, दाड |
| र चा लोप | त्राण – तान, द्रोण – डोणा |
| ल चा लोप | फाल्गुन – फाग |

### ६.६.२.२ व्याकरणिक प्रक्रिया:

वऱ्हाडातील सर्व नामरुपात प्रमाण मराठीपेक्षा वेगळेपणा जाणवतो.

१) दर्शक सर्वनामे-स्त्रीलिंगी ही, जी, ती यांची रुपे जुन्या मराठीप्रमाणे हे, जे, ते अशी होतात. प्रमाण मराठीत पत्रात 'हे' विनंती पुरतीच ही लकब उरली आहे.

२) तृतीय पुरुषवाचक सर्वनामे पती-पत्नी या संकेतासाठी ये (= पती) /यी (= पत्नी)

३) प्रथम व द्वितीय पुरुषी सर्वनामांची विभक्तिरूपे द्वितीया - चतुर्थी ए, व, मले, तुले, मसि, मज, तुज अशी रूपे येतात.

तृतीया : म्या, तू, तुवा, त्वा या रूपांबरोबरच मीनं, तुनं, मीन्, तून् अशी रूपे प्रचलित आहेत.

षष्ठी : प्रमाण मराठीतील माझा-तुझा या रूपांबरोबरच माहा, तुहा ही रुपे प्रचलित आहेत. या व्यतिरिक्त मापला (आपला) मापलं (आपलं) तुपला (तुझा) तुझ्यावाल (तुझं) तुझ्यावानी (तुझ्यासारखे) अशी रूपे आढळतात.

४) प्रश्नार्थक 'काय' या सर्वनामाची रूपे काहून, काव्हून, काम्हून अशी होतात.

**नामविभक्ती:**

क) वऱ्हाडीची प्रवृत्ती अन्त्य स्वरोच्चार आखूड करण्याची आहे तीनुसार नपुंसकलिंगी अनेकवचनी 'एं' प्रत्ययाचा 'अ' कारान्त नाम असा प्रकार आढळतो.
उदा. चांगले मानस (चांगली माणसे)

ख) द्वितीय-चतुर्थीच्या 'ला' प्रत्ययाऐवजी 'ले' हा प्रत्यय वऱ्हाडीत रुढ आहे.
उदा.मले, तुले, रामाले, मानसाले

ग) तृतीयेचा 'शीन' हा प्रत्यय लक्षणीय आहे.
उदा.देवाशीन, माझ्याशीन

घ) सामान्यरूपांच्या अनेकवचनात 'इ' आणि 'ही' असे आगम होतात.
उदा.बापाईस – बापाहीस, मानसाईले – मानसाहीले

munotes.in

**आख्यात विभक्ती:**

**अ) वर्तमानकाळ:**

१) वऱ्हाडीत प्रथम पुरुषी क्रियापदरूपे लिंगभेदानुसार बदलत नाहीत. स्त्रियांच्या तोंडीही 'मी जातो' असा प्रयोग होतो. त्याचप्रमाणे स्त्रीलिंगी तृतीय पुरुषी एकवचनी रूपेही प्रमाण मराठीहून भिन्न होतात.उदा. ती जाती, ती बसती.

२) द्वितीय आणि तृतीय पुरुषी एकवचनी तसेच तृतीय पुरुषी अनेकवचनी रूपे लिंगभेदानुसार न बदलता सारखीच होतात. उदा. राहतेस तो-ती – ते राहते, ते – त्या – ती राहतेत.

३) हो किंवा असणे या क्रियेची प्रथमपुरुषी एकवचनी रूपे मी आहो, मी व्हय अशी होतात.

४) रीतिवर्तमानकाळ भूतकाळाप्रमाणे साधला जातो.
उदा. म्या म्हणे, आम्ही-निजो.

**आ) भूतकाळ:**

१) प्रमाण मराठीत भूतकाळात द्वितीयपुरुषी व तृतीयपुरुषी क्रियापदाची रुपे वेगळी होतात.
उदा. तू गेला, तुम्ही गेले, तो गेला, ते गेले

२) वऱ्हाडीत भूतकाळात एकवचनी न आणि अनेकवचनी नि हा अधिकचा प्रत्यय लागताना आढळून येतो.

उदा. त्यानं गाडलंन, त्यांनी सांगितल नि.

३) गेला होता – गेल्ता, नेला होता याचे नेल्ता अशी संक्षेपरूपे होतात.

**इ) भविष्यकाळ:**

कर या धातूची रूपे पुढीलप्रमाणे होतात
मी करल – आम्ही करू, तू करसीन – तुम्ही करसान
तो करील – ते करतील
भविष्यकाळाचे 'ल' आणि 'न' प्रत्यय लागताना विकल्पाने 'इ' हा आगम होतो. उदा.
जासन – जाशीन

**ई) आज्ञार्थ:**

१) आज्ञार्थी द्वितीय पुरूषी 'ए' व प्रत्यय 'य' आहे. जाय, खाय, पाह्य
२) भविष्यकाळी आज्ञार्थ 'जो' प्रत्ययाने साधला जातो तेथे विनंतीचा अर्थ अधिक अभिप्रेत असतो. करजा, जाजो, घेजो

**उ) अकरणरूप:**

हे साधताना प्रमाण मराठीतील 'इ' या आगमाऐवजी ये हा आगम होतो. तो देयेना, पाहेना, जायेना.

**ऊ) ल्यबन्तः**

लयबन्तला शान/शानि हे प्रत्यय अधिकचे लागतात करुनशान, धावूनशानि

**ए) अनियमित प्रयोगः**

वऱ्हाडातील 'मी काम विसरली', 'तो काम केला' हे अनियमित प्रयोग द्राविडी भाषांच्या प्रभावातून आले असावेत.

'करुन राह्यला', 'बसून राह्यला' ही रूपे तसेच 'भेटणे' याचा 'मिळणे' या अर्थी प्रयोग ही वऱ्हाडीची वैशिष्ट्ये आहेत.

'इकडे ये' किंवा 'हे बघ' या अर्थी 'हिंग' हा संक्षेपरूप प्रयोग प्रचलित आहे.

**हिंदीशब्दः**

वऱ्हाडीत हिंदी शब्दांचा भरणा खूप आहे. आदत, इतबार, उडन खटलु, गलती, खेत, गुंजाईस, बिदागिरी, शहद, पेशाब, फत्ते, मजाल, बारीस असे किती तरी.

**अपरिचित वऱ्हाडी शब्दः**

अढाऊ (उनाड), अडकूल (पोहे) आंडू (मूल), इसरा (सामान)
उमोठा (उंबरठा), एसेल (गोडे तेल)
काचोळी (मिरचीचा ठेचा), खुरपाडा (अवर्षण)
गदादणे (उकाडा होणे), टेटर (हेकेखोर)
म्हाली (न्हावी), मामूजी (उंदीर), हातोळी (विवाह)
शिल्लोक (पावसाची सर) इत्यादी

**नातेशब्दः**

मा/बय (आई) आती/फुई (आत्या)
जटानी (जाऊ) बाबाजी (बाप, आजोबा, सासरा)
साळी (मेहुणी) बुगा (आजोबा) जीजी (मावशी)
नंदय / ननंदुली (नणंद) दाजी / बापूजी (थोरला दीर)
महालपा (मोठा सावत्र बाप), पाटकर (पाटाचा नवरा)

**वऱ्हाडीचा नमुनाः**

मी व माझी बायको आनी दोन पोरं असे घरात निजलो असता रात्रीचे सुमारास माह्या बायकोनं मला जाग केलं. आन म्हनू लागली की घरात भांडे वाजत असून माणसाचा चाहाळ येत. त्यावरुन मी उठलो आणि भीतीकडे पाहिले त मला भोक दिसलं. त्यावरुन खास वाटलं की कोनी तरी घर फोडून आत शिरलं आहे. चोरावर माही नजर गेल्याबरोबर म्या त्यास पकडलं. त्याची व माझी झोंबाझोंबी बरीच झाली.

munotes.in

## ६.६.३ कोकणी बोली

पश्चिम घाट आणि अरबी सागर यांच्यातील अरुंद डोंगराळ किनारपट्टीचा भूप्रदेश कोकण या नावाने प्रसिद्ध आहे. दमण ही या प्रदेशाची उत्तर सीमा होय. गोव्याच्या तेरखोलचा भाग किंवा म्हैसूर राज्याचा भाग जेथे समुद्राला मिळतो तेथवरचा भाग ही या प्रदेशाची दक्षिणेकडील सीमा होय. तीनशे मैलाहून अधिक लांबी असलेल्या या उभट चिंचोळ्या प्रदेशात सर्वत्र एकाच प्रकारची कोकणी बोलली जात नाही. ग्रिअर्सन यांच्या भाषिक पाहणीनुसारसुद्धा तिसांहून अधिक बोली कोकणी ठरवाव्या लागतील. कोकणीचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या १) उत्तर कोकणी २) मध्य कोकणी आणि ३) दक्षिण कोकणी असे उपभेद सांगता येतात. दमण ते राजापूर पर्यंतच्या भागात म्हणजे रत्नागिरीपासून वरच्या भागात उत्तर कोकणी बोलली जाते. या उत्तर कोकणी बोलीचे रूप प्रमाण मराठीस जवळचे आहे. गोव्याच्यावर सावंतवाडी भागात आणि सावंतवाडीच्या आसपासच्या वेंगुर्ले, मालवण, रत्नागिरीपर्यंतच्या भागात 'मध्य कोकणी' बोलली जाते. उत्तर कोकणी आणि दक्षिण कोकणी यांचा दुवा जोडणारे हे रूप आहे. कोकण किनारपट्टीच्या थेट दक्षिणेस, म्हणजे गोवा आणि कर्नाटकाचा उत्तर भाग, या प्रदेशात 'दक्षिण कोकणी' बोलली जाते.

वरील प्रादेशिक भेदांच्या अंतर्गत दमणची कोकणी, बाणकोटी, संगमेश्वरी, कुडाळी, गोमंतकी इ. स्थानिक भेद होतात. जातींनुसार, समाजातील भिन्न भिन्न स्तरांनुसार चित्पावनी बोली, गौड सारस्वतांची बोली, ठाकरी बोली, ख्रिस्ती बोली असेही भेद दृष्टोत्पत्तीस येतात.

उत्तर कोकणी व मध्य कोकणी ज्या प्रदेशात बोलल्या जातात ते प्रदेश सांस्कृतिक आणि प्रशासकीय कारणांनी प्रमाण मराठीच्या प्रदेशाशी जोडलेले असल्याने या दोन्ही प्रकारच्या कोकणी बोली प्रमाण मराठीला जवळच्या आहेत. परंतु प्रश्न उद्भवतो तो दक्षिण कोकणीबाबत. प्रदीर्घ काळ गोव्यावर पोर्तुगीजांची राजवट होती, तर त्याखालच्या कर्नाटक भागातील लोक जीवनाच्या अनेक क्षेत्रांत कन्नडचा वापर करीत होते. ही कोकणी मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे हा प्रश्न मोठा वादग्रस्त होऊन बसलेला आहे.

### ६.६.३.१ उच्चारप्रक्रिया:

कोकणीची स्वनिमव्यवस्था मराठीच्या स्वनिमव्यवस्थेपेक्षा फारशी वेगळी नाही. मात्र कोकणीची उच्चारपद्धती, हेल, आंदोलन, आघात इत्यादी बाबतीत ठळकपणे जाणवण्याइतकी वेगळी आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता संस्कृतची स्वनिमव्यवस्था ज्या स्थित्यंतरातून परिवर्तित होत मराठीच्या स्वनिमव्यवस्थेपर्यंत आली त्याच मार्गाने संस्कृतचे स्वनिम कोकणीपर्यंत येऊन पोचले असले पाहिजेत.

१) नासिक्य उच्चारांचे वैपुल्य हे कोकणीचे ठळक वैशिष्ट्य होय. कोकणीत अनुनासिक स्वर आहेत, मराठीत ते जवळ जवळ पूर्णतः नाहीसे झालेत.

२) शब्दान्तींच्या 'अ' कारादी स्वरांचे पूर्ण उच्चार करण्याची पद्धत आहे.

३) उच्चार भेदामुळे अर्थभेद – कोकणीत अ, ए आणि ओ या स्वरांच्या बंदिस्त वा आखूड आणि विवृत वा लांब उच्चारांमुळे अर्थभेद घडून येतो. त्या अर्थभेदाचा पहिला प्रकार

munotes.in

म्हणजे वृक्ष आणि त्याचे फूल किंवा फळ दर्शविणारा भेद. उदा. बोंबळ याचा अर्थ बकुळीचे झाड तर 'वोंव ऽ ळ' म्हणजे बकुळीचे फुल. त्याचप्रमाणे पेर म्हणजे पेरुचे झाड तर पेऽर म्हणजे पेरु हे फळं. अर्थभेदाचा दुसरा प्रकार म्हणजे वचनभेद वा संख्या भेद.उदा. व ऽ ड= एक वड, वड= अनेक वड, मो ऽ र = एक मोर, मोर – अनेक मोर.

उच्चारभेदाने अर्थभेद हे कोकणीचे खास वैशिष्ट्य आहे असे सांगितले जाते परंतु केळ् = केळीचे झाड आणि केळ ऽ = केळीचे फळ असा अर्थभेद मराठीतही होतो. शब्दयोगी 'वर' आणि क्रियाविशेषण 'वर' (हे व ऽ र असे उच्चारतो) येथेही उच्चारभेदामुळे अर्थभेद होतो याकडे अभ्यासकांनी लक्ष वेधलेले आहे.

कोकणीतील उच्चारप्रक्रियेत आद्य 'अ' चा ओ होणे, 'ण' चा न होणे, महाप्राणप्रक्रिया, उष्म्याच्या प्रक्रिया आणि त्यातही 'ष' चा अभाव या गोष्टी विशेष लक्षात येतात.

अनुभव – अणभाव, असून – आसून

अ – उ पण – पुण

आद्याक्षरांतील अ – ओ खमीस – खोमीस, सर्प - सोरोप

| | |
|---|---|
| आद्य उ – ओ | पुराणे – पोराणे |
| अन्त्य उ – अ | वस्तू – वस्त |
| आद्य ओ – व | ओळख – वळख |
| आद्य वि – इ | विकणे – इकणे |

ऋ च्या प्रक्रिया

| | |
|---|---|
| ऋ – इ | गृहस्थ – गिरेस्त |
| ऋ – उ | वृक्ष - रुख |
| स्वरभक्ति | ग्रहण – गिराण, फक्त – फक्कत |

| | |
|---|---|
| मध्यस्वरलोप | गहू (गोधूम) – गव, दहा – धा |
| | राजकारण– राजकार्ण, व्याकरण – व्याकर्ण |
| मध्यव्यंजनलोप | दिवस – दिस, भूमी – भुई |
| महाप्राणागम | नाक-नाख, आरसा – हारसो, उंदीर – हुंदीर |
| महाप्राणलोप | अधिक – आदिक, घर – गेर, चढ - चड |
| | शंभर – शंबर, मध्य – मदलो |
| घोषीकरण | खूप – खूब, तीट –तीड |
| अघोषीकरण | अजब – अजाप, मंडप –मांटव |
| मूर्धन्यीकरण | न – ण अनुभव – अणभव |
| | ल– ळ श्लोक – शिळोक |

दन्ततालव्य – तालव्य चोच – तोंच, नजर – नदर

| | |
|---|---|
| मूर्धन्य – तालव्य | ड - द डोळे – दोळे, हुक्कर – दुकर |
| | ण – न आणि – आनी, माणूस – मनीस |
| | व – प सरस्वती – सरस्पती |

**उष्म्यांच्या प्रक्रिया:**

| | |
|---|---|
| श – स | क्लेश – किलेस, शाळा – साळा |
| ष – ख | तोष – तोखताय |
| ष – श | विशेष – विशेश, पाषाढ - आशाड |
| ष – स | द्वेष – द्वेस, भाषा – भास |
| 'ष' लुप्त | ग्रीष्म– गीम |
| श – शे | असें – अशे |

**जोडाक्षरातील प्रक्रिया:**

| | |
|---|---|
| च्छ – स | वांच्छा – वान्सा |
| र लुप्त | रात्र – रात, उर्फाटा – उफ्फाटो |

आद्य व्य मधील य लुप्त व्यापारी – देपारी

आद्य स चा लोप स्थल – थळ, स्थिर – थीर

| | |
|---|---|
| द्वित्वागम | मत – मतए, फक्त फक्कत |
| द्वित्वालोप | घट्ट – घट, हट्ट – हट |

**६.६.३.२ व्याकरणिक प्रक्रिया:**

**लिंग :**

१) वयात न आलेल्या किंवा खालच्या समजण्यात आलेल्या वर्गातील स्त्रियांची नामे नपुंसकलिंगी मानली जातात. चेडू (मुलगी), मंजुळे (विशेषनाम).

२) मानवेतर प्राण्यातील नर मादी भेद 'दादलो' आणि 'बायली' हे शब्द वापरुन व्यक्त करतात दादले डोकं (बगळा) बाईले सुणें (कुत्री).

३) 'घोडो' सारख्या ओकारान्त नामाचेही स्त्रीलिंगी मराठीप्रमाणे 'घोडी' असेच होते.

**वचन:**

१) पुल्लिंगी नामाच्या प्रथमेच्या एकवचनी रूपांत मराठीत ज्या ठिकाणी आ आहे (उदा. घोडा, रेडा) या नामांचे अनेकवचनी रूप मराठीप्रमाणे एकारान्त होते. (उदा.घोड, रेडे)

२) चेडू (न) मुलगी याचे अनेकवचन चेडवां (मुली) हे आहे तर एकवचनी संबोधन 'चेडवा' हे आहे. सामान्यरूपी एकवचनात शुद्ध (केवळ मुखोच्चारित) असलेला स्वर अनेकवचनी अनुनासिक होतो. झिलगो (मुलगा), झिलग्या – क् (मुलाला), झिलग्यां – क् मुलां – ना –'मुलान् – ना'

३) स्त्रीलिंगी नामांचे अनेक वचन ओकारान्त होते.उदा.राणी– राण्यो, बाईल – बायलो

४) नपुंसकलिंगी नामांचे अनेक वचनी आकारान्त होते जसे उतरां, नांवां, वोसां (वर्षे)

**आख्यात विभक्तीः**

१) कोकणीतील भूतकाळ मराठीप्रमाणेच 'ल' प्रत्यययाद्वारे साधला जातो.

२) वर्तमानकाळी प्रथमपुरुषी अनेकवचनाचे रूप मराठीतून वेगळे म्हणजे 'तांब' लागून होते. जसे 'मारतांब'

३) प्रयोजकाबाबत कोकणी वेगळीक दाखवते असे सांगितले गेले असले तरी अभ्यासकांना ते मान्य नाही. कोकणीतील प्रयोजक रूपे सं. अय प्रत्यय लागून होतात तर मराठीत त्याच्याशी थेट समांतर सं.अव प्रत्यय लागून होतात. कोकणीत पुढे अय-ऐ अशी प्रक्रिया घडते. उदा. करैता. पण 'अय' ही काही कोकणीचीच विशिष्टता नाही. श्रवणबेळगोळच्या शिलालेखात 'श्री चामुण्डराजे करवियले – गंगराजे सुताले करवियले' अशी रूपे आढळली आहेत.

क्रियावाचक शब्दातील स्वरात गुणवृद्धिपद्धतीचा बदल करून प्रयोजक साधण्याची प्रथा काही धातूंपुरती जशी मराठीत आढळते, तशीच ती कोकणीतही आढळते. गळ – गाळ, फुट – फोड इ.

४) अकरणरूपः कोकणीत अकरणरूपात तुलनेने संक्षेपजन्य सुलभता अधिक आढळते. म्हणूनज ऽऽ करुनज ऽऽ अशा अन्त्य 'अ' च्या दीर्घत्वाने कृतीबाबत अशक्यता व्यक्त होते. २) बोलताना 'मरिनासतना' (मारले नसताना) 'घेनासतना' (घेतले नसताना) अशी समाजसंक्षेपी रूपे केली जातात.

**नामविभक्ती प्रत्ययः**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | मूळ रूप +० | विकार |
| द्वितीया - चतुर्थी | क, का, | क, कां |
| तृतीया | न, ए, शी | नी, ई, शी |
| पंचमी | ऊन, थान, च्यान | ऊन, थान |
| | ज्येन, आक, थावन | च्यान, आक |
| षष्ठी | चो ची चे च्यो | चो, चीं, चे |
| | चीं, ज्यो, जीं, जे | च्ये, ज्यो, चीं |
| | जे, ज्यो, जीं | |
| सप्तमी | आ, इ, न्त, र | आ, इ, न्त |
| | घेर, ग्वेर | नि, र, घेर, विर |
| संबोधन : | सामान्यरूप | ना, नू |

**अपरिचित शब्दः**

आयदन (भांडे), आल्फान (जकात), आस्पाव (पसारा), उलवणे (बोलवणे), उल्लोपी (वक्ता), कळंतर (व्याज), कुमार (कुंभार), केस्तांव (भांडण), खिस्त (हप्ता),

गजाल (गोष्ट), जनेल (खिडकी), जळार (डास) तीड (छेड), धेंक (भय), निस्ते (मासळी), पळैणे (पाहणे), पांपर (पदप्रहार), फांती (वेणी), फोंस्क (आगपेटी) बरपणे (लिहिणे), भिकूण (ढेकूण), भिरे (पक्ष्यांचा थवा), भुरगे (मूल), मेर (मर्यादा), रुमड (उंबराचे झाड), वाफोर (स्टीम लॉच), वेंग (मिठी), हांगा (येथे), हूम (घाम), हावको (बागुलबुवा).

### ६.६.३.३ कोकणीसंबंधीचा वादः

कोकणी ही मराठीची बोली आहे असे विधान बऱ्याच लेखकांनी केले आहे तर कोकणी ही एक स्वतंत्र भाषाच आहे असा दावा आणि त्याला आवश्यक असा प्रचार कित्येक वर्षापासून काही लोकांनी सुरू केला आहे. या चळवळीच्या पुढाऱ्यांत श्री. वामन रघुनाथ वालावलीकर उर्फ शणै गोयबाब यांचा समावेश होतो. कोकणीचे एक व्याकरण त्यांनी त्याच बोलीतून लिहिले आहे. व्याकरणात ठायीठायी कोकणी ही मराठीची बोली नाही हे धृवपदासारखे आले आहे. त्यांचा दृष्टिकोन भावनाप्रधान आहे, शास्त्रीय नाही.

ही स्वतंत्र भाषा की मराठीची बोली या वादाला सुरुवात झाली ती डॉ. दाल्गाद यांच्या 'कोकणी ही व्याकरणदृष्ट्या संस्कृतला जवळची आहे व तिचा आणि मराठीचा शाखासंबंध नाही' या विधानामुळे. या विधानास विठ्ठल रामजी शिंदे यांनी आक्षेप घेतला. कोकणी ही स्थानिक बोली नसून ती उपरी व जातीय भाषा आहे असे मत त्यांनी मांडले. कोकण या शब्दाची फोड कोंग + आण (कोंग जातीचा देव (= आण) तो कोंगाण) कोकण अशी त्यांनी केली. कोंग आर्य नव्हते असे ते म्हणाले. वि. रा. शिंदे यांचे मत खोडून काढण्यासाठी श्री. शणै गोयबाब यांनी 'कोकणी व मराठी' या शीर्षकाचा लेख लिहिला. त्यात कोकणी ही स्वतंत्र भाषा असून कोकणवासीय हे आर्य आहेत असे प्रतिपादन त्यांनी केले. डॉ. सु. मं. कत्रे यांनी 'फॉमेशन ऑफ कोकणी' या आपल्या प्रबंधात दक्षिण कोकणीच्या पाच सहा तऱ्हेच्या रूपांची भाषाशास्त्रीय चिकित्सा करून कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे, असा सिद्धान्त मांडला. त्यांच्या म्हणण्याला एक प्रकारचे प्रामाण्य आले.

ग्रिअर्सन, सर रामकृष्ण भांडारकर, पां. दा. गुणे या तज्ज्ञांनी यापूर्वी तिला मराठीची बोली मानलेले होते. पुढे अ.का. प्रियोळकर यांनी कोकणी शब्दच नव्हेत तर काही वैशिष्ट्यपूर्ण प्रत्ययही जुन्या मराठीत कसे आढळतात हे दाखवून दिले व कोकणी-मराठी वादात कोकणीस स्वतंत्र भाषा मानण्याचे काही एक कारण नाही असे प्रतिपादन केले. डॉ. वि.बा. प्रभुदेसाई यांनी 'सतराव्या शतकातील गोमांतकी बोली' या आपल्या प्रबंधात मराठीची कोकणी ही बोली असल्याचा निष्कर्ष काढला होता.

प्रसिद्ध भाषावैज्ञानिक श्री.ना.गो. कालेलकर स्वनिम व्यवस्था आणि शब्दसंग्रह या दोन दृष्टींनी कोकणी ही इतर कोणत्याही आर्यभाषेपेक्षा मराठीस जवळची असल्याचे सांगतात. पण त्याचबरोबर 'मराठी आणि कोकणी या संस्कृतापासून निघून दीर्घकाळपर्यंत एकाच दिशेने उत्क्रांत होत गेल्या असल्या पाहिजेत' असेही ते सांगतात.

डॉ. कालेलकरांनी भाषिक वर्गीकरणाच्या दोन महत्त्वाच्या कसोट्या सांगितल्या आहेत. १) भाषाशास्त्रीय कसोटी २) सांस्कृतिक कसोटी. भाषाशास्त्रीय कसोटीत परस्पर आकलनाचे तत्त्व अंतर्भूत आहे. दक्षिण कोकणी बोलणारे व प्रमाण मराठी बोली बोलणारे एकमेकांचे म्हणणे सहजतेने, सुलभतेने समजू शकत नाहीत तेव्हा पहिल्या कसोटीनुसार डॉ.

कत्रे यांच्या प्रबंधात वर्णन केलेल्या कोकणी बोलींना मराठी भाषकांच्या दृष्टीने एक वेगळी भाषा मानणे भाग आहे, असे डॉ. कालेलकर म्हणतात.

सांस्कृतिक कसोटीची गोष्ट वेगळी आहे. मायबोलीचा उपयोग व्यवहारासाठी आणि लिपिबद्ध साहित्यिक भाषेचा उपयोग सांस्कृतिक कार्यासाठी या सोयीस्कर विभागाचा अवलंब एखादा समूह करतो. जे लोक मराठीचे असा उपयोग करतात त्यांची कोकणी ही मराठीची बोली आहे असे म्हणायला हरकत नाही. मात्र हा नियम कानडीचा उपयोग करणाऱ्या दक्षिण कोकणी बोलणाऱ्या लोकांना लावता येणार नाही, कारण ही कोकणी आणि कानडी या मूळ एका भाषेतून आलेल्या नाहीत ही मर्यादाही कालेलकरांनी स्पष्ट केली आहे.

**दक्षिण कोकणी : नमुना**

मगेली काही अद्दिना; जाल्यारि तुम्मि या विषयांतु विवेकाचो सहायु घेवनु विचारू कोचे विहित दिस्ता. विनाकरण असूयेक बच्चुन तुम्मि अपमानु कोर्नु घेंवचे ह्या नारदाक सहन जायीश्ना. पतिव्रततांची योग्यता तुम्हांला गोतुना अश्शि काहींना.

## ६.७ आपली प्रगती तपासा

१. अहिराणी, वऱ्हाडी व कोकणी बोलीतील काही भाषिक नमुने लिहा.

## ६.८ समारोप

एकूणच संपूर्ण घटकामध्ये आपण प्रमाणभाषा व बोली या संबंधाने चर्चा करून मराठीच्या अहिराणी, वऱ्हाडी व कोकणी या बोलींचे स्वरूप पाहिले आहे. प्रमाणभाषा ही देखील एक बोलीच असते. पण तिच्यात होणारे परिवर्तन स्थिर होऊन ती व्याकरणबद्ध व लिपिबद्ध होत जाते. व ती सामूहिक जीवनामध्ये लेखनव्यवहारामध्ये प्रामुख्याने वापरली जाताना दिसते. याऊलट बोली ह्या सतत परिवर्तनशील असतात. इतर भाषांचे प्रभाव किंवा आक्रमण होऊन त्या प्रवाही होतात तर काहीवेळा मृतावस्थेला जाऊन पोहोचतात. त्यामुळे अशा बोली टिकवण्यासाठी त्यांचा अभ्यास होणे गरजेचे असते. तिच्यातील वेगळ्या व्याकरणिक, उच्चार बदलांची नोंद होणे गरजेचे ठरते. तसेच अशा बोलीत वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा, म्हणी, वाक्प्रचारांचा अवलंब प्रमाणभाषेतही होत असतो. त्यामुळे अशा शब्द, म्हणी, वाक्प्रचारांचे नेमके अर्थ नोंदविले गेले तर ती भाषा समजण्यास सुलभ ठरते. अलीकडील मराठी साहित्यातील विविध प्रकारात – उदा. कथा, कविता, नाटक, कादंबरी यामध्ये या प्रादेशिक बोलींचा वापर लेखक, कवी करताना दिसतात. त्यामुळे ती बोली लेखनप्रवाहात येताना आपल्याला दिसते. यामुळे एकूण मराठी प्रमाणभाषेचा शब्दसंग्रह वाढीस तर लागतोच पण त्याचबरोबर साहित्यव्यवहारात विविधता येताना दिसते. भाषेच्या, बोलीच्या



munotes.in

या अवलंबनामुळे त्या त्या प्रदेशातील मानवी जीवनाची रीत इतर भाषिकांना, बोली बोलणाऱ्यांना सहजतेने समजून घेता येते. शिवाय अशा बोली लेखन व्यवहारात आल्यामुळे तिच्या अस्तित्वाचे पुरावे निर्माण होऊन तिला एक स्थिररूप प्राप्त होताना दिसते. या एकूणच गोष्टी पाहता प्रमाणभाषेच्या अभ्यासाबरोबरच तिच्या बोलींचाही अभ्यास होणे महत्त्वाचे ठरते.

## ६.९ संदर्भ ग्रंथ


१) पाटणकर, जयश्री (संपादक), 'सामाजिक भाषाविज्ञान कक्षा आणि अभ्यास', ससंदर्भ प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती २००५.

२) ग्रामोपाध्ये, गं. बा., 'भाषा-विचार आणि मराठी भाषा'-व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७९ (दु. आ.).

३) पुंडे, दत्तात्रय, 'सुलभ भाषाविज्ञान'- स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००५ (दु. आ.).

४) देशपांडे, – गुजर सोनाली, 'भाषा, समाज आणि संस्कृती' - शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०१७ पृ. ६७.

५) भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र - मुख्य संपादक – गणेशदेवी, पद्मगंधा प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१३, पृ. ३८

६) काळे, कल्याण, सोमण, अंजली (संपादक), 'आधुनिक भाषाविज्ञान – संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक', प्रतिमा प्रकाशन, द्वितीयावृत्ती : २००३, पृ. २१४.

७) कानडे, मु. श्री., 'मराठीचा भाषिक अभ्यास – ऐतिहासिक आणि वर्णनात्मक', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. २०५, २०७.

८) डॉ. गाडगिळ, स. रा. 'काव्यशास्त्रप्रदीप' – व्हिनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती नववी २०१६, पृ.६७.

९) पाटणकर, जयश्री, 'सामाजिक भाषाविज्ञानः कक्षा आणि अभ्यास' (संपादक) : ससंदर्भ प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती २००५, पृ.१८८, १९१, १८९, १९३.

१०) देशपांडे, सुधाकर, 'मराठी भाषेचा भाषाशास्त्रीय अभ्यास' – मुंबई विद्यापीठ, दूरशिक्षण संचालनालय, १९९३, पृ. ९४ ते १००.

११) कालेलकर, ना. गो., 'भाषा आणि संस्कृती,' दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई १९८२, पृ. ६४.

१२) गजेंद्रगडकर, श्री. न., 'भाषा आणि भाषाशास्त्र, 'व्हिनस प्रकाशन, डोंबिवली, १९९८.

१३) पाटणकर, जयश्री (संपादक), 'सामाजिक भाषाविज्ञान कक्षा आणि अभ्यास', ससंदर्भ प्रकाशन.


## ६.१० नमुना प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. प्रमाणभाषा आणि बोली यांचे परस्पर संबंध स्पष्ट करा.

२. बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व सविस्तर स्पष्ट करा.

३. वऱ्हाडी बोलींचे ठळक विशेष सांगा.

४. कोकणी बोलींचे ठळक विशेष स्पष्ट करा.

५. अहिराणी ही मराठीची बोली आहे हे विधान स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) प्रमाणभाषा आणि बोली या संकल्पना स्पष्ट करा.

२) बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करा.

३) अहिराणी बोलीसंबंधीचे वाद.

४) कोकणी बोली संबंधीचे वाद

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रमाणभाषा म्हणजे काय ?

२) 'बोली' म्हणजे काय ?

३) प्रमाण मराठीच्या बोलींची नावे लिहा.

४) कोकणी बोलींच्या प्रभाव क्षेत्रांची नावे लिहा.

५) कोकणी बोलींचा एक प्रमुख विशेष लिहा.

*****

munotes.in

## एम. ए. १ सत्र २
## मराठी अभ्यासपत्रिका क्र. ८

### वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली

**परीक्षापद्धती**

अ) अंतर्गत चाचणी परिक्षा ४० गुण
ब) सत्रांत परिक्षा ६० गुण

### नमुना प्रश्नपद्धती

**(एकूण गुण ६०)**

**सूचना**

१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न १. वर्णनात्मक भाषाविज्ञान ही संकल्पना विस्ताराने सांगा. (१५)

किंवा

प्रथमोपस्थित संघटक म्हणजे काय ते सांगून त्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

प्रश्न २. मानवी वागेंद्रियाची संकल्पना व तिची रचना स्पष्ट करा. (१५)

किंवा

बोली ही संकल्पना करून मराठीच्या कोकणी बोलीचे विशेष नमुद करा.

प्रश्न ३. स्वन-स्वनिम-स्वनांतर ही संकल्पना विस्ताराने स्पष्ट करा. (१५)

किंवा

सोस्यूर व ब्लूमफील्ड यांचा भाषाविचार स्पष्ट करा.

प्रश्न ४. रूपिका, रूपिम, रुपिकांतर ही संकल्पना सांगून रुपिमांचे प्रकार थोडक्यात लिहा. (१५)

किंवा

नामपदबंधातील 'नाम' आणि 'सर्वनाम' याचे विश्लेषण करा.

*****



munotes.in

## Document Information

| | |
|---|---|
| **Analyzed document** | M.A. Part I Semester II Paper VIII praman bhasha.pdf (D113416948) |
| **Submitted** | 2021-09-25 07:13:00 |
| **Submitted by** | Pandit Rajashri |
| **Submitter email** | rajashree@idol.mu.ac.in |
| **Similarity** | 0% |
| **Analysis address** | rajashree.unimu@analysis.urkund.com |

## Sources included in the report

munotes.in